# पळसकाटा धारबांदोडा येथील धनगर समाजाचे लोकसाहित्य

**(Palaskata Dharbandoda yethil Dhanger samajache Loksahitye)**

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**


**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**

अभ्यासक

**पावणे गीता बाप्या**

हजेरी क्र. 22P0190021

ABC ID 741497368682

पी. आर 201905466

मार्गदर्शक

**जयेश गावकर**

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा


गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 – 2024**

# PALASKATA DHARBANDODA YETHIL DHANGER SAMAJACHE LOKSAHITYE

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**

**MA in Marathi**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**


**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

by

**Paune Geeta Bapya**

Seat No: 22P0190021

ABC ID: 741497368682

PRA: 201905466

Under the supervision of

**Jayesh Goankar**

(Assistant Professor)

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature



**Goa University**

**2023 – 2024**

# DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, "पळसकाटा धारबांदोडा येथील धनगर सामाजाचे लोकसाहित्य" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Jayesh Gaonkar and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Pavane

Paune Geeta Bapya

Seat no: 22P0190021

Date: 16/04/2024

Place: Goa University

## COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report "**पळसकाटा धारबांदोडा येथील धनगर सामाजाचे लोकसाहित्य**" is a bonafide work carried out by Ms Geeta Bapya Paune under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of **Master of Arts** in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

**Jayesh Goankar**

Date: 16/04/2024

GOA UNIVERSITY
SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE
TALEIGAON PLATEAU

Signature of Dean of the School

Dept Stamp

Date: 25/04/2024

Place: Goa University

# मनोगत

नवीन अभ्यासक्रमाचा भाग म्हणून पदव्युत्तर पदवीच्या द्वितीय वर्षासाठी प्रबंधिका लिहावी लागते. माझ्या प्रबंधिकेचा विषय '**पळसकाटा धारबांदोडा येथील धनगर समाजाचे लोकसाहित्य**' आहे. प्रत्येक गोष्ट घडण्यासाठी एक काळ वेळ असतो. तो काळ आला की ती गोष्ट नकळत आपल्या हातातून घडते. कितेक वर्षापासून पळसकाटा परिसरात धनगर समाज वास्तव करून आहे. या समाजाकडे लोकसाहित्यचा भंडार आहे. वर्तमानात काळाच्या ओघात हे लोकसाहित्य नष्ट होत आहे. मी या गावाची रहवासी असल्यामुळे धनगर लोकसाहित्य टिकवून ठेवता येईल याचा विचार मी नेहमी करत होते. जेव्हा प्रबंधिकेसाठी विषय निवडायला सांगितला तेव्हा सर्व प्रथम माझ्या डोक्यात हा विषय आला.

जीवनात एखादे काम करायचे असेल तर उत्तम मार्गदर्शनाची अत्यंत गरज भासते. माझ्या संशोधन प्रबंधिकेसाठी मार्गदर्शक म्हणून प्रा. जयेश गावकर मला लाभले. सरांबरोबर विषया संदर्भात उत्तम चर्चा झाली. सरांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन माझ्यासाठी मोलाचे ठरले. सरांच्या प्रेरणेमुळे माझ्या अभ्यासाला चांगली दिशा मिळाली. यासाठी सर मी आपले कृतज्ञतापूर्वक आभार मानते.

माझा प्रबंधिकेचा विषय 'क्षेत्रीय पाहणी' विषयाशी निगडित होता, त्यामुळे धारबांदोडा, पळसकाटा या गावाला तसेच पळासकाटा परिसरातील धनगर लोकांच्या घरी एकदा नव्हे तर अनेकवेळा मी भेट दिली. कित्येकदा एकटीच तर काही वेळी आजी व आई सोबत गावातील लोकांना जाऊन प्रत्यक्ष भेटले. हा अभ्यास करताना अनेक गोष्टी नव्यावे कळून आल्या. माझा अभ्यास यशस्वी करण्यासाठी मोलांचा वाटा देणाऱ्या माझ्या आई- वडीलाचे, भावचे व बहिणीचे तसेच गंगी शेळके, संगीता पावणे, गंगाराम शेळके, भैरू झोरे, नकली पाटील, बाप्या पावणे, झीमी येडगे, केदो शेळके, सुमिता शेळके, मनीषा शेळके, रूपाली मिस्त्री इ. व्यक्तिची मी ऋणी आहे.

या अभ्यासाठी मला गोवा विद्यापीठाच्या ग्रंथलयाची मदत झाली. गोवा विद्यापीठाच्या कर्मच्चाऱ्यांनी मला वेळोवेळी ग्रंथ उपलब्ध करून दिल्याबदल मी त्यांचे आभार मानते. पणजीतल्या कृष्णदास श्यामा केंद्रिय ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांनी ग्रंथ उपलब्ध करून दिल्याबदल त्यांचे मी येथे आभार व्यक्त करते. त्याचप्रमाणे हा अभ्यासपूर्ण होईपर्यंतच्या प्रवासात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अनेकांच्या असलेल्या सहाकार्यासाठीची कृतज्ञता व्यक्त करते.

**‘ पळसकाटा धारबांदोडा येथील धनगर समाजाचे लोकसाहित्य’**

## अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| Declaration | | |
| Completion Certificate | | |
| मनोगत | | |
| १. | प्रस्तावना | १-६ |
| २. | धारबांदोडा तालुका व तेथीला धनगर समाज | ७-२२ |
| ३. | पळसकाटा परिसरातील धनगर समाज | २३-३२ |
| ४. | पळसकाटा परिसरातील धनगर समाजाचे लोकवाङ्‌मय ( मौखिक आविष्कार) | ३३-८४ |
| ५. | पळसकाटा परिसरातील धनगर समाजाच्या प्रयोगसिद्ध लोककला | ८५-९६ |
| ६. | पळसकाटा परिसरातील धनगर समाजाची भौतिक संस्कृती | ९७-१०५ |
| ७. | पळसकाटा येथील धनगर समाजात प्रचलित असलेल्या लोकसमजुती, लोकपरंपरा | १०६-११७ |
| | समारोप | ११८-१२० |
| | निष्कर्ष | १२१-१२३ |
| परिशिष्ट | | १२-१४८ |
| संदर्भ सूची | | १४७ |

# प्रास्ताविक

प्रास्ताविक........................................................................................................................ 2
१.२ संशोधन विषयक समस्या........................................................................................ 3
१.३ संशोधनकार्याची उपयुक्तता/ आवश्यकता.................................................................. 3
१.४ संशोधनकार्यामागची उद्दिष्टे........................................................................................ 3
१.५ संशोधनविषयक साहित्याचा आढावा/ मागोवा ........................................................ 4
१.६ गृहितकांची मांडणी...................................................................................................... 5
१.७ संशोधन पद्धती ............................................................................................................ 5
१.७.१ क्षेत्रीय संशोधन पद्धत................................................................................................ 5
१.७.२ वर्णनात्मक ................................................................................................................ 5
१.७.३ कार्यान्वयी पद्धत........................................................................................................ 5
१.७.४ रचनानुसारी पद्धती.................................................................................................... 5
१.८ व्याप्ती आणि मर्यादा.................................................................................................... 6

## प्रास्ताविक

**'पळसकाटा धारबांदोडा येथील धनगर समाजाचे लोकसाहित्य'** हा सदर प्रबंधिकेचा विषय आहे. पळसकाटा गाव पूर्वी एक जंगल होते. वर्तमानात एक समृद्ध असे गाव आहे. पळसकाटा हा गाव धारबांदोडा तालुक्याच्या अंर्तगत येतो. या गावात हिंदू, मुस्लिम, खिश्चन धर्मांचे लोक आहे.

पळसकाटा परिसरात धनगर समाजाच्या जास्त पहायला मिळतात. कितेक वर्षापासून धनगर लोक इथे वास्तव करून आहेत. गावामध्ये धनगर समाजाची लोकसंख्या जास्त आहे. धनगर समाज हा इतर समाजापेक्षा वेगळा आहे. धनगर लोकांची भाषा, लोकसंस्कृती, राहणीमान, लोकसाहित्य इतरांपेक्षा भिन्न असते. धनगर लोकांचे लोकसाहित्य वैशिष्टयपूर्ण आहे. लोककथा, लोकगीते, म्हणी, कोडी, उखाणे, वाक्प्रचार, जात्यावरील गीते, शिमगा गीते, बालगीताचा इ. भंडार धनगर लोकामध्ये आहे.

धनगर लोक अनेक सण उत्सव करतात. या सण, उत्सावा प्रसंगी अनेक लोककला सादर करतात. या लोककलाना स्वतःचे वेगळेपण असते. या कला सादर करण्याचा एक वेगळेपणा दिसून येतो. या वेळी केलेली वेशभूषा ही वैशिष्टयपूर्ण असते. जन्म, लग्न, मार्तिक यावेळी केले जाणारे विधी ही इतरांपेक्षा भिन्न असतात. धनगर समाजाची भौतिक संस्कृतीत भिन्नता आढळते. धनगरांच्या लोकसाहित्यातून त्यांचे वेगळेपण दिसून येते.

जसा जसा काळ बदलतो तसे लोकांमध्ये, समाजमध्ये परिवर्तन होत जाते. आधुनिक जीवनशैलीचा प्रभाव पडायला लागतो. पळसकाटा पारिसरातील धनगर लोकांवर आधुनिक जीवनशैलीचा प्रभाव दिसून येतो. आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्यामुळे जात्यावर दळण दळणे, शेती करणे, रात्रभर मांडावर दसरा खेळणे, लोककथा सांगणे इ. गोष्टी होत नाही. यामुळे दळण दळताना म्हटल्या जाणऱ्या ओव्या लोप पावत आहे. पेरणी, कणस कापताना घातली जाणारी कोडी नष्ट होत आहे. आजी झोपताना सांगणाऱ्या कथा नष्ट होत आहे.

वर्तमानात या लोकसाहित्याचे जतन करून ठेवण्याची नितांत गरज आहे. नाहीतर काळाच्या ओघात हे सर्व लुप्त होईल. पुढच्या पिढिला लोकसाहित्य साहित्य म्हणजे काय हेच समजणार नाही. याच कारणामुळे हा विषय निवडण्यात आला आहे.

‘पळसकाटा धारबांदोडा येथील धनगर समाजाचे लोकसाहित्य’ हा अभ्यास समस्या, आवश्यकता उदिष्टे, साहित्याचा आढावा, गृहितके, संशोधन पद्धती इ. गोष्टी लक्षात घेऊन करण्यात येणार आहे.

**१.२ संशोधन विषयक समस्या**

पळसकाटा या परिसरातील धनगर समाजाच्या लोकसाहित्याचे संकलन आणि संशोधन आजतागायत झालेले नाही. हे साहित्य काळाच्या ओघात लुप्त होत चाललेले आहे. अशीच परिस्थिती पुढे राहिली तर लोकसाहित्य नष्ट होण्याची भीती नाकारता येत नाही. म्हणून लोकसाहित्य टिकवून ठेवण्याची नितांत गरज आहे.

संकलन न झाल्यामुळे धनगर समाजाच्या लोकवाङ्मयाचा भाषिक अभ्यास झाला नाही. तसेच वाङ्मयीन मूल्येही दुर्लक्षित राहिलेली आहे. म्हणून हा अभ्यास होणे आवश्यक आहे.

**१.३ संशोधनकार्याची उपयुक्तता/ आवश्यकता**

१) लोकवाङ्मयात आविष्कृत झालेल्या वाङ्मयीन मूल्याचा शोध घेणे शक्य आहे.
२) धनगर समाजावर व त्यांच्या लोकवाङ्मयावर झालेल्या आधुनिक जीवन प्रणालींचा शोध घेता येईल.
३) धनगर समाजाच्या लोकवाङ्मयाचा भाषिक अभ्यास करता येईल.
४) धनगरांच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, जीवनाचा शोध घेता येईल.
५) धनगरांच्या लोकसंस्कृतीचा शोध घेता येईल.
६) लोकवाङ्मयाचा लोकजीवनाशी असलेले संबंध तपासता येईल.

**१.४ संशोधनकार्यामागची उद्दिष्टे**

१) लोकवाङ्मयात आविष्कृत झालेल्या वाङ्मयीन मूल्याचा शोध घेणे.
२) धनगर समाजावर व त्यांच्या लोकवाङ्मयावर झालेल्या आधुनिक जीवन प्रणालींचा शोध घेणे.
३) धनगर समाजाच्या, लोकवाङ्मयाचा भाषिक अभ्यास करणे.
४) धनगरांच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनाचा शोध घेणे.
५) धनगरांच्या लोकसंस्कृतीचा शोध घेणे.
६) लोकवाङ्मयाचा लोकजीवनाशी असलेले संबंध तपासणे.

**१.५ संशोधनविषयक साहित्याचा आढावा/ मागोवा**

लोकसाहित्याच्या अभ्यासाचा प्रारंभ प्रामुख्याने पाश्चात्य देशात झालेला आहे. प्रारंभीच्या काळात हा अभ्यास सांस्कृतिक मानवंशशास्त्राची सामग्री तसेच संस्कृतीच्या अभ्यासाचे साधन केला. लोकसाहित्य संकलनाचा पहिला प्रयत्न इंग्लंडमधील ' बिशप थॉमस पर्सी यांनी केला. भारतामध्ये लोकसाहित्याच्या अभ्यासाचा प्रारंभ ब्रिटिशांच्या राजकीय आगमनाने झाला. ब्रिटिशांना भारतावर राज्य करण्यासाठी भारतीय भाषा, संस्कृती, साहित्य, इतिहास तसेच रितीरिवाज समजून घेणे आवश्यक होते म्हणून त्यांनी या सगळया गोष्टी समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्या निमित्ताने लोकसाहित्य अभ्यासाला प्रारंभ झाला.

आज अनेक जणांनी गोमंतकीय लोकसाहित्यासंबंधाने स्फूट स्वरूपाचे विविध लेखन केलेले आहे. यामंध्ये विनायक खेडेकर यांनी मोलाचा वाटा दिला आहे. विनायक विष्णू खेडेकर यांचा 'गोवा : कुळमीः पर्यावरण संस्कृतीचे जनक आणि रक्षक' हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. श्री महालसायन, गोमंतकीय लोककला, श्रीमान शिरोडे- एका गावाचा सांस्कृतिक आलेख हे त्यांचे इतर संशोधन पर ग्रंथ होय. जयंती नायक, पौर्णिमा राजेंद्र केरकर, राजेंद्र केरकर, झीलू गांवकर, उल्लास प्रभुदेसाई, अशा अनेक गोमंतकीय अभ्यासकांची नावे प्रामुख्याने घेता येते.

ज्ञानेश्वर गवते यांनी 'धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन' लिहिलेले हे पुस्तक या अभ्यासाला आधार देणारे आहे. या पुस्तकामध्ये गवते यांनी एकंदरीत धनगरांच्या लोकसाहित्यातून होणाऱ्या समाजाचे दर्शन घडविले आहे. तसेच धनगरांच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनाचे वेगळेपण सांगण्याचा प्रयत्न केला. 'धनगरी बोली व मराठी भाषा यांचे परस्पर संबंध' हा अभ्यास केपे महाविद्यालयातील बी. ए. तृतीय वर्षाच्या मुलांनी केलेला आहे. हा अभ्यास सदर प्रबंधिकेसाठी महत्त्वाचा आधार आहे.

पौर्णिमा केरकर यांनी लिहलेले 'अनुबंध लोकगंगेचे' हे पुस्तक या अभ्यासाला आधार देणारे आहेत. या पुस्तकामध्ये धनगर स्त्रियाचे चित्रण केलेले आहे. त्यांचप्रमाणे शुभदा च्यारी यांनी लिहलेले ' धनगर स्त्री' पुस्तक सदर प्रबंधिकेसाठी चांगला आधार देणारे आहे. यामध्ये धनगर स्त्रियांचा अनेक अंगाने अभ्यास शुभदा च्यारी यांनी केला आहे. धनगरी स्त्रिगीतातील सौंदर्य अगदी मनाला स्पर्श करणारे असे केले आहे. धनगर स्त्रियांना असलेले- वनौषधी ज्ञान अगदी चांगल्या पद्धतीने मांडले आहे.

**१.६ गृहितकांची मांडणी**

१) लोकवाङ्मयात वाङ्मयीन मूल्ये दडलेली आहेत.

२) धनगर समाजावर व वाङ्मयावर आधुनिक जीवनशैलीचा प्रभाव पडलेला आहे.

३) धनगर समाज भाषिक दृष्ट्या वैशिष्टयपूर्ण आहे.

४) धनगरांचे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवन आणि लोकवाङ्मय यात सहसंबध आहे.

५) धनगरांच्या लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

६) लोकसाहित्यातून सांस्कृतिक इतिहासाचे दर्शन घडते.

७) लोकसाहित्य समुहमनाचे दर्शन घडविते.

**१.७ संशोधन पद्धती**

**१.७.१ क्षेत्रीय संशोधन पद्धत**

'पळसकाटा धारबांदोडा येथील धनगर समाजाचे लोकसाहित्य' हा अभ्यास इथे अभिप्रेत असल्याने प्रामुख्याने क्षेत्रीय संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार आहे. प्रत्यक्ष भेटी, मुलाखती, प्रत्यक्ष त्या स्थळाना भेट देणे, छायाचित्रण असे या अभ्यासाचे स्वरूप आहे.

**१.७.२ वर्णनात्मक**

या पद्धतीने विशिष्ट काळातील माहिती फार मोठ्या प्रमाणात संकलित करता येते. ही माहिती प्रश्नावली, मुलाखत या सारख्या साधनाचा उपयोग करून कमी वेळेत संकलित करता येते. वर्णनात्मक सर्वेक्षण हे गुणात्मक असते. लोकवाङ्मयाचे संकलन करून लोक समाजातील मिळालेल्या माहितीची शास्त्रीय निकषावर आधारलेली वर्गवारी करून, विश्लेषण आणि चिकित्सा वर्णनात्मक स्वरूपात संशोधनाद्वारे होईल.

**१.७.३ कार्यान्वयी पद्धत**

लोकजीवनात लोकवाङ्मय विशिष्ट कारणामुळे येत असते. त्या कार्याचा शोध कार्यान्वयी अभ्यास पद्धतीच्या आधारे घेणे शक्य आहे.

**१.७.४ रचनानुसारी पद्धती**

विशिष्ट पद्धतीने लोकवाङ्मयाची रचना केलेली आहे. त्यासाठी रचनानुसारी पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

**१.८ व्याप्ती आणि मर्यादा :-** पळासकाटा धारबांदोडा येथील धनगर समाजाचे लोकसाहित्य हा माझा अभ्यास पळसकाटा गावापुरता मर्यादित असणार आहे.

**'पळासकाटा धारबांदोडा येथील धनगर समाजाचे लोकसाहित्य'** हा अभ्यास सहा प्ररकणाद्वारे केला जाणर आहे. शेवटी समारोप आणि निष्कर्ष जोडला जणार आहे. प्रबंधिकेचे पहिले प्रकरण **' धारबांदोडा तालुका व तेथील धनगर समाज**' असे असून या प्रकरणामध्ये लोकसाहित्याची संकल्पना ते स्वरूप, लोकसाहित्याची व्याप्ती, व्याख्या, लक्षणे इ. चा विचार केला जाणार आहे. त्याचप्रमाणे गोव्याची भौगोलिक सीमारेषा, सांस्कृतिक गोवा आणि धारबांदोडा तालुका व तेथील धनगर समाजाचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे **' पळसकाटा परिसरातील धनगर समाज'** या प्रकरणामध्ये पळसकाटा नावाच्या उत्पत्तीविषयी अभ्यास करण्यात येईल. तसेच 'पळसकाटा' गावाचा व तेथील धनगर समाजाचा विविध अंगाने हा अभ्यास केला जाणार आहे. भौगोलिक, सांस्कृतिक, सामाजिक इ. अनेक अंगाने अभ्यास करण्यात येईल.

प्रकरणे तिसरे **' पळसकाटा परिसरातील धनगर समाजाचे लोकवाङ्मय'** असे असून ' पळसकाटा' परिसरातील धनगर समाजाची लोकगीते, लोककथा, म्हणी, कोडी, उखाणे, वाक्प्रचार इ. लोकवाङ्मयाचा अभ्यास केला जाणार आहे. सदर प्रकरणात या सर्व लोकवाङ्मयाचा आशयनिष्ठ, भाषिक, आचार- विचार, स्त्रियांच्या भावभानांचे दर्शन, कौटुंबिक, सामाजिक, प्रयोजनात्मक, वाङ्मयीन इत्यादी अंगाने केला जाणार आहे.

प्रकरण चौथे **' पळासकाटा परिसरतील धनगर समाजाच्या प्रयोगसिद्ध लोककला'** असे असून या प्रकरणामध्ये पळासकाटा परिसरातील धनगर प्रयोगसिद्ध लोककलाचा अभ्यास करण्यात येणार आहे. हा अभ्यास स्वरूप, सादरीकरण आणि प्रकार या दृष्टीकोणातून केला जाणार आहे.

पाचवे प्रकरण **' पळासकाटा परिसरतील धनगर समाजाची भौतिक संस्कृती'** असे असून भौतिक संस्कृतीमध्ये अन्न, वस्त्र, निवारा, भौतिक ज्ञान इ. अंगाने केला जाणार आहे. शेवटच्या प्रकरणात '**पळासकाटा येथील धनगर समाजात प्रचलित असलेल्या लोकसमजुती, लोकपरंपरा'** असे असून यामध्ये विधी, अंद्धश्रद्धा इ. चा अभ्यास करण्यात येणार आहे. अशा सहा प्रकरणद्वारे 'पळसकाटा धारबांदोडा येथील धनगर समाजाचे लोकसाहित्य' हा अभ्यास करण्यात येईल व शेवटी समारोप आणि निष्कर्षाने यां प्रबंधिकेची सांगता करण्यात येईल.

# प्रकरण २

## धारबांदोडा तालुका व तेथील धनगर समाज

२.१ प्रास्ताविक....8
२.२ ‘ लोकसाहित्य’ संकल्पना -....9
२.२.१ लोकसाहित्य म्हणजे काय? ....10
२.३ लोकसाहित्याचे स्वरूप :....12
२.३.१लोकसाहित्याची व्याप्ती :....12
२.३.१.१मौखिक आविष्कार....12
२.३.२ लोकसाहित्याची लक्षणे : ....14
२.४ लोकसंस्कृती :-....15
२.५ गोवा ....17
२.५.१ भौगोलिक गोवा ....17
२.५.२ सांस्कृतिक गोवा....18
२.६ घारबांदोडा तालुका....19
२.६.१ भौगोलिक सीमारेषा ....19
२.६.२ सामाजिक धारबांदोडा ....20
२.६.३ सांस्कृतिक धारबांदोडा ....20
२.७ समारोप ....21
२.८ निष्कर्ष ....22
संदर्भ सूची :- ....22

# प्रकरण २

## धारबांदोडा तालुका व तेथील धनगर समाज

### २.१ प्रास्ताविक

'धारबांदोडा तालुका व तेथील धनगर समाज' या विषया अंतर्गत येथे अभ्यास अभिप्रेत आहे. हा अभ्यास करायचा असेल तर सर्वांत अगोदर लोकसाहित्य म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे. भारतामध्ये लोकसाहित्याभ्यासाची सुरुवात ' भारतीय विद्ये' च्या अनुषंगाने झालेली आहे. १९ व्या शतकाच्या प्रारंभी भारतात इंग्रजाचे शासन स्थिर झाल्यानंतर एक नवी प्रशासकीय व्यवस्था निर्माण झाली. अनेक प्रशासक इंग्लंडमधून इकडे आले. भारतात आपल्या साम्राज्याची मुळे खोल रुजविण्यासाठी येथील लोक, त्यांचे जीवन, त्यांच्यात प्रचलित असलेल्या रुढी, समजुती, त्यांची भाषा, संस्कृती, इतिहास इ. समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्या निमित्तानेच लोकसाहित्य अभ्यासाला प्रारंभ झाला.[i]

गोमंतकातही लोकसाहित्य अभ्यासाला आज महत्त्व आलेले आहे गोमंतकाची लोकसंख्या सुमारे पंधरा लाख इतकी आहे आणि गोमंतकीय लोकसंस्कृतीची ज्ञात ओळख सुमारे एक हजार वर्षे, सर्वसाधारणपणे मानता येईल. गोवा हा कोंकण प्रदेशाचा एक भाग आहे. जी कोंकणची संस्कृती तीच गोव्याची असे सर्वसाधारणपणे मानले; तरीही गेल्या पाचशे वर्षापासून त्यातही इतिहासाने फेरफार घडवून आणलेले आहेत; हे विसरून चालणार नाही. या हजारो वर्षांत आणि तद्पूर्वीच्या कालखंडांपासून या प्रदेशाच्या वसाहतीकरणास प्रारंभ झाला व तेव्हापासून ते आजतागायत अनेकविध लोकसमूह इतिहासाच्या विविध कालखंडात इथे येऊन वसलेले आहेत. त्यानी आपल्या बरोबर आपली संस्कृती आणलेलीच असेल. तेव्हा मूंड, गोंड, कीरात, द्रविड, मूर, आर्य तुर्क लाटीन इ. सर्वच मानवसमूहांच्या संस्कृतीच्या कमी अधिक अभिसरणातून आजची गोमंतकीय संस्कृती आणि म्हणून लोकसंस्कृती देखिल आकारास आलेली आहे हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

गोमंतकाच्या अनेक भागामध्ये धनगर समाज विखुरलेला आहे. त्या समाजाचे ही असे वेगळे लोकसाहित्य पहावयास मिळते. धनगर समाज म्हणजे एक भटकी जमात असेही म्हटले जाते. पूर्वी धनगर समाजातील लोक एका गावातून दुसऱ्या गावात फिरत होते. जेथे आपल्या जनवाराना खायला मिळत असे त्या ठिकाणी काही काळ थांबत होते. नंतर तिथे संपल्यावर दुसऱ्या गावाची वाट धरत होते. अशा प्रकारे गोमंतकाच्या वेगवेगळया भागात

या समाजाने आपली वस्ती मांडली आहे. काणकोण, केपे, सांगे, धारबांदोडा, सत्तरी तालुक्यात धनगरांच्या वस्त्या आहे.

**२.२ ' लोकसाहित्य' संकल्पना** -

लोकसाहित्याला मानवजातीइतकाच जुना इतिहास आणि परंपरा आहे. लोकसाहित्याची सुरुवात पाश्चात्य देशात झाली. भारतामध्ये या अभ्यासाचा प्रारंभ हा ब्रिटिशांच्या आगमनाने झाला. ब्रिटिशांना भारतावर राज्य करण्यासाठी भारतीय भाषा, संस्कृती, इतिहास तसेच रीतिरिवाज समजून घेणे आवश्यक होते. एकूणच भारतीयांना समजून घेण्यासाठी लोकसाहित्याच्या अभ्यासाचा प्रारंभ झाला. त्यानंतर भारतात लोकसाहित्याच्या संकलनाचे आणि संशोधनाचे अनेक प्रयत्न झाले.

लोकसाहित्य हा शब्द इंग्रजीतील ' Folklore' या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून वापरला जातो. ज्या सामग्रीला लौकिक पुरातत्व आणि लौकिक वाङ्मय असे संबोधले जात होते त्यालाच विल्यम जॉन थॉम्सने १८४६ मध्ये Folklore ही संज्ञा वापरली. ' लोकसाहित्य' हा शब्द सामासिक आहे. लोकसाहित्यातील ' साहित्य' हे पद फक्त वाङ्मय नाही ते साधनवाचक व साम्रगीवाचक आहे. मौखिक परंपरा, भौतिक संस्कृती, प्रयोगसिद्ध लोककला, लोकरूढी, विधी, समजुती हे सगळे साहित्यामध्ये येते. साहित्य हे व्यापक आहे. मराठीत ' लोकसाहित्य' हा शब्द इंग्रजीतील ' folklore' साठी रुढ असल्याने इंग्रजीतील ' folklore' या शब्दाच्या अर्थाची जी व्याप्ती आहे तीच मराठीतील ' लोकसाहित्य' या शब्दाची व्याप्ती आहे.

' Folklore' या इंग्रजी शब्दासाठी मराठीत कोणता पर्यायी शब्द वापराव यासाठी फार चर्चा झाली. दत्तो वामन पोतदार यांनी इंग्रजीतील ' Folklore' चे भाषांतर म्हणून ' लोकविद्या' हा शब्द वापरला पण तो रुढ झाला नाही. रा. चिं. ढेरे यांनी ' लोकतत्त्व' हा शब्द सुचवला. ' लोकसाहित्याची रुपरेखा' या ग्रंथात श्रीमती दुर्गा भागवत यांनी ' लोकसाहित्य' हा परिभाषिक शब्द वापरून त्यातील अर्थाची व्यापकता स्पष्ट केली. पुढे दुर्गा भागवत यांनी वापरलेली संज्ञा रूढ झाली.

### २.२.१ लोकसाहित्य म्हणजे काय?

लोकसाहित्य या शब्दाची फोड केल्याने ‘ लोक’ आणि ‘ साहित्य’ या दोन पदांचा वापर होतो. ‘ Folklore’ ही संज्ञा वापरण्यापूर्वी Popular Antiquities असे म्हटले जायचे. Folklore या संज्ञेत कोणत्या गोष्टीचा समावेश होतो व कशाला लोकसाहित्य म्हणतात या संदर्भात अनेक लोकसाहित्याभ्यासकांनी आपली मते मांडली, त्या विषयी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे:-

- “ लोकसाहित्य हे आदिमानवनिर्मित असून परंपरा प्राप्त असते”लोकसाहित्य हे आदिमानवनिर्मित असून परंपरा प्राप्त असते, त्याचप्रमाणे ते सुसंस्कृत मानवाने निर्मिलेले असते. हो निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्याद्वारे पद्य किंवा गद्य स्वरुपात केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकभ्रम, रूढी, लोककलाप्रकार, त्याचप्रमाणे नृत्य, नाट्य, इत्यादींचा अंतर्भाव त्यात होतो. लोकसाहित्य हे समूहाच्या आविष्काराचे शास्त्र नाही, तर लोकसमूहाच्या परंपरागत चालत आलेल्या जीवनाच्या आविष्काराचे शास्त्र आहे.”

**- जॉन्स बॅलिस.**

- “लोकसाहित्य म्हणजे मिथ्स, म्हणी, लोकगीते आणि अशाप्रकारे भाषेच्या माध्यमातून अभिव्यक्त होणारे पारंपरिक कलात्मक आविष्कार होय.”

**- विल्यम बॅस्कम,**

- “मौखिक स्वरुपात संक्रमित होणाऱ्या साहित्याला लोकसाहित्य म्हणतात. हे लोकसाहित्य दूर राहणाऱ्या आदिम जातींमध्ये, सुशिक्षित, नागर, ग्रामीण, उच्चवर्गीय लोकांमध्ये असते. मौखिक परंपरा हेच या साहित्याचे प्रमुख लक्षण आहे.”

**- फ्रांसिस उटली.**

- "लोकसमूहाचे पारंपरिक जीवन म्हणजेच व्यापक अथनि लोकसाहित्य असे म्हटले जाते. लोकसाहित्यात, लोकविश्वास, लोकभ्रम, विधी, धार्मिक आचार, तसेच दैवतकथा, लोककथा, लोकगीते यांचा समावेश होतो. मात्र संगीत नृत्य चित्रकला या गोष्टी लोकसाहित्याशी संबंधित अशा असूनही त्या मूलतः भिन्न आहेत."

**- एम्. डब्ल्यू. स्म**

- "लोकसाहित्य म्हणजे माझ्या दृष्टीनेतरी लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक परंपरेने प्राप्त झालेले जे वाङ्मय तेच होय. बाना कर्ता लोकच अर्थात अज्ञात अशी लोकमानसातील व्यक्ती यास्तव लोकांनी केलेले लोकभाषेत केलेले आणि लोकांच्या परंपरेने चालत आलेले जे वाङ्मय तेच लोकवाङ्मय होय. वाङ्मयाच्या या प्रकारात लोककथा, कहाण्या, आहाणे, उखाणे आणि लोकगीते येतात."

**ना.गो. नांदापूरकर.**

- "लोकसाहित्यात लोकप्रतिभेचा आविष्कार असतो. तसेच लोकांच्या पारंपरिक जीवनाचा संदर्भ दडलेला असतो. लोकसाहित्य हे लोकमानसाचा आविष्कार असते. त्यातून समाजमानस अभिन्यक्त होते."

**-प्रभाकर मांडे.**

लोकसाहित्य म्हणजे जे मौखिक परंपरेने एका पिढ़ीपासून दुसऱ्या पिढ़ीकडे संक्रमित होते. लोकसाहित्य ठळकपणे एका व्यक्ति निर्मिले असे सांगता येत नाही. लोकसाहित्य ही समुह मनाची निर्मिती असते. लोकसाहित्याचा कर्ता अनामिक असतो. लोकसाहित्यामध्ये लोककथा, लोकगीते, लोककथा गीते, वाक्प्रचार, म्हणी, उखाणे, कोडी, विधीनाट्य, लोकनाट्य इ. गोष्टीचा समावेश होतो.

**२.३ लोकसाहित्याचे स्वरूप :**

लोकसाहित्य जे मौखिक परंपरेने एका पिढ़ीपासून दुसऱ्या पिढ़ीकडे संक्रमित होते. लोकसाहित्य हे अलिखित असते. लोकसाहित्याचा कर्ता अनामिक असतो. लोकसाहित्य हे एका व्यक्तीचे नसते ती समुहाची निर्मिती असते. यातून मानवी मनाचे, समाज व्यवहाराचे व सांस्कृतिक परंपरेचे प्रकटीकरण होत असते. ‘ लोक’ आणि ‘ साहित्य’ या दोन पदाने हा शब्द बनला आहे.

‘ लोकसाहित्य’ हा लोकसंस्कृतीचा एक भाग असतो लोकांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीतून लोकसंस्कृतीला विविध पैलू लाभत असतात. लोकसाहित्याची निर्मिती आणि प्रचलन लोकजीवनातच होत असल्याने लोकसंस्कृतीच्या जडणघडणीत लोकसाहित्याचा वाटा असतो. म्हणूनच लोकसाहित्याला समाज व संस्कृतीच्या अभ्यासात महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. ‘लोकसाहित्य’ म्हणजे लोकजीवनाचा इतिहास असे म्हणता येते. लोकसाहित्यातून गत जीवनाचा शोध घेता येतो.

परंपरागत जीवन जगणाऱ्याचे मौखिक रूपातील शब्द आविष्कार म्हणजेच लोकसाहित्य नसते, तर त्यात शब्देत्तर अन्य आविष्कारांचाही समावेश असतो. लोकसाहित्य ही व्यापक संकल्पना आहे. कथा, उखाणे, व म्हणी म्हणजेच लोकसाहित्य ही संकल्पना दूर होऊन पारंपरिक लोकजीवन पद्धती म्हणजे लोकसाहित्य असे व्यापक स्वरूप लोकसाहित्याला प्राप्त झालेले आहे. पारंपरिक लोकजीवनाच्या सर्व माध्यमातून होणाऱ्या आविष्कारांचा समावेश लोकसाहित्यात होत असल्याने लोकसाहित्याची व्याप्ती एकूणच पारंपारिक लोकजीवनाला व्यापणारी आहे.

## २.३.१लोकसाहित्याची व्याप्ती :

**२.३.१.१मौखिक आविष्कार**

जे शब्दबद्ध किंवा वाणीमय आहे या सर्वाचा समावेश मौखिक आविष्कारामध्ये केला जातो. हा आविष्कार गद्य आणि पद्य या दोन स्वरूपात असतो.  लोककथा गद्य स्वरूपात असतात. लोकथाचे प्रकार परिकथा, दैवतकथा इ. चा समावेश केला जातो. तर पद्य साहित्यात लोकगीताचा समावेश होतो. लोकगीतात लावण्या, पोवाडे,

अभंग, ओव्या, बालगीते, दैवतगीते, भजने, भारुडे यांचाही समावेश होतो. या सर्व गोष्टी मौखिक परंपरेने एका पिढ़ीकडून  दुसऱ्या पिढ़ीकडे संक्रमित होत असून यांचा कर्ता हा अज्ञात असतो. यामध्ये म्हणी, वाक्यप्रचार, उखाणे इ. गोष्टीचा ही समावेश होतो. लोकसाहित्यातील मौखिक परंपरेने चालत आलेल्याया साहित्याला verbal art असेही म्हणतात.[ii]

**१.३.१.२भौतिक संस्कृती –**

लोकसाहित्यामध्ये भौतिक संस्कृतीचाही समावेश होतो. यांत्रिकीकरणापूर्वी लोकजीवनात जी भौतिक संस्कृती होती आणि अजूनही जी परंपरने चालत आहे त्या सर्वांचा समावेश होतो.  लोकांची कौशल्ये, तंत्रे इत्यादींचा समावेश होतो. यामध्ये सुतार, लोहार, कुंभार, सुवर्णकार यांचे कौशल्यपूर्ण काम, कलाकुसर इ. च्या आंतर्भावाबरोबरच वस्त्र विणणे, भांडी तयार करणे, घरे बांधणे, घर सजाविणे, पोषाख व त्याचे विविध प्रकार, पाककला, भविष्य, जगण्याची कला शेती कसण्याची पद्धती या सर्व गोष्टीचा लोकसाहित्यात समाविष्ट होतो. यामध्ये वाङ्मय हा भाग येत नाही. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे परंपरने चालत आलेली जी कौशल्य आहे यांचा समावेश होतो. यामध्ये पारंपारिक व्यवसाय, व्यावसायातील कौशल्ये, आदिवासींच्या विविध कला, तोडगे, वास्तुशास्त्र, वैद्यकशास्त्र, यंत्रतंत्र याही गोष्टींचा अंतर्भाव लोकसाहित्यात होतो.[iii]

**१.३.१.३ लोकरुढी, विधी, समजुती इत्यादी :**

लोकसाहित्याचा तिसरा आणि बराच मोठा असलेला विभाग म्हणजे लोकरुढी,विधी, लोकसमजुती, लोकश्रद्धा आणि लोकभ्रम हा होय. पारंपारिक जीवन जगणाऱ्या लोकांच्या लोकमनात असलेल्या कल्पना, भाव-भावन श्रद्धा यांचा आविष्कार कृतिद्वारा केला जातो. समूहाने केलेल्या कृतींचा अंतर्भाव यामध्ये होतो. परंपरेने ज्या विधी, रुढी चालत आलेल्या आहे यांचा समावेश यामध्ये होतो. रुढी आणि विधी यांच्या मुळाशी काही लोकविश्वास, लोकभ्रम किंवा लोकसमजुती असतात. या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात केलेला आहे. जन्म, लग्न, बारसे, मार्तिक इ. विधी त्याचबरोबर दृष्ट काढणे, बाहेर बाधा होऊ नये म्हणून केल्या जाणाऱ्या कृती, जादू-टोणा, करणी या सर्वांच्या मागे कुठली तरी समजूत असते. या समजुतींचा, लोकविश्वासांचा आणि त्यानुसार केल्या जाणाऱ्या कृतींच्या मागे परंपरा असते.

सण- उत्सव, जत्रा-यात्रा या प्रमाणेच गावात साजरे केले जाणारे सामुदायिक उत्सव, विधी, ग्रामदेवतांची कृपा असावी म्हणून केलेला विधी, त्यांच्याविषयी असलेल्या लोकमनातील श्रद्धा, भय यातून केले जाणारे नवस, व्रत-वैकल्ये अशा असंख्य बाबी लोकजीवनात परंपरेने प्रचलित असतात. या सर्व बाबींचा समावेश लोकसाहित्याच्या या विभागात होतो. लोकसाहित्यातील या विभागाचे वैशिष्ट्य म्हणजे लोकवाङ्मय आणि भौतिक संस्कृती यांच्यापेक्षा हा विभाग वेगळा असला तरी या दोन्ही विभागातील बाबींशी त्यांचा जवळचा संबंध असतो.[iv]

**१.३.१.४ प्रयोगसिद्ध लोककला :**

लोकसाहित्याच्या या विभागात परंपरेने लोकजीवनात आविष्कृत होणाऱ्या लोककलांचा समावेश होतो. लोकजीवनात निरनिराळ्या विधीच्या निमित्ताने होणारी लोकनृत्ये, खेळ म्हणून खेळली जाणारे नृत्य- खेळ तसेच मनोरंजनासाठी केली जाणारी लोकनाट्य, लोकसंगीत, सण-उत्सव विधी प्रसंगी भिंतीवर रेखाटली जाणारी चित्रे, घरापुढील रांगोळी, नागपंचमी अशा प्रसंगाच्या निमित्ताने होणारी सर्व प्रयोगरुपे म्हणजे प्रयोगात्म किंवा प्रयोगसिद्ध लोककला असून या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात होतो. प्रयोगसिद्ध लोककलामध्ये प्रत्यक्ष सादरीकरण केले जाते. यामध्ये संवाद आणि गण्यांना महत्त्वाचे स्थान असते.

लोकसंख्येच्या या चार विभागात लोक जीवनातील पारंपरिक चालत आलेल्या सर्व विशेषांचा समावेश होतो असे नाही. जीवनाच्या विविध अंगाने लोकसाहित्य प्रकट होत असते. त्याचे माध्यम लोकभाषा, कृती अभिनय, हे असते या सगळ्यांचा समावेश लोकसाहित्यात करावा लागतो. लोकसाहित्य एक व्यापक अशी संकल्पना असल्याने तीची सीमा निश्चित करणे अवघड जाते.[v]

**२.३.२ लोकसाहित्याची लक्षणे :**

लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन या पुस्तकामध्ये पुरुषोत्तम कालभूत यांनी लोकसाहित्याची खालील लक्षणे नोंदवली आहेत.

- लोकसाहित्य हे मौखिक किंवा अलिखित स्वरूपात असते.
- लोकसाहित्य हे एका पिढीकडे सचित ज्ञान असते. ते पुढील पिढीकडे सोपवीले जाते.

- पारंपारिकता हा लोकसाहित्याचा प्रभावी गुण आहे.
- लोकसाहित्याचा काळ हा कालातित वर्तमान असतो. पर्यायाने तो नोहमीच सजीव वाटतो.
- लोकसाहित्य समूह मनाची निर्मिती असते. त्याचा करता अज्ञात असतो. लोकसाहित्य हे व्यक्ति विशिष्ट न राहता समष्टीचे होते. येथेच ते ललित साहित्याहून वेगळे ठरते.
- लोकसाहित्य हा लोक संस्कृतीचा आरसा असल्याने लोकसंस्कृतीच्या अध्ययनासाठी लोकशाहीत सुलभ ठरते.
- लोकसाहित्य हा लोकमाणसाचा अविष्कार आहे.
- लोकसाहित्यात परंपरा टिकवणे आणि त्या पुनरुपजीवीत करणे ह्या क्रिया घडतात. लोकसाहित्य हे परिवर्तनशील असते लवचिक असते.
- लोकसाहित्यहे लोक भ्रमातून किंवा आभासी सृष्टीतून निर्माण झालेले असते.
- लोकसाहित्य हे कला आणि वाङ्मय याचा प्रभावी स्तोत्र आहे.
- लोकसाहित्य हे कोणत्याही संस्कृतीच्या अभिसरणाबरोबर त्याच्या अभ्यासाचे हे साधन ठरते.
- लोकसाहित्याचे संपादन, विकसन, संक्रमण हे पिढ्यान पिढ्या सहज व स्वाभाविकपणे चाललेले असते.
- लोकसाहित्यत्यात टिकून राहण्याची प्रवृत्ती दिसते. लोकसाहित्य समाजात होणारे नवनवीन बद्दल आत्मसात करते.
- लोकसाहित्य हा लोकसमुहाचा भावनिक अविष्कार आहे. लोकसाहित्य हा केवळ शाब्दिक आविष्कार ठरू शकत नाही.

## **२.४ लोकसंस्कृती :-**

लोकसंस्कृती हा लोकसाहित्याच्या अभ्यासाचा महत्त्वाचा घटक आहे. किंबहुना मूळ पाया आहे. लोकगीते, लोककथा, लोकनृत्ये, धार्मिक विधी, सण सोहळे आणि व्रतवैकल्ये समजून घेण्यासाठी आधी लोकसंस्कृती समजून घेतली पाहिजे. संस्कृती त्या समाजाचा, प्रदेशाचा आरसा असतो. संस्कृती ही फार गुंतागुंतीची

संज्ञा आहे. सर्वसामनपणे व्याख्या करणे कोणालाही शक्य नाही. तरीही काही पाश्चात्य अभ्यासकांनी व भारतीय अभ्यासकांनी व्याख्या केल्या आहे. त्या पुढीलप्रमाणे :-

**पाश्चात्य अभ्यासक :-**

- " समाजाचा एक सदस्य म्हणून मानव जे ज्ञान, कला, श्रद्धा, नीतीतत्त्वे, कायदे, परंपरा, आणि इतर क्षमता, सवयी तसेच इतर तत्सम गोष्टी सपादित करतो, त्या सर्वांच्या संमिश्र एकीकरणास संस्कृती असे म्हणतात."

  \- **एडवर्ड टेलर**

- " ज्याच्याद्वारे मानव आपली उदिष्टे साध्य करतो ती मानव निर्मिती साधनेव माध्यम म्हणजेच संस्कृती होय."

  \- **मॅलिनोव्हस्की**

**भारतीय अभ्यासक:-**

- " मनुष्य समाजाच्या डोळयांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळयांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय."

  **- इरावती कर्वे**

प्रत्येक देशाची, ठिकाणाची व समाजाची संस्कृती वेगवेगळी. संस्कृतीमध्ये बदल होत जातो. परिवर्तन हा संस्कृतीचा महत्वाचा गाभा आहे. म्हणून संस्कृतीची सुटसुटीत व्याख्या करता येत नाही.

## २.५ गोवा

भारताच्या नकाशावर छोटा दिसणारा पण समृद्ध असा भूभाग म्हणजे गोवा. गोवा भारताच्या दक्षिण भागातील पश्चिम किनाऱ्यावर वसलेले राज्य आहे. निसर्गाने नटलेला असा प्रदेश. चोहीकडे समुद्रकिनारे, नद्या, उंच उंच डोंगराने भरलेला प्रदेश आहे.

गोमंत, गोवा, गोमंतक अशी तीन नावे या प्रदेशाला दिलेली आढळतात. या तीन्ही नावामध्ये ' गो' हे प्रमुख अक्षर आहे. संस्कृत भाषेत ' गो' म्हणजे गाय, गुरे, जनावरे असा अर्थ आहे.यात गोपराष्ट्र व गौवराष्ट्र हे दोन शब्द आहेत. इथे महत्वाचा मुद्दा असा आहे की भौगोलिक दृष्ट्या हा प्रदेश व  परिसर गोपालनाला अत्यंत प्रतिकूल असा आहे. कृषी संस्कृतीतील गुरे-ढोरे सोडली तर भट-ब्राह्मण खेरीज इथल्या लोकांचा परंपरेने गोपालन व दुधातुपाशी कोणताही संबंध नव्हता. धनगर या भटक्या जमातीची पारंपारिक गीत सोडली तर मौखिक परंपरेत दुधातुपाचे कोणतेही उल्लेख नाहीत.  गुवा म्हणजे सुपारी, त्यावरून हा सुपारीचा प्रदेश होता असे सांगणारा एक वर्ग आहे. परंतु पूर्वकाली गोव्यात कुठेही सुपारीचे उत्पादन होत असल्याचा पुरावा मिळत नाही.

### २.५.१ भौगोलिक गोवा

गोवा हे भारतीय संघराज्यातील पंचविसावे घटकराज्य आहे. गोवा भारताच्या दक्षिण भागातील किनाऱ्यावरचे छोटेसे राज्य आहे. त्याच्या उत्तर भागात महाराष्ट्र व दक्षिण व पूर्वेकडच्या भागात कर्नाटक राज्य अशा गोवा राज्याच्या सीमा आहेत. पश्चिमेला १५० कि. मी. चा विस्तीर्ण अरबी समुद्र पसरला आहे.गोव्याचे क्षेत्रफळ ३,७०२ चौ. कि. मी. असून गोव्याची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १४, ५७, ७२३ इतकी आहे. यात पुरूषांची संख्या ७,१७,०२१ तर महिलांचे संख्या ७,१७,०२१ इतकी आहे.[vi]

१९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा पोर्तुगीजांच्या जुलमी काचातून मुक्त झाला, तेव्हा दमन आणि दीव मिळून गोवा एकच क्रेंदशासित प्रदेश बनला. त्यानंतर पुढे ३१ मे १९८७ रोजी दमण आणि दीव हे भाग बाजूला काढून गोवा हे भारताचे एक स्वतंत्र घटक राज्य बनले. पणजी ही गोव्याची राजधानी आहे. आज गोव्यात बारा तालुके व दोन्ह जिल्हे आहेत.

सह्याद्री पर्वताचा सुमारे ६०० चौ.कि.मी. चा प्रांत गोव्यात आहे. गोव्याच्या पूर्व- उत्तर चारही बाजूने अर्धचंद्रकार आकाराची सह्यकड्याची १२५ कि.मी. ची रांग आहे, तसेच पूर्वेकडील भागात सह्याद्रीच्या उंच कडेकपारी आढळतात. ' दूधसागरा' येथील ३९० फूट धबधबा पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. 'हरवळे' येथील धबबा ६० फूट आहे. उत्तर गोव्यात ' सोसोंगड' , वाघेरी, मोर्ले गड असे उंच डोंगर आहेत. दक्षिण भागत बोरी फोंडा येथील सिद्धनाथ, पारोडा येथील चंद्रनाथ, हे डोंगर आहे. महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यांत ये - जा करण्यासाठी अनेक 'घाट' रस्ते आहे. उदा. अनमोड घाट, केळावडे इ.

गोव्यात ' मांडवी', 'जुवारी', 'साळ', 'तळपण', ' गालजिबाग', ' चोपडे', ' तेरेखोल' या महत्त्वाच्या नद्या आहेत. मांडवी नदीची ३९ कि.मी. असून गोव्यातील सर्वांत जुनी नदी आहे. गोव्याते छोटे-मोठे तलाव ही पहायला मिळतात. अनेक लोक गोव्यात मासे विकून आपले घर चालवतात.

साधारणपणे इ.स १९२० नंतरच्या काळात गोव्याच्या तांबड्या मातीत असणाऱ्या मंगल (Manganese) आणि लोह (iron) धातूंचा शोध लागल्याने डोंगरांना विशेष महत्व प्राप्त झाले. निकृष्ट वाटणाऱ्या जमिनींना मोल आले. त्यामुळे जंगलतोड मोठ्या प्रमाणात झाली. ती माती गोव्याबाहेर जाऊ लागली. यामुळे गोव्याला आर्थिक लाभ झाला पण निसर्गावर मोठा परिणाम झाला. रस्त्याच्या बाजूला असलेली हिरवीगार रोपटे तांबडीलाल दिसू लागली. 'खाण' व्यवसायामुळे अनेक जमिनी नापिक बनल्या, गोव्यातीला लोकमानसावर त्याचे बरेवाईट परिणाम झाले.[vii]

### २.५.२ सांस्कृतिक गोवा

गोव्याची परंपरा समृध्द आहे आणि विविध संस्कृतीचा अनोखा वारसा तिच्याकडे आहे. गाव्याची संस्कृती ही भारतीय आणि पोर्तुगीज संस्कृतीचे मिश्रण आहे. कोकणी व मराठी ह्या दोन गोव्याच्या प्रमुख भाषा आहे. शेती व मासेमारी हे गोव्यातीला प्रमुख उद्योग आहेत. आज गोव्यात अनेक लोक मासे विकून आपले पोट भरतात.

गोव्यात गणेशोत्सव शिमगा, दसरा, दिवाळी या सणाबरोबर नातळ हा सण ही उत्सहाने साजरा करतात. नृत्य आणि संगीत हे गाव्याच्या संस्कृतीत खोलवर रुजलेले आहे. गोव्यातील सर्वात लोकप्रिय नृत्य प्रकार म्हणजे

फुगडी आणि धालो, जे पारंपरिक नृत्य आहेत. हे नृत्य एखाद्या सणाला फक्त स्त्रिया सादर करतात. शिग्मो हा नृत्य गोव्यातील लोक ढोल, ताशा किंवा झांजांच्या तालासह रंगीबिरंगी कपडे घालून सादर करतात.

गोव्याची संस्कृती विविधतेने नटलेली आहे. एक अलौकिक असा संस्कृतिक वारसा लाभलेला आहे. गोव्यात पोर्तुगाली संस्कृतींचा प्रभाव झालेला दिसतो.

### २.६ धारबांदोडा तालुका

भारतातले सर्वांत लहान राज्य म्हणजे गोवा. गोव्यात उत्तर आणि दक्षिण असे दोन जिल्हे आहेत आणि पेडणे, बार्देझ, डिचोली, सत्तरी, तिसवाडी, फोंडा, मुरगांव, सालसेत, सांगे, केपे, काणकोण, धारबांदोडा असे बारा तालुके आहेत. या बारा तालुक्यातील बारावा तालुका म्हणजे धारबांदोडा तालुका.

### २.६.१ भौगोलिक सीमारेषा

२५ मार्च २०१० रोजी गोव्याचे मुख्यमंत्री दिगंबर कामत यांनी गोवा विधानसभेसमोरील त्याच्या अर्थसंकल्पीय भाषणात नवीन धारबांदोडा तालुका, गोव्यातील बारावा तालुका निर्माण करण्याची घोषणा केली होती. गोव्याचे महसूल मंत्री जोस फिल्म डिसोझा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तालुक्याच्या निर्मितीचे नेतृत्व केले.

धारबांदोडा तालुका ४ एप्रिल २०११ रोजी दक्षिण गोवा जिल्ह्याचा एक भाग म्हणून अस्तित्वात आला. सतीश आर प्रभू हे तालुक्याचे पहिले मामलेदार होते. १६ मार्च २०११ रोजीच्या अधिसूचनेद्वारे गोवा सरकारने आगलोट, बंदोली, कॅमरकोंडा, कारनझोल, कोडली, कोलेम, कारमोनेम, धारबांदोडा, मोलेम, मोईसल, पिलीम, सांकोर्डेम, सांगोड, सिगाव, सोनौली आणि सुर्ला या गावांना अधिसूचित केले. गाजेम आणि उसगाव ह्या दोन गावाचा ही धारबांदोडा तालुक्यात समावेश केला होता पण त्या गावातील लोकांनी या गोष्टीला विरोध केला.२० मे २०११ च्या दुसऱ्या अधिसूचनेद्वारे गाजेम आणि उजगाव ही गावे फोंडा तालुक्याला परत करण्यात आली.

### २.६.२ सामाजिक धारबांदोडा

२०११ च्या जनगणनेनुसार, धारबांदोडा तालुक्याची लोकसंख्या ३०,००० ते ४०,००० आहे. धारबांदोडा तालुक्यात अनेक जाती- जमातीचे लोक राहातात. गुरखे, डोंगरवाडी, पळसकाटा, कोलेम, सातपाल इ. गावामध्ये धनगर गावामध्ये धनगर समाजाच्या जास्त वस्त्या पहायला मिळतात.

धारबांदोडा तालुक्यातील धनगर समाजाचा प्रमुख व्यवसाय गुरे, बोकरे पाळणे व शेती करणे हा होता. प्रमुख अन्य म्हणजे नाचण्याची भाकरी, चटणी, पेज हे होते. धनगर समाजातील पुरुषमंडळी तुवाला ( रुमाल) नसून, खांद्यावर घोंमडे, हातात काठी घेवून सकाळी आपल्या गुरा- वासरा, बोकड्या बरोबर रानात जात होते. घरातील स्त्रिया घरातील सर्व कामे करत होती. स्त्रियांचा पोषक नऊवारी कापड आणि कपळावर आडवे कुंकू असा होता.

आज या जीवनशैलीत थोडाफार बदल झालेला दिसून येतो. पूर्वीप्रमाणे आज धनगर समाजातील लोक अशिक्षित नाही. आज लोक फक्त पारंपरिक व्यवसाय सांभळत नाही तर त्या बरोबर नोकऱ्या ही करत आहे. धारबांदोडा तालुक्यातील धनगर समाजातील लोक डॉक्टर, नर्स, पोलीस, शिक्षक अशा चांगल्या पदावर वावरताना दिसतात.

सण उत्सव आपल्या पारंपरिक पद्धतीने वर्तमानात ही करतात. धनगर समाजातील लोकांचा दसरा हा प्रमुख सण आहे. हा सण वर्तमानात मोठ्या उत्साहाने केला जातो.

### २.६.३ सांस्कृतिक धारबांदोडा

धारबांदोडा तालुक्यामध्ये अनेक जाती- जमातीचे, धर्माचे लोक राहतात. प्रत्येक समाजाची वेगवेगळी संस्कृती आहे. प्रत्येक समाजाचे लोकसाहित्य वेगळे आहे.

धारबांदोडा तालुक्यात अनेक सांस्कृतीक स्थळे ही आढळतात. धारबांदोडा तालुक्यातील तांबडीसुर्ला- साकोर्डा येथील श्री महादेव मंदिर हे जागतिक वारसा स्थळ म्हणून जगप्रसिद्ध असल्याने देश-विदेशातून पर्यटक मोठ्या संख्येने भेट देण्यासाठी येत असतात. सुट्टीच्या दिवसांत पर्यटकांची मोठ्या प्रमाणात मंदिर परिसरात गर्दी उसळत असते. पावसाळ्यात निसर्गाचा मनसोक्त आनंद लुटण्यासाठी पावसाळी पर्यटकांची संख्या लक्षणीय असते. शिव मंदिर हे सह्याद्री पर्वताच्या हिरव्यागार वनराईच्या सान्निध्यात वसलेले असल्याने मंदिराच्या सौंदर्यात कमालीची

भर पडते. शिवाय मंदिराच्या सभोवताली आकर्षक बागेची रचना केल्यामुळे आणि निसर्गाचा अद्भुत वरदहस्त लाभल्यामुळे पावसाळयात पर्यटक मोठ्या प्रमाणात मंदिराकडे आकर्षित होत असतात.

अनमोड घाटाच्या पायथ्याशी दुधसागर धबधबा पावसाळयात ओतप्रोत भरून वाहत असतो. धबधब्याला निसर्गाने चोहीबाजूने वेढल्याने तो पर्यटकांना आकर्षित करत आहे. पर्यटकांना साधारण तासभर चालत धबधबा गाठावा लागतो. धारबांदोडा तालुक्यातील लोकांची दुधसागर देव मारलेला हाकेला पावतो अशी धारणा आहे.

**२.७ समारोप**

लोकसाहित्यचा अभ्यास करताना त्याची व्याप्ती लक्षात येते. लोकसाहित्य ही एक व्यापक अशी संज्ञा आहे. Popular Antiquities ह्या संज्ञापासून Folklore ची सुरुवात झाली. सर विल्यम थॉमस ह्या इंग्रजी पुरतत्वज्ञाने Folklore ही संज्ञा सर्वप्रथम वापरली. लोकसाहित्याच्या अभ्यासाची सुरुवात पाश्चात्य देशात झाला. भारतामध्ये लोकसाहित्याच्या अभ्यासाचा प्रारंभ ब्रिटिशांच्या राजकीय आगमनाने झाला. महाराष्ट्रातही लोकसाहित्याच्या संकलनाचे आणि संशोधनाचे महत्त्वाचे कार्य झाले.

आज जगभर या अभ्यासाला स्वतंत्र स्थान प्राप्त झाले. युरोप-अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये आणि उचशिक्षण देणाऱ्या अनेक संस्थांमध्येही हा अभ्यास सुरु आहे. भारतामध्ये वेगवेगळया राज्यांत त्या त्या भाषेतील लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ झाला. पुढे गोमंतकात ही लोकसाहित्याचा अभ्यास झालेला आढळतो.

गोव्यातील धारबांदोडा तालुक्यात अनेक जाती- जमातींचे लोक राहतात. त्यामध्ये धनगर समाजाच्या वस्त्या पहायला मिळतात. पूर्वी भटकणारा हा समाज आज एकाच ठिकाणी स्थिर झालेला पहायला मिळतो. हा समाज इतर समाजापेक्षा वेगळा असेलेला दिसून येतो. या समाजाचे लोकसाहित्य इतर समाजापेक्षा वेगळे आहे.

सदर प्रकरणामध्ये लोकसाहित्याची संकल्पना ते स्वरूप, लोकसाहित्याची व्याप्ती, व्याख्या, लक्षणे इ. चा विचार केला गेला आहे. त्याचप्रमाणे गोव्याची भौगोलिक सीमारेषा, सांस्कृतिक गोवा आणि धारबांदोडा तालुका व तेथील धनगर समाजाचा अभ्यास केला आहे.

**२.८ निष्कर्ष**

1. लोकसाहित्य म्हणजे काय हे जाणून घेण्यासाठी त्याची संज्ञा, व्याखा, स्वरूप व्याप्ती, लक्षणे अभ्यासताना एक गोष्ट लक्षात ती म्हणजे सुरुवातील लोकसाहित्याचा अभ्यास हा इतर शास्त्राची साम्रगी म्हणूनच केला जात होता.
2. गोव्याची संस्कृती ही भारतीय आणि पोर्तुगीज संस्कृतीचे मिश्रण आहे.
3. धनगर समाज ही पूर्वी  भटकी जमात ओळखली जात होती. धनगर समाज हा एका वर्तमानात एका जागेवर स्थिर झाला आहे. धनगरांची मुली शिकू लागली आहे. आधुनिक सुविधाचा लाभ वर्तमानात त्यांना होत आहे. वर्तमानान धनगर लोकांची पक्की घर आहेत. या कारणामुळे आज धनगर समाजाला भटकी जमात म्हणून संबोधू शकत नाही.
4. आज गोव्यामध्ये अनेक ठिकाणी धनगर समाजाच्या वस्त्या पहायला मिळतात. धनगर समाज आज एका ठिकाणी स्थिर झाला आहे.

**संदर्भ सूची :-**

[i] १.कालभूत पुरुषोत्तम : " लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन". विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, १० जानेवारी २००७. पृ. क्र.

[ii] ३.कालभूत पुरुषोत्तम : " लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन". विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, १० जानेवारी २००७. पृ.क्र.२५.

[iii] ४.कालभूत पुरुषोत्तम : " लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन". विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, १० जानेवारी २००७. पृ.क्र २५.

[iv] कालभूत पुरुषोत्तम : " लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन". विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, १० जानेवारी २००७. पृ.क्र.२६.

[v] कालभूत पुरुषोत्तम : " लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन". विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, १० जानेवारी २००७. पृ.क्र.२६

[vi] महांबरे डॉ. स्नेहा सुवास प्रभु: " गोव्यातील धालो या लोकनाट्य कलाप्रकाराचा चिकित्सक अभ्यास". शुभश्री प्रकाशन, ५ सप्टेंबर २०१५. पृ.क्र. ५

[vii] महांबरे डॉ. स्नेहा सुवास प्रभु: " गोव्यातील धालो या लोकनाट्य कलाप्रकाराचा चिकित्सक अभ्यास". शुभश्री प्रकाशन, ५ सप्टेंबर २०१५. पृ.क्र. ८

**व्यक्ती नामसूची**

गंगी शेळके- वय-६८, पत्ता- पळासकाटा, शेळके कुटुंबातील मुख्य स्त्री.

# प्रकरण ३

# पळासकाटा परिसरातील धनगर समाज


३.१ प्रास्ताविक ........ 24

३.२ पळसकाटा नावाची उत्पत्ती. ........ 24

३.२.२ धनगर समाजाची लोकसंख्या ........ 26

३.३ सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व धार्मिक दृष्ट्या धनगर समाजाचा अभ्यास ........ 27

३.३.१ सांस्कृतिक दृष्ट्या ........ 27

३.३.२ सामाजिक दृष्ट्या ........ 29

३.३.३ आर्थिक दृष्ट्या ........ 30

३.३.४ धार्मिक दृष्ट्या ........ 30

३.४ समारोप ........ 31

३.५ निष्कर्ष ........ 32

संदर्भ सूची ........ 32

# प्रकरण -३

# पळसकाटा परिसरातील धनगर समाज

## ३.१ प्रास्ताविक

धारबांदोडा तालुका ४ एप्रिल २०११ रोजी दक्षिण गोवा जिल्ह्याचा एक भाग म्हणून अस्तित्वात आला. धारबांदोडा तालुका गोव्यातील बारावा तालुका म्हणून ओळखला जातो. धारबांदोडा तालुका म्हटले की अनेक जाती – धर्मांचे लोक या तालुक्यात वावरणारे डोळयासमोर उभे राहतात. अनेक वर्षांपासून हे लोक येथे वास्तव्य करून आहेत.

‘ पळसकाटा’ हा धारबांदोडा तालुक्यातील एक छोटासा गाव आहे. पळसकाटा गावामध्ये हिंदू, मुस्लिम, ख्रिचन जाती – धर्मांचे लोक राहतात. या गावामध्ये धनगर समजाच्या जास्त वस्त्या आहेत. अनेक वर्षापासून धनगर लोक इथे वास्तव्य करून आहेत. सर्वांत अगोदर या गावामध्ये धनगर समाजातील लोकांनी आपली वस्त्यी मांडली. कालंतराने या गावामध्ये अनेक जाती- धर्मांचे लोक येऊन आपली वस्त्यी मांडू लागले. असे असले तरी या गावामध्ये जास्त धनगर समाजाची घरे पहायला मिळतात.

## ३.२ पळसकाटा नावाची उत्पत्ती.

सुमारे देडशे वर्षांपूर्वी पळसकाटा हा गाव फक्त एक जंगल होते. गावमध्ये काटेरी काजराची असंख्य झाडे होती. त्याचप्रमाणे काही प्रमाणात पळसाची ही झाडे होती. आज जास्त संख्येत नाही तरही कमी संख्येत आढळतात.

‘पळसकाटा' या नावाचा विचार केला तर एक लक्षात हे नाव निसर्गाला धरून दिले आहे. गावामध्ये पळसाची झाडे असल्यामुळे ‘ पळस’ हा शब्द वापरला. काजऱ्याच्या झाडाना काटे असतात म्हणून ‘ काटा’ हा शब्द घेतला. **‘पळस’** आणि **‘काटा’** हे दोन्ह शब्द मिळून **‘पळसकाटा'** हे नाव अस्तित्वात आले आहे. गावात डेअरी फार्म असल्यामुळे या गावाला वर्तमानात **धाटफार्म** असे ही नाव पडलेले आहे.

### २.२.१ भौगोलिक पळसकाटा

' पळसकाटा' हा धारबांदोडा तालुक्यातील एका छोटासा आणि समृद्ध गाव आहे. या गावामध्ये हिंदू, ख्रिचन, मुस्लिम जातीचे लोक राहतात. गावामध्ये ५०-१०० लहान मोठी घरे आहेत. ३००- ३५० या गावाची लोकसंख्या आहे. हा गाव मोले पंचायतेच्या अंतर्गत येतो. गावामध्ये प्रथम पंच भागी सगो सुझारे ही महिला होती. वर्तमानामध्ये वर्षा सुझारे पंच आहे. या दोन्ही महिला धनगर समाजामधील आहे.

' पळसकाटा' हे निसर्गाच्या कुशीत वसलेले छोटसे गाव आहे. गावाच्या चारही बाजूनी उंच झाडे आहेत. गावातील नदी वर्षभर वाहत असते. यामुळे गावातल्या लोकांना पाण्याचा प्रश्न नसतो. विविध प्रकारच्या वनस्पती गावामध्ये मिळतात.

पूर्वी हे गाव फक्त एक घनदाट जंगल होते. गावामध्ये जास्त तर काजराची झाडे होती. या गावामध्ये पहिल्यादा फिरत फिरत धाऊ शेळके आपल्या गायी, बकरी व कुटुंबासह आला. गावामध्ये येऊन त्यांनी आपली छोटीशी झोपडी बांधली. त्याला पाहून त्याचा मित्र आपल्या कुटुंबासह आले. हे दोघी धनगर समाजातील होते. अशाप्रकारे अनेक लोक आले. धनगर समाजातील हे लोक पूर्वी भरकड्या या गावामध्ये राहत होते.

अगोदर काही दिवस पळसकाटा गावामध्ये त्यांना सुख शांती लाभत नव्हती. आजारी पडत असे. गावातील एका काजऱ्याच्या झाडाकडे संध्याकाळी चुडतीचा उजेड पेटत असे. यामुळे सर्वांनी मिळून त्या काजऱ्याच्या झाडाला एक पेड बांधले. तेथे छोटीशी आजोबाची घुमटी बांधली. त्या पेडाची पूजा करायला सुरुवात केली. त्या दिवासापासून सर्व सुखाने राहू लागले. आता ह्या पेडासमोर धनगर समाजातील लोकांनी आजोबाची मोठी घुमटी बांधली आहे. या घुमटीच्या बाजूला महामाया देवीचे एक मंदिर बांधले आहे. गावातील लोक माड्यातल्या आजोबाला जास्त मान देतात. त्याच बरोबर दुधसागर देवाला ही मान देतात.

महामाया देवी आणि कृष्णाचे अशी दोन मंदिरे गावामध्ये आहे. देवाची भक्ती भक्त मनपासून करतात. महामाया देवीच्या देवळात दर शुक्रवारी घरातील एक व्यक्ती पूजा करतो. दुसरा शुक्रवार येई पर्यंत पूजा केलेल्या घरातील व्यक्ति देवीसमोर दिवा पेटवतो. प्रत्येक घरामध्ये एक एक शुक्रवार वाटून दिला जातो. श्रावण व नवरात्रीला

भट आणून पूजा केली जाते. रात्री भजन करतात व प्रसाद वाटला जातो. त्याचप्रमाणे कृष्णाच्या देवळामध्ये दिवा लावण्यासाठी प्रत्येक घराला दिवस दिले जातात. वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.

गावामध्ये धनगर समाजाच्या जास्त वस्त्या आहेत. धनगर समाजातील लोक आपले सण उत्सव मोठ्या उत्साहात साजरे करतात. दसरा हा त्यांचा सर्वांत मोठा सण आहे. आज ही हा सण आपल्या परंपरेने साजरा करतात. आज या गावामध्ये कर्नाटकातील, महाराष्ट्रातील लोक व्यवसायाच्या निमित्ताने येथे येऊन आपल्या छोट्या- छोट्या झोपड्या वसवल्या आहे. सण उत्सव असला की हे लोक आपल्या गावात जातात. गावामध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध आहे. गावात वीज, शुद्ध पाणी आदी सुविधा आहेत. डांबरी रस्ता आहे. गावामध्ये विहिर ही आहे. पूर्वी लोक विहिरी वरुन पाणी घेऊन येत होते. आता मात्र घरोघरी नळातून पाणी येते. गावात पूर्वी लोकांची घरे म्हणजे छोट्या छोट्या झोपड्या होत्या. वर्तमानात मात्र ही स्थिती बदललेली आहे. आज मोठ मोठी कॉंक्रीटची घर पहायला मिळतात. शिक्षणाच्या सुविधा असल्याने गावातील लोक शिक्षित झाले आहे. गावामध्ये प्राथमिक शाळा व अंगणवाडी आहे. गावातील धनगर समाजातील मुले आज शिक्षक, डॉक्टर, नर्स, पोलीस या पदावर नोकऱ्या करत आहे. आर्थिक दृष्टा हा गाव समृद्ध आहे. तरिही गावामधील प्रत्येक घरात गुरे पहायला मिळतात. या लोकांनी आपला पारंपारिक व्यवसाय कुठेही सोडलेला दिसत नाही.

### ३.२.२ धनगर समाजाची लोकसंख्या

पळसकाटा गावात अनेक जाती, धर्मांचे, समाजाचे लोक राहतात. या गावात धनगर समाजाने आपली वस्ती सर्वात अगोदर मांडली. कालंतराने व्यवसायाच्या निमित्ताने महाराष्ट्र, कर्नाटक या प्रदेशातील लोक इथे स्थायिक झाले. या गावामध्ये धनगर समाजाच्या जास्त वस्त्या आहेत. त्याचप्रमाणे या गावात धनगर समाज्याची जास्त लोकसंख्या आहे.  एकूण  धनगर समाजाची लोकसंख्या २१८ आहे. यात पुरुषांची संख्या ११७  तर माहिलाची संख्या १०१ आहे.

## ३.३ सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व धार्मिक दृष्ट्या धनगर समाजाचा अभ्यास

'संस्कृती' हा प्रत्येकाच्या जीवनातील महत्त्वाचा भाग आहे. समाजाची ओळख त्यांच्या संस्कृती वरून होते. प्रत्येकाच्या संस्कृतीमध्ये भिन्नता असते. प्रत्येक समाज सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व धार्मिक दृष्ट्या एका समाजाहून वेगळा असतो.

### ३.३.१ सांस्कृतिक दृष्ट्या

' पळसकाटा' गाव हा जरी क्षेत्र फळाच्या दृष्टीने लहान असला तरी सांस्कृतिक दृष्टीनी समृद्ध आहे. गावात अनेक जाती, धार्माचे लोक राहत असल्यामुळे प्रत्येकांच्या संस्कृतीमध्ये भिन्नता आढळते. प्रत्येक समाजाने आपली संस्कृती जपून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

पळसकाटा गावात अस्तित्वात असलेल्या धनगर समाजाची संस्कृती इतर समाजापेक्षा वेगळी आहे. त्यांची जीवनशैली, व्यवसाय, परंपरा इतरापेक्षा वेगळी आहे. आजतागायात ही संस्कृती जपून ठेवण्याचा या समाजाने प्रयत्न केला आहे. धनगर समाजामध्ये परंपरेने चालत आलेले सण, उत्सव, रुढी आज ही त्याच पद्धतिने केले जातात.

नवरात्रीच्या पहिल्या माळेला महामायाच्या देवळात घड बसवतात. त्याचप्रमाणे रुजवण घातली जाते. प्रत्येक माळ दोन कुटुंबांना वाटून दिली जाते. दुपारी देवळात पूजा होते. नवरात्रीचे नऊ दिवस देवळात रात्री भजन करतात. महिला फुगडी घलतात.

दसरा हा धनगर समाजातील सगळ्यात मोठा सण असतो. हा सण तिन दिवस असतो. पहिल्या दिवशीच्या रात्रीला ' **जागोर'** असे म्हटले जाते. या दिवशी पुडतला देव काडून पुजला जातो. मांटोळील तोराण बांधले जाते. दही रवी करून ताक केले जाते. जात्यावर तांदळाचे, नाचण्याचे दळण दळतात. मग त्या पिठाचे स्त्री अलंकार करून तेलात घातले घालतात. त्याला **'कडाकने'** म्हणतात. कडाकने ही मांटोळीला बांधले जातात. प्रत्येक घरामध्ये आरती करण्यासाठी पुरुष मंडळी येते. खाण्यासाठी 'फराळ' हा पदार्थ करतात. हा करण्याची पद्धत ही वैशिष्ट्येपुर्ण आहे. सर्वात अगोदर पाण्यात पिठाचा गोळा करून घालतात त्यानंतर त्यात दूध आणि गुळ घातले जाते. त्यानंतर ढोल, ताशा, ताळ इ. वाद्य वाजवून पुरुष मंडळी रात्रभर खेळतात. महिला फुगड्या घालतात.

दुसऱ्या दिवशी आंघोळ करून परत देवाला धुऊन पुजले जाते. देवाला फुल, गंध लावला जातो. दुपारी देवाची पाटी मोकळ्या मैदानावर काढली जाते. त्या जागेला **मांड** असे म्हटले जाते. तिथे सगळे विधी केले जातात. धोल, ताशा वाजवून पुरुष मांडाव खेळतात. देवाला जाप (सागणं) लावला जातो, ताक पिले जाते, भंडारा सर्वांना लावला जातो. मग ती पाठी घेऊन घरी येतात. दराऱ्या दिवशी घरात अनेक पदार्थ केल जातात. या दिवशी '**दुधातला भात'** हा महत्वाचा  बेत असतो.

तिसऱ्या दिवशी **कारखाची** (रोज वापरण्याऱ्या वस्तू) पूजा केली जाते. या दिवसाला **शिलंगन** म्हणतात. घरातील ज्या  वस्तू  आपण रोज वापरतो त्यांची पूजा करतात. पहिल्यादा त्या वस्तूना धुतात. त्यानंतर त्यांना गंध, फूल लावले जाते. कारखाना नैवेद्य दाखवला जातो. गावातील शेळके व खरवत या दोन्ही कुटुंबाची पाटी तिसऱ्या दिवशी काडली जाते.

गणेश चतुर्थी हा सण पूर्वी धनगर समाजात केला जात नव्हता. वर्तमानात मात्र धनगराच्या प्रत्येक घरात गणपती पुजला जातो. गणेश चतुर्थी हा सण वर्तमानात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. गणेश चतुर्थीच्या पूर्वी घर रंगाने, पताक्याने सजवले जाते. माटोळी सजवली जाते.  चतुर्थीच्या दिवशी सकाळी गणपतीची मूर्ती आणून तुळशी पुढे ठेवली जाते. त्यानंतर देवाची ओवाळनी करून देवाला मखरात बसवतात. मुलांमुलीचा गट घुमट, शामेळ, ताळ घेऊन आरती करायला प्रत्येकाच्या घरात जातात. आरती झाल्यानंतर देवाला नैवेद्य दाखवतात. भोजन झाल्यानंतर स्त्रिया, पुरुष मिळून अगदी उत्साहाने फुगडी घालतात. अशा पद्धतीने गणेश चतुर्थी हा सण आनंदाने साजरा करून देड, पाच किंवा सात दिवसाने देवाचे विसर्जन गावातल्या नदीवर करतात.

गणेश चतुर्थी प्रमाणे दिवळी, गुढीपाडवा, होळी, नवरात्री इ. सण पळसकाटा परिसरात धनगर लोक मोठ्या उत्साहात साजरे करतात. जस-जसा वेळ काळ बदलत जातो तस-तसा प्रत्येकाच्या संस्कृतीमध्ये थोडा फार बदल होत जातो. असाच बदल पळसकाटा परिसरात ही झाला आहे. आज पुरुष मंडळी पूर्वी सारखा पोशाख करत नाही. त्याचप्रमाणे महिला मंडळ ही नऊवारी कापडामध्ये किंचित पहायला मिळतात. परंपरने चालत आलेल्या सण, उत्सव, रूढी मध्ये ही थोडेफार बदल झाले आहेत. वर्तमानत आधुनिकतेचा परिणाम धनगर समाजावर थोडफार झाला आहे.

### ३.३.२ सामाजिक दृष्ट्या

पळसकाटा गावात प्रत्येक जातीचे- धर्माचे लोक मिळून मिसळून राहतात. गावात अनेक स्थळे त्याना दिलेल्या नावावरून ओळखली जातात. **माड्यात'** 'हे नाव तेथे जास्त माड्या असल्यामुळे दिलेल गेले आहे. 'न्हकड' म्हणजे नदीकडे. 'काजऱ्याकडे' म्हणजे तिथे काजऱ्याचे झाड होते. ठकी, बमी, लखी, कोंडी, कोंडा, बमो, वागो, धोडों, केदो ही नावे त्यांना आपल्या पूर्वजाची ठेवली गेली आहेत.

धनगर समाजाचा पोशाख इतर समाजापेक्षा वेगळा असतो. एकदम साधा पद्धतीचा पोशाख असतो. इतर समाजाहून वेगळा असतो. धनगर समाजाचा पोशाख वैशिष्टयपूर्ण असतो. धनगर समाजातील पुरुष मंडळीचा पोशाख कंबरेला लंगोटी, खाद्यांवर कांबळ, हातात चांदीचे कडे, कानात बाळी, डोक्यावर पागोटे, हातात काठी अशा प्रकारचा असतो. 'तर महिलाचा गुडग्यापर्यंत नऊवारी चिरकुट (कापड), हातभर बांगड्या, कपाळाला आडवे कुंकू, केसाचा आंबडा, कानात बुगड्या अशा पध्दतीचा आसतो. घरातले पुरुष गायी, म्हशी, बकरी यांना चरायला रानात घेऊन जायचे, गुरांना चारा आणणे, गायीचे दूध काढणे, शेतात काम करणे अशी कामे करतात. त्याचप्रमाणे दळण दळणे, कांडण करणे, रगड्याव मिरची वाटणे, भाकरी भाजणे, पुरुषा बरोबर शेतात वावरणे ही सर्व कामे स्त्रिया करतात. पूर्वी गावात नळ नसल्यामुळे विहिरी वरून पाणी आणले जात होते. ' इतर स्त्री प्रमाणेच धनगर स्त्री ही सोशीक आहे. तिचे कुटूंब सर्वस्वी तिच्यावर अवलंबून असते. घरतील सर्व जबाबदाऱ्या चांगल्या पद्धतीने पार पाडते.' [i] धनगरवर्तमानामध्ये ही स्थिती बदलली दिसून येते. आधुनिक सुविधा वर्तमानात उपलब्ध झाल्या आहेत. आज प्रत्येकाच्या घरात नळाचे पाणी येते.

शेती, बकरी, गायी हा त्याचा मुख्य व्यवसाय होता. त्याचप्रमाणे नाचण्याची भाकरी, चटणी, उकडी पेज, दही, आंबिल, लोणी हा मुख्य आहार होता. वर्तमानामध्ये ही स्थिती राहिलेली नाही. प्रत्येक घरातील एकजण तरी आता सरकारी नोकरी करत आहे. शेती हा व्यवसाय हा आज पळसकाटा परिसरात एकही जण करत नाही. मात्र गुरे पालण्याचा व्यवसाय आज ही करतात. नाचण्याच्या भाकरी ऐवजी वर्तमानात गहूचे पीट विकत आणून चपाती करतात.

धनगर समाजाची घर म्हणजे करडाच्या ( सूखे गवत) छोट्या छोट्या झोपड्या होत्या. घराच्यासमोर करडाचा गुरांसाठी गोठा, शेळयांसाठी कांबीचे साठ. साठ बांबूच्या किंवा क्यारवीच्या काठ्याचेअसते. साठाला माळा असायाचा त्यामध्ये शेळया ठेवतात.  दार बांबूचे असते. बकरीचे दूध विकत होते. बकरीना रानात चरायला सुमारे १२ वाजता घेऊन जात होते व ६ वाजता परत आणल्या जात होत्या. हा रोजचा दिनक्रमांक होता.

धनगर समाजाची भाषा मराठी भाषेला जवळ जाणारी आहे. मराठीतील काही शब्द धनगर भाषेशी जुळतात. या समाजाची भाषा त्यांची ओळख करून देते.

पळसकाटा गावात जानू झोरे हा जाणकार आहे. यांचे वय १०० वर्षाहून जास्त आहे. कोणतेही गावात काम करायचे असेल तर प्रथम त्यांना विचारले जाते. यांना देवाचे जास्त ज्ञान आहे. गावातील सर्व लोक यांना मान देता. धनगर समाजातील लोक यांच्या शब्दा बाहेर जात नाही.

गावामध्ये स्त्री, पुरुष यामध्ये भेद केला जात नाही. गावातील पुरुषाप्रमाणे स्त्रियाही नोकरी करतात. वर्तमानध्ये गावातील स्त्री, पुरुष शिक्षित आहेत. घरातील स्त्री गोठ्यात काम करते त्याचप्रमाणे पुरुष ही हे काम करतात. पुरुषा बरोबर स्त्रियाही  कष्टी काम करतात.

### ३.३.३ आर्थिक दृष्ट्या

पळसकाटा गाव आर्थिक दृष्ट्या फार समृध्द आहे. गावात बकरी, गाय, म्हैस पाळत होते. धनगर समाजातील लोक पूर्वी दही, दूध विकून आपले पोट भरत असत. त्याचप्रमाणे ही शेती ही करत होते. कालंतराने खाण व्यवसाय सुरु झाला. प्रत्येक घरामध्ये ट्रक आणि ट्रक ड्राइवरांची संख्या जास्त झाली. झोपड्या चिऱ्याच्या घरामध्ये बदलू लागल्या. आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या. गावात शाळा सुरु झाली. धनगर समाजातील मुले शिकू लागली. वर्तमानामध्ये डॉक्टर, नर्स, शिक्षक, पोलीस या पदावर काम करतात.

### ३.३.४ धार्मिक दृष्ट्या

धार्मिक सण, उत्सव जे परंपरेने चालत आलेले आहेत ते वर्तमानमध्ये ही त्याच पद्धतीने करतात. पूर्वीप्रमाणे आज ही देव पुजण्यासाठी पाणी झरीवरून किंवा नदीवरून आणले जाते. नळाच्या पाण्याने देवाची पूजा केली जात नाही.

काजऱ्याच्या देवाकडे दररोज दिवा पेटविला जातो. त्याचप्रमाणे महामाया देवाच्या आणि  कृष्णाच्या देवळात दिवा लावला जातो. प्रत्येक शुक्रवारी घरातील एक व्यक्ती महामायाच्या देवळात पूजा करतो. पुरुष सवळे न्हेसून तर महिला कापड न्हेसून पूजा करतात. गर्भ गृहात फक्त सवळे आणि कापड न्हेसलेल्या व्यक्तीला प्रवेश मिळतो.

धनगर समाजात लग्नाच्या वेळी वधूला घरात आणले जाते तेव्हा जे धार्मिक विधी केले जातात ते धनगर समाजातील भट करतो. त्या भटला ‘ **येडगा’** असे म्हटले जाते.

धनगर समाजात कुठलेही काम करायचे असले तर त्यापूर्वी कूळ देवाचा कौल घेतला जातो. कौल मिळाल्यावरच त्या कामाला सुरुवात होते. लग्न ठरण्यापूर्वी देवाचा कौल घेतला जातो. धनगर समाजामध्ये एकाच आडनावाचे मुलगा व मुलगी असली तर त्यांचे लग्न होत नाही. एकाच आडनावाचे असले तर ते भाऊ - बहिण असे मानतात.

## ३.४ समारोप

पळसकाटा  धारबांदोडा तालुक्यातील एक लहान गाव आहे. पळासकाटा परिसरात धनगर समाजने आपल्या वस्त्या सुमारे १५० पूर्वी  मांडल्या आहे. पूर्वी हे लोक पळसकाटा गावाच्या जवळ असलेल्या भरकड्या या गावामध्ये होते. त्यानंतर फिरत फिरत पळसकट्या गावात आले आणि या गावातच आपल्या वस्त्या मांडल्या.

या गावामध्ये मुख्य व्यवसाय गाय, म्हैस, बकरी यांचे पालन करणे. त्याचप्रमाणे शेती ही केली जात होती. घरातील बायका घरातील सर्व कामे करून पुरुषांबरोबर शेतीतली ही कामे करत होत्या. घरातील लहान मुले आपल्या छोट्या भावंडाना साभळत होती.

कालंतराने या गावात आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या. गावामध्ये अंगणवाडी सुरु झाली. मुले शिकू लागली. गावात प्रत्येक घरातील एक तरी व्यक्ती सरकारी नोकरी करत आहे.  स्त्री व पुरुष दोघे ही नोकरी करतात. या गावात पुरुष आणि स्त्री मध्ये भेद केला जात नाही. वर्तमानमध्ये हा समाज आर्थिक दृष्ट्या समृद्ध आहे.

## ३.५ निष्कर्ष

१) 'पळस' आणि ' काटा' ही दोन पदे जोडून पळसकाटा गावाचे नाव अस्तित्वात आले आहे.

२) धनगर समाजावर आधुनिक जीवनशैलीचा परिणाम झाला आहे. उदा. वर्तमानात पूर्वीप्रमाणे धनगर लोक वेशभूषा करत नाही. रात्रभर दसरा खेळ खेळत नाही इ.

३) पळसकाटा गावात आधुनिक सुविधा उपलब्ध आहे. घरोघरी नळ, विज आली. गावत डांबरी रस्ता आहे.

४) रुढी, परंपरा टिकवून ठेवल्या आहेत. पूर्वीप्रमाणे वर्तमानात ही दसऱ्याला देव पूजण्यासाठी नदीतून पाणी आणले जाते. नळाच्या पाण्याचा वापर केला जात नाही. दसऱ्याला जात्यावर दळण दळून 'कडाकनी' केली जातात.

**संदर्भ सूची**

[i] १. केरकर पोर्णिमा : "अनुबंध लोकगंगेचे." प्रकाशक: विवेकानंद साहित्य संस्कृती अभिवृद्धी मंच केरी सत्तरी गोवा, प्रथमावृती २७ ऑगष्ट २०१२, पृ.२३.

**श्रेय नामावली**

१. संगीता पावणे, वय- ४५, पत्ता- पळसकाटा.
२. गंगी शेळके, वय- , पत्ता- पळसकाटा.
३. गंगाराम शेळके, वय- ४०, पत्ता- पळसकाटा.
४. नागी शेळके, वय-४६, पत्ता- पळसकाटा.
५. जानू पाटील, वय- ३८, पत्ता- पळसकाटा

# प्रकरण ४
# पळसकाटा परिसरातील धनगर समाजाचे लोकवाङ्मय

४.१ प्रस्ताविक ....................................................................................................................34

४.२ पळसकाटा परिसरातील धनगर समाजाची लोकगीते....................................................................35

४.२.१ फुगडी गीते ..................................................................................................................35

४.२.२ जात्यावरली गीते ...........................................................................................................47

४.२.३ लग्न गीते ....................................................................................................................54

४.२.४ बालगीत .......................................................................................................................57

४.२.५ शिमगा गीत ..................................................................................................................60

४.३ पळसकाटा परिसरातील धनगर समाजातील लोककथा ....................................................................63

४.३.१ कथांचा आशयनिष्ठ अभ्यास ...............................................................................................64

४.३.२ भाषिक अभ्यास ..............................................................................................................67

४.३.३ कौटुंबिक विषय ..............................................................................................................68

४.४ पळसकाटा परिसरातील धनगर समाजीतील उखाणे आणि कोडी .......................................................68

४.४.१ उखाणे .........................................................................................................................68

४.४.२ कोडी ..........................................................................................................................72

४.५ पळसकाटा परिसरातील धनगर समाजात प्रचलित असलेली म्हणी आणि वाक्यप्रचार. .......................75

४.५.१ म्हणी ..........................................................................................................................75

४.५.२ वाक्प्रचार ....................................................................................................................78

४.६ समारोप .......................................................................................................................82

४.७ निष्कर्ष ........................................................................................................................83

**प्रकरण ४**

## पळसकाटा परिसरातील धनगर समाजाचे लोकवाङ्मय

### ४.१ प्रस्ताविक

'लोकवाङ्मय' म्हणजे वाणीमय जे मौखिक परंपरेने प्राप्त होते. लोकसाहित्यात लोकवाङ्मय हा महत्त्वाचा भाग असतो. मौखिक परंपरेने पुढे आलेली लोकगीते, लोककथा, म्हणी, उखाणे इ. चा समावेश लोकवाङ्मयामध्ये केला जातो. जॉन बॅलिस यांच्या मते " लोकवाङ्मय आदिमानवनिर्मिती असून ते परंपरेने प्राप्त होत असते. ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्या द्वारा पद्य किंवा गद्य स्वरुपात केली जाते." तर विलिमय बॅस्कमच्या मते " मिथ्स, म्हणी, लोकगीते आणि अशा प्रकारे भाषेच्या माध्यमातून होणारे पारंपरिक कलात्मक आविष्कार म्हणजे लोकवाङ्मय होय."

'पळसकाटा' गाव हा भौगौलिक दृष्ट्या लहान असला तरी सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न आहे. या गावात धनगर समाजाची संख्या जास्त आहे. अनेक वर्षापासून धनगर समाज पळसकाटा गावामध्ये वास्तव्य करून आहे. धनगर समाजाकडे त्यांच्या लोकसाहित्याचा अथांग भंडार आहे.

'पळसकाटा' परिसारतील धनगर लोक वर्तमानमध्ये आपले सण, उत्सव परंपरेने साजरे करतात. दसरा या सणाला मांडावर फुगडी घालतात. त्यावेळी अनेक फुगडी गीते म्हणतात. लग्नाच्या अगोदर अनेक विधी केले जातात त्यावेळी धनगर स्त्रिया गीत गाऊन आपल्या भावना व्यक्त करतात. धनगर समाजात कामाचा व्याप जास्त असतो. दैनंदिन जीवनात अनेक श्रमाची कामे करावी लागतात. धनगर स्त्रिया दैनंदिन जीवनातील कामे करताना श्रमाची जाणिव होऊ नये म्हणून अनेक गीते म्हणतात. दळण दळताना त्रास कमी व्हावा म्हणून काही गाणी गाऊन ती त्रास कमी करण्याचा प्रयत्न करते. त्या गाण्याच्या शैलीत त्या अगदी रमून जातात. यामुळे दळण दळताना होणारा त्रास त्या विसरतात. पळसकाटा गावातील धनगर समाजामध्ये लोकवाङ्मयाचा अनमोल ठेवा आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

## ४.२ पळसकाटा परिसरातील धनगर समाजाची लोकगीते

पळसकाटा परिसरातील धनगर समाजामध्ये दसरा, गणेश चतुर्थी, शिमगा, होळी, गुढीपाडव, दिवाळी, नवरात्रा इ. सण मोठ्या उत्साहाने साजरे करतात. धनगर समाजात दसरा हा सर्वात मोठा सण असतो. धनगराचा दसरा तीन दिवस असतो. दसऱ्याच्या दिवशी सर्व स्त्रिया अगदी उत्साहाने मांडावर फुगडी घालतात. यावेळी स्त्रिया आपल्या मनातील भावना लोकगीतातून व्यक्त करतात. त्याचप्रमाणे दळण दळताना, हळद लावताना धनगर स्त्रिया लोकगीतांतून आपल्या भावभावना व्यक्त करतात.

'शिंमगा' हा सण अगदी उत्सहाने साजरा करतात. शिमग्याला अनेक जती गाऊन प्रत्येकाच्या घरातून पैसे, नारळ मिळवतात. धनगर स्त्री, पुरुष आपल्या भाव- भावना लोकगीतांतून व्यक्त करतात. लोकगीत म्हणजे भावनांचा आविष्कार असतो. धनगर समाजात फुगडी गीते, जात्यावरील ओव्या, बालगीते, लग्नगीते, शिमगा जती इ. लोकवाङ्मयाचा भंडार आहे. हा भंडार काळाच्या ओघात नष्ट होत आहे.

### ४.२.१ फुगडी गीते

'पळसकाटा' परिसरात धनगर समाजातील स्त्रिया दसरा, चतुर्थी, गज्जा, म्हाळ इ. प्रसंगी फुगडी घालतात. त्या फुगडी गीतातून आपल्या भाव- भावना, विचार, वेदना व्यक्त करतात. फुगडीचे अनेक प्रकार असतात. त्यामधील आडवी फुगडी, उभी फुगडी, दोन रांगेची फुगडी पळसकाटा परिसरातील धनगर स्त्रिया घालतात. वर्तमानत स्त्रिया बरोबर पुरुष ही फुगडी घालतात.

### ३. २.१.१ आशयनिष्ठ अभ्यास

फुगडी गीते अगदी साधी असली तरी गीतामध्ये दडलेला आशय मोलाचा असतो. जे आपण प्रत्यक्ष इतरां पुढे बोलू शकत नाही ते गाण्याच्या माध्यामातून व्यक्त करतात. धनगर लोकगीते अर्तमनाला स्पर्श करणारी असतात. गीतातील आशय दैनंदिन जीवनातील असतात.

एखादी स्त्री लग्न करून सासरी गेली आहे पण तिला आपल्या माहेरची ओढ लागते तेव्हा ती आपल्या भावना गीतातून व्यक्त करते.

उदा. **गवरायी म्हणती माहेर दिस, माहेर दिस.**

या ओळीमधून दिसते कि त्या स्त्रिला आपल्या माहेरची आठवण येत आहे. तिला आपल्या माहेरा यायचे आहे. त्याचप्रमाणे एका आईचे आपल्या सासरी गेलेल्या मुलीबद्दल असलेले अफाट प्रेम दिसते. मुलगी सासरी गेली तरी तिच्यासाठी तिच्या नावाने वस्तू आणून ठेवली जाते.

**उदा. माहेरु दिस झाल्या येऊन जा ग लेकी, येऊन जा ग लेकी**

**साठ्याची साडी तुला घेऊन जा ग लेकी, घेऊन जा ग लेकी**

या ओळीतून आई आपल्या मुलीला सांगते की तुला जर आठवण येत असेल तर घरी येऊन जा. तुझ्यासाठी आज ही साठा करून ठेवला आहे. त्यामधील तुझ्या नावाची साडी आहे जी फक्त तुझ्यासाठीच आहे ती घेऊन जा.

धनगर स्त्रिया घरातील दळण, कांडण, विहिरीवरून पाणी आणणे, रगाड्यावरती मीरची वाटणे ही सर्व कामे करतात. त्याचबरोबर पुरुषासोबत शेतीची कामे करतात. ही कामे करत असताना त्यांना अनेक शारीरिक कष्ट होतात पण ते कष्ट चेहऱ्यावर दिसू देत नाहीत. शारीरिक पिडा असली तरी त्या बसून राहत नाही. सतत काही ना काही काम करत राहतात.

**उदा. का ग पोरी वाकना वाकना ?**

**कंबार धुकती सांग ना, सांग ना**

**लवंग- लसून माग ना, माग ना.**

या ओळीतून दिसून येते एक स्त्री आहे तिला काम करायला होत नाही तरीही ती ते करण्याचा प्रयत्न करत आहे. कोणलाही ती आपण बरी नाही असे सांगत नाही. लवंग- लसून म्हणजे काही औषध ही मागत नाही. त्रास होत असलेल्या स्त्रिला एक स्त्री प्रश्न विचारते तू का वाकत नाही? तुझी कमर दुखत आहे का? तुला काही पाहिजे आहे का? असे प्रश्न विचारते. परंतु या प्रश्नाचे उत्तर तिला मिळत नाही.

देवाच आणि भक्ताचे नाते कसे असते. परमेश्वराविषयी भक्ताच्या मनात असलेले प्रेम धनगर स्त्रियाच्या गीतांचा आशय होत असतो.

**उदा. ऐ ग ऐ ग विठ्बाई, माझे पंढरीचे आई**

**पंढरी ग मी जाताना**

**घेईन घेईन मी कुदळ**

**खडीण खडीण मी आंगण**

**माझ्या सावळ्या विठ्लाचे.**

ओळी मधला आशय सांगायचा झाला तर एक स्त्री आपल्या देवाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूरला जाणार आहे. पंढरपूरच्या विठ्लाला भेटण्यासाठी ती खूष आहे. पंढरपूरात गेल्यानंतर ती तिथला सगळा पारिसर स्वच्छ करणार आहे. कुदळ घेऊन ती खणून अंगण तयार करणार आहे.

वडिलांचे- मुलीचे नाते दाखवणारी अनेक धनगरी गीते स्त्रीया म्हणतात. मुल किती ही मोठी झाली तरी आई- वडिलांना मुलांची काळजी असतेच असते.

**उदा. घर माझे डोंगरी गे चित्त माझे माहेरी**

**बाबा माझी चिंता करी गे धू माझी एकटी**

**नाही बाबा एकटी रे संग आहे सोबती.**

या ओळीतून बाबाला आपल्या मुलीची काळजी आहे असे दिसते. मुलगी लग्न करून सासरी आली आहे पण तिचे काळीज, मन मात्र माहेरीच आहे. मुलीला माहीत आहे आपला बाबा काळजी करत असेल. मुलगी आपल्या बाबाला सांगू इच्छिते बाबा तुम्ही माझी काळजी करू नका मी एकटी नाही आहे. माझ्या सोबतीला माझा सोबती आहे.

माहेर हे मुलीचे पहिले घर असते. मुलीच बालपण तिथे गेलेले असत. अचानक मुलगी लग्न करून माहेरी जाते तिची तिथे झालेली अवस्था लोकगीतातून दिसून येते. माहेरच्यांविषयी असलेली उत्कंठा गीतातून दिसून येते.

**उदा. शोक शोक माझी आई गे | दुधाची चाय मका जाई गे**

**बागेत फुल फुलल्या गुलाबाचे | ल्हानपणी सुख माझ्या आईचे.**

नेहमी स्त्रियांना जे सुख आपल्या माहेरी मिळते ते सुख सासरी मिळतेच असे नाही. या गीतातील स्त्रिला आपल्या माहेरची आठवण येत आहे. जेव्हा ती स्त्री आपल्या आईच्या घरी होती तेव्हा तिला मागितले ते सगळे मिळत असे.

भाऊ बहिणीचे प्रेम फार सुंदर आणि निर्मळ असते. भाऊ – बहिणाच्या नात्यामध्ये एक वेगळाच गोडवा असतो.

**उदा. दे दादा दे दादा मरगाळू म्हसू मरगाळू म्हसू**
**माझे डोईचा टप्परू गेला टप्परु गेला**
**नाही बहिणी नाही बाहिणी मरगाळू म्हसू**
**देतो बहिणी देतो बहिणी पवनाच हारु पवनाच हारु**

या ओळीतून दिसून येते की एक बहिण भावाकडे आपल्या माहेरची म्हैस मागत आहे. भावासाठी ती म्हैस म्हणजे आपल्या घराचे छप्पर आहे. ज्या म्हशीमुळे घर चालत आहे ती म्हैस बहिणीला दिली तर आपले सगळे जाणार याची भावाला जाणीव आहे त्यामुळे तो बहिणाला सांगतो तुला पवनाच हार देतो. तुला पाहिजे ते देतो परंतु म्हैस देत नाही. कृषीजीवनाचे चित्रण या गीतात आलेले आहे. सोन्यानाण्यापेक्षा गुरांना म्हशीना या समाजात अधिक महत्त्व दिले जाते.

ईश्वर आणि भक्तामधला भक्तिचा भाव धनगर स्त्रिया आपल्या गीतातून व्यक्त करतात. जो ईश्वराची भक्ती शुद्ध निर्मळ मनाने करतो त्याला ईश्वर नेहमी मदत करतो. आपला भक्त जर चांगला असेल तर ईश्वरालाही त्याचे काम करताना आनंद होतो.

**उदा. पंढरीच्या पांडुरंगा विठ्ला रे | लवकर ये रे कंठ माझा दाटला**
**सखू जा ग घरी देव दळी | दळन दळताना आनंद वाटला रे.**

काही धनगर फुगडी गीतातून पौराणिक कथा सांगितल्या जातात. पद्य स्वरूपात ही गीते असली तरी यातून कथा सांगितला जातात.

**उदा. श्रावण बाळ चालू लागल.**
**चालत बोलत नदीपाशी आल**
**नदीपाशी येऊन त्याने चंदन कापिला.**

या गीतातून श्रावण बाळाची कथा सांगितली जाते. श्रावण बाळ आपल्या आई- वडिलांना काशीला घेऊन जातो. वाटेत त्यांना तहान लागते म्हणून श्रावण बाळ पाणी आणायला जातो. त्या ठिकाणी दशरथ राजा शिकार

करण्यासाठी आलेला असतो. शिकार समजून दशरथ बाण सोडतो तो बाण श्रावणाच्या छातीत घुसतो. श्रावण बाळ तिथेच मरण पावतो. अशी कथा गीतातून सांगितली जाते. असेच आणखीन एक गीत आहे.

**उदा. माझी नेटेली बाई सीता | माझी नेटेली बाई सीता**

**सीता गेली ग न्हायला सीता गेली ग न्हायला.**

**सीतान पहिला साद केला | सीतान पहिला साद केला.**

उपरोक्त गीतातून राम सीतेची कथा कथन केलीली आहे. या गीतात सीता आंघोळ करण्यासाठी नदीवर गेली असता तिला तिथे धनुष्यबाण सापडतो. सीता तो बाण आणून आपल्या वडिलांना दाखवते. तिथे काही वेळाने राम येतो. सीतेचे वडी रामाला रामाला नमस्कार करायला सांगतो. शेवटी राम सीतेला माळ घालतो. एकंदरीत राम आणि सीतेच्या भोवती फिरणारे हे गीत आहे. या गीतामध्ये रामायणामधला एक भाग आला आहे.

धनगर समाजात चिडवण्याच्या उद्देशाने काही फुगडी गीते म्हटली जातात. मुलांना मुलीचे नाव घेऊन चिडवले जाते किंवा लग्न न झालेल्याना लग्न केव्हा करणार असे म्हणून चिडवले जाते.

**उदा. जय तुझ्या किशान काय ?**

**जयाच्या किशान मृणाली बाय.**

वरील गीतातून मुला मुलींना चिडवले जाते. मुलांच्या प्रेमीकाचे नाव माहित असले तर त्याच्या नावाने चिडवतात. असेच आणखीन एक गीत आहे.

**उदा. ऐदूशे करीना केदे व्हडले झाले**

**ते सांगता आपल्या आईक आपले लग्न कर कर.**

लग्नाच्या वयात आलेल्या मुलीना उद्देशून हे गीत म्हटले जाते. या गीतातून मुलामुलीची थटा मस्करी केली जाते. जो मुलगा व मुलगी उपस्थित आहे त्यांना चिडवले जाते. तसेच लग्न करून माहेरी आलेल्या मुलीलाही सासरच्या गावातील नाव घेऊन चिडवले जाते.

**उदा. तांबडो तुवालो पांढरो तुवालो**

**पळसकाटा कसो पावलो**

**पळसकाट्याचे चेडे दिसताले बरे**

**चेडवाचेर लाइन मारता हा हा चेडवाचेर लाईन मारता.**

### ३.२.१.२ आचारविचार

'लोकगीत' आपले विचार दुसऱ्यापर्यत पोहचविण्याचे अत्यंत प्रभावी माध्यम आहे असे ही आपण म्हणून शकतो. चांगले विचार लोकगीतून व्यक्त केले जातात.

धनगर समाजात लहान वयात किंवा पाळण्यातच लग्न केली जात असतं. स्त्रियांना स्वतंत्र स्थान नव्हते. स्त्रियाविषयाचे सर्व निर्णय पुरुषाचा घेत होते. स्त्रिया पुरुषांच्या सर्व नियमांचे पालन करत असतं. वर्तमानत हे चित्र बदललेले दिसते. लहान वयात लग्न केल्याने उद्भवलेल्या समस्या वेदना धनगर स्त्रिया लोकगीतातून व्यक्त करतात. लहान वयात मुलांचे लग्न करू नये हा विचार धनगर स्त्रिया आपल्या गीतातून मांडतात. आधुनिक आणि पुरोगाती विचारसरणीचा अवलंब करणारी स्त्री या पुढील लोकगीतात दिसते.

**उदा. लेक देऊ नये रे धाकूलपणी**

**बापा वेदना सरली**

**बापा वांगोड कोणाचा**

**धुये गळ्यातल्या पिडुकाचा**

**बापा वांगड पावना.**

धनगर समाजात स्त्रियांच्या कामाची सुरुवात भल्या पहाटे होते ती रात्री उशिरापर्यंत चालू असतात. काम करताना काही चूक झाली तर सासू- जावा त्रास करायच्या. वय लहान असल्यामुळे कामे वेगानी होत नसे. स्त्रियांना लग्नापूर्वी माहेर घरातून शिकवण दिली जात होती. तो म्हणजे सासरी जाऊन वाद करायाचा नाही. मुकाट्याने सगळ सहन करायचे. आणखीन एक गीत ज्यातून एका स्त्रीने आपले विचार मांडले आहे.

**उदा. मेरी तुजे केस लांब लांब ग**

**जवळ येऊ नको माझे पप्पा बोलतील**

**माजे पप्पा तुज्यावर फार जळतील.**

या गीतातून वाईट दृष्टी असलेल्या लोकांपासून लांब राहाणे गरजेचे असते हा विचार मांडला आहे. समाजात काही लोक असतात ज्यांना दुसऱ्याचे चांगले झालेले पहावत नाही.

**३.२.१.३ स्त्रियांच्या भावभावनांचे दर्शन**

धनगर स्त्रियांचे जीवन फार कष्टमय असते. लहान वयातच जास्त जबाबदाऱ्या खांद्यावर दिल्या जातात. लहान वयातच संवसाराचा डौलारा सांभाळावा लागतो. एखाद्या यंत्रणासारखी धनगर स्त्री आपल्या दैनंदिन जीवनात वावरत असते. या स्त्रियांना आपले मन मोकळे करण्यासाठी वेळ नसतो. धनगर स्त्री आपल्या भावना लोकगीताद्वारे व्यक्त करतात. आई- वडिला, भाऊ – बहिण, देवा इ. विषयी मनात असलेल्या भावना स्त्रिया फुगडी गीतातून व्यक्त करतात.

**उदा. घर माझे डोंगरी गे चित्त माझे माहेरी**

**बाबा माझी चिंता करी गे धू माझी एकटी**

**नाही बाबा एकटी रे संग आहे सोबती.**

आपल्या माहेराविषयी असलेली ओढ ती या गीतातून व्यक्त करते. लग्न करून दिलेल्या स्त्रिला आपल्या माहेराविषयी जिव्हाळा, प्रेम, अत्मियता असते. या सगळ्या भावना ती पुढील गीतातून सहजपणे अगदी भावूक होऊन व्यक्त करते.

**उदा. गवरायी म्हणती माहेर दिसं .. माहेर दिसं.**

अशाच पद्धतीचे आणखीन एक गीत धनगर स्त्रिया म्हणता ज्यामध्ये स्त्रियांच्या वेदनांचे चित्रण होते. स्त्रिची माहेर व सासर यामध्ये होणारी कुंचबणा या गीतात दिसते.

**उदा. उपाशी गेली माझी आई गे सखे | उपशी गेली माझी आई**

**चिटमीटी पडलो माजो जिव गे सखे | चिटमिटी पडलो माजो जिव**

या ओळीतून एक स्त्री आपल्याला होणारे दुख, वेदना व्यक्त करते. आपले माहेरचे लोक उपाशी गेल्याची खंत ती कळकळीने या गीताद्वारे व्यक्त करते.

त्याचप्रमाणे माहेरी मिळणाऱ्या सुखाच्या क्षणाची स्त्रियांना सासरी गेल्यानंतर आठवण येते. माहेरी मुलींना नेहमी आपल्या आईचे सुख लाभते. आईच्या घरी मुलगी केव्हा आणि कधीही काही मागू शकते. एका स्त्रिला आपल्या माहेराविषयी असलेली ओढ धनगर स्त्रिया आपल्या फुगडी गीतातून व्यक्त करतात. या गीतातून विरहाचे भाव दिसून येतात.

**उदा. शोक शोक माझी आई गे**

**दुधाची चाय मका जाई गे**

**बागेत फुल फुलल्या गुलाबाचे**

**ल्हानपणी सुख माझ्या आईचे.**

विवाहित जीवनातील दुःख व्यक्त करणारी फुगडीगीते धनगर समाजातील स्त्रिया म्हणतात. त्याचप्रमाणे लहान वयामध्ये लग्न केल्यामुळे होणारे दुख या पुढील गाण्यातून व्यक्त करतात.

**उदा. लेक देऊ नये रे धाकूलपणी रे**

**बापा वेदना सरली**

**बापा वांगोड कोणाचा रे**

**धुये गळ्यातल्या पिडुकाचा**

**बापा वांगड पावना.**

या ओळीतून लक्षात येते की या स्त्रिचा नवरा तिला साथ देत नाही. वडिलांना वाटते आपण लहान वयात आपल्या मुलीचे लग्न करून दिले. आता त्या मुलीचानवरा तिला सांभळणार अशी आशा होती. पण तिचा साथ आता कोणी देत नाही. ती स्त्री एकटी पडली आहे. ही खंत बापाच्या मनामध्ये आहे. तिला ज्या वेदना होत आहेत त्या वेदना या ओळीतून ती व्यक्त करण्याचा प्रयत्न करत आहे. आणखीन एक गीत आहे ज्यामधून स्त्री आपल्या नवऱ्याला भावना सांगते

**उदा. तुझ्या नावाची दासी रे दत्ता**

**विनंती ऐकवी रे| दत्ता विनंती ऐकावी**

**तुझ्या नावाचा मणी रे दत्ता गळयान घातिला.**

या ओळीतून धनगर स्त्रियांचे समाजात असलेले स्थान दिसते. स्त्री म्हणजे फक्त नवऱ्याची दासी असते. धनगर लोक स्त्रियांच्या मताना मान देत नाही. स्त्री कळकळीनी विनंती करते नवऱ्याला कि तिचे सांगणे ऐकून घ्यावे. स्त्री नवऱ्याला जाणीव करून दिते ती त्यांची मानाची बायको आहे. तिने गळयात त्याच्या नावाचा मणी घातला आहे.

ईश्वर आणि भक्तामधला भक्ति भाव धनगर स्त्रिया आपल्या गीतातून व्यक्त करतात. देवाविषयी असलेली ओढ धनगर फुगडी गीतातून दिसते. धनगर समाजात देवाला विशेष स्थान आहे. म्हणून लोकगीत प्रकार कुठलाही असला तरी देवभक्ती त्यांच्या गीतातून सहज येते.

**उदा. मोगऱ्याचा हार गुतू ग बाई मोगऱ्याचा हार गुतू**

**गणपतीची सेवा करू गे बाई गणपतीची सेवा करू.**

या गीतातून स्त्री गणपतीची सेवा करण्यासाठी इच्छूक आहे. असेच आणखी गीत आहे त्यातून ही देवाविषयी असलेली ओढ दिसून येते. देवाविषयी असलेला भाव दिसून येतो.

**उदा. पंढरी ग मी जाताना पंढरी ग मी जाताना**

**घेईन घेईन मी फुल**

**घालिन घालिन माझ्या सावळ्या विठ्ठलाला.**

स्त्री पंढरीत जाताना विठ्लासाठी फुल घेऊन घालण्यासाठी आनंदात आहे. आनंदाचा भाव या गोतातून दिसतो. अशाच स्वरूपाचे आणखीन एक गीत आहे.

**उदा. श्री हरी श्री हरी गाऊया**

**नाचत पंढरी जाऊया**

**पैशाची फुली आमी घेऊया**

**विठ्ल देवाला घालूया.**

### ३.२.१.४ व्यवसाय

धनगर लोकांचा मुख्य व्यवसाय 'गोपालान' आहे. पळसकाटा गावात प्रत्येकाच्या घरात हा व्यवसाय केला जातो. वर्तमानातही हा व्यवसाय लोक करतात. पळसकाटा परिसरातील धनगर समाजाचा व्यवसायाचे चित्रण लोकगीतातून प्रतिबिंबित होते.

**उदा. गोठ्यान बसलेली नवरुपी पाडी गे नवरुपी**

**नवरूपे पाडीचे दुध कोण काडी गे दुध कोण काडी**

**नवरूपे पाडीचे धनी दुध काडी गे धनी दुध काडी.**

उपरोक्त ओळीतून धनगर समाजातील गोपपालन या व्यवसायाचे प्रतिबिंब दिसून येते. 'नवरूपी पाडी' म्हणजे नवीन व्यालेली गाय आहे. असेच आणखीन एक गीत आहे ज्यातून व्यवसायाचे प्रतिबिंब दिसते.

**उदा. दे दादा दे दादा मरगाळू म्हसू मरगाळू म्हसू**

**माझे डोईचा टप्परू गेला टप्परु गेला**

गायी, म्हशी हे धनगर लोकांचे खरे धन असते. ह्या व्यवसायामुळे त्यांचे घर चालते. गायी, म्हशीपुढे चांदी, भांगर यांची किंमत धनगर लोकांसाठी शून्य असते. त्यांचा व्यवसाय म्हणजे त्यांच्या **टप्परु** म्हणजे डोक्यावर असलेले छप्पर आहे. आपल्या घराच्या जनावर असलेले प्रेम ही दिसून येते.

अशा प्रकारे धनगर लोक आपल्या व्यवसायाला धरून काही गीते म्हणत असतात. गीताद्वारे आपल्या मनातल्या भावना व्यक्त करतात.

### ३.२.१.५ वाङ्मयीन मूल्यमापन

लोकवाङ्मय म्हणजे जे वाणीमय असते. लोकवाङ्मयामध्ये लोकगीतांचा समावेश होतो. लोकगीते ही वाङ्मयीन दृष्टीकोनातून श्रेष्ठ असतात. लोकगीतांतून विरह, प्रेम, उत्कटता इ. भाव प्रकट होतात. त्याचप्रमाणे कौटुंबिक विषय, व्यवहार, भावना, संस्कृती, भक्ती इ. चे दर्शन घडते. तसेच लोकगीतातून भाषेचे सौदर्य दिसून येते. [i]

लोकगीतात सौदर्यकल्पना, भावानिष्कार इ. वाङ्मयीन मूल्ये आढळतात लोकगीतांची निर्मिती भावना, दु:ख, भक्ती व्यक्त करण्यासाठी झाली आहे. त्याचप्रमाणे श्रमाची जाणीव होऊ नये यासाठी ही लोकगीते म्हतली जातात. लोकगीत म्हणजे भावनाचा आविष्कार असतो.

**३.२.१.५.१ लोकगीतांतील सौंदर्य**

लोकगीते ही विविध सौंदर्याने नटलेली असतात. हे सौंदर्य भाषेचे त्यातून व्यक्त होणाऱ्या भावनाचे आणि . अर्थाचे तसेच कल्पनांचे असते. लोकगीतात कल्पनांचा वापर करून त्यांना सौंदर्यशाली केले जाते.

**उदा. आळे धरीले साखरीचे गे**

**लिंबीन शिपिली दुदयानी गे.**

कल्पेनाचा वापर केल्यामुळे उपरोक्त गीताचे सौंदर्य वाढलेले आहे. कल्पनेमुळे काही गीते भावपूर्ण बनली आहे. उपरोक्त गीतात प्रत्यक्षात लिंबविणीचे झाड दुधाने शिपले नाही तर इथे कल्पनाचा वापर करून हे गीत तयार केले आहे. आणखीन एक ओळ आहे ज्यामध्ये कल्पनाचा वापर करण्यात आला आहे.

**उदा. लिंबू कुठीले सोन्याच्या ताटान गे | लिंबू कुठीले सोन्याच्या ताटान गे.**

उपरोक्त ओळीत प्रत्यक्ष लिंबू सोन्याच्या ताटान कुटल नाही तर एक कल्पना आहे. या कल्पनेमुळे गीताला आकर्षिक रूप प्राप्त झाले आहे.

**३.२.१.५.२ लोकगीतातील भावसौंदर्य**

लोकगीत म्हणजे सामुदायिक भावनाचा आविष्कार असतो. लोकगीते ही सामान्य माणसाच्या जीवनातून निर्माण झालेली असतात. लोकगीत ही मौखिक परंपरेने पुढे आलेली असतात. लोकगीतातून विविध भावनांचे हृदयगम दर्शन घडते. लोकगीते ही मानवाच्या जीवनाशी एकरूप झालेली असतात. म्हणून ती जीवंत वाटतात. लोकगीतातून प्रेम, सुखदुःखाचे , विरह, भक्ति इ. भाव व्यक्त होतात.

लोकगीतातून देवाविषयी असलेली ओढ अंतकरणाला स्पर्श करते. देवाविषयी असलेली  ती ओढ, प्रेम घनगर स्त्री आपल्या गीतातून व्यक्त करते.

**उदा. पंढरी ग मी जाताना**

**घेईन घेईन मी कुदळ**

**खडीण खडीण मी आंगण**

**माझ्या सावळ्या विठ्लाचे**

पळसकाटा परिसरामध्ये आणखीन एक गीत आहे त्यामधून देवाविषयी ओढ, सेवेचा भाव अगदी सुंदर रित्या व्यक्त केला जातो.

**उदा. मोगऱ्याचा हार गुतू ग बाई, मोगऱ्याचा हार गुतू**

**गणपतीची सेवा करू गे बाई,गणपतीची सेवा करू गे.**

उपरोक्त ओळीतून स्त्रियांची देवाविषयी असलेली श्रद्धा दिसून येते. देवाची सेवा करण्यासाठी स्त्री इच्छुक आहे. स्त्रिचा आनंद, उत्साह या गीतातून दिसून येतो.

**३.२.१.५.३ लोकगीतांतील प्रतिमासृष्टी**

लोकगीतात प्रतिमाचा वापर करून ती आकर्षक बनवली जातात. धनगरांच्या लोकगीतातील प्रतिमासृष्टी आकर्षक, अर्थपूर्ण आणि नयनरम्य आहे.

**नवस आज मीच करीन नवस आज मीच करीन**

**गळ्यातल्या त्या मणण्यासाठी मणण्यासाठी.**

**‘ मणण्यासाठी’** ही प्रतिमा **नवऱ्यासाठी** वापरली आहे. स्त्री जीवनात मंगळसूत्रला एक वैशिष्टपूर्ण भावनात्मक स्थान असते. विवाहित स्त्रिला ते सर्वस्व असते. धनगर लोकगीतातील प्रत्येक शब्द भावनेने ओलाचिंब झालेला असतो. त्यामुळे ही लोकगीत हृदयाला स्पर्श करतात.

**३.२.१.६ भाषिक अभ्यास**

लोकगीत समुहमनाची भावना असतात. धनगर लोकांची फुगडी गीते ही धनगर भाषेत आहेत. गीते बोलीभाषेत असल्यामुळे त्यात जिवंतपणा वाटतो. काही गीते इतर संस्कृतीचा प्रभावामुळे कोकणी भाषेत आहेत. गीते अगदी साधी आणि सोपी पद्धतीचे आहे.

फुगडी गीतामध्ये लय असणे फार गरजेचे असते. ती लय या फुगडी गीतातून दिसून येतो. फुगडी गीतातून यमक जुळवण्याचा प्रयत्न केला आहे.

**उदा. शाल गोंड तेजाच**

**आमच्या ग बंधू राजाच**

**राज बंधू खेळत्यात**

**माळीव फुल गुत्यात**

पुनरावृत्ती होत असल्यामुळे गीतांना सौदर्य प्राप्त होते. धनगर फुगडी गीतातून अनेक ठिकाणी शब्दाची पुनरावृत्ती आढळते.

**उदा.१ का ग पोरी वाकना वाकना**

**कंबार धुकती सांग ना सांग ना.**

**उदा.२ आड्यात काय बाई झिगझिगत झिगझिगत**

**मी ग म्हणते सवरी डोर सवरी डोर**

लोकसाहित्यात नेहमी परिवर्तन होत असते. बदलत्या काळानुसार लोकसाहित्य बदलत जाते. काळाच्या ओघात काही शब्द कालबाह्य होत जातात. धनगर समाजात हा बदल पहायला मिळतो. तरी काही शब्द वर्तमानात लुप्त झाले आहेत. **उदा. चिटमिटी.** हा शब्द वर्तमानात वापरला जात नाही. वर्तमानात या शब्दाला प्रतिशब्द वापरतात **उदा. दुख, वेदना, त्रास इ.** असे असले तरी त्या **'चिटमिटी'** ह्या शब्दात जो भाव आहे तो इतर शब्दातून व्यक्त होत नाही.

### ४.२.२ जात्यावरली गीते

जात्यावरील गीतांना श्रमगीते असे ही म्हटले जाते. दळण दळताना जो श्रम घ्यावा लागतो. त्या श्रमाची जाणीव होऊ नये म्हणून गीते म्हटली जातात. धनगर समाजातील स्त्रियांच्या कामाचा व्याप जास्त असायचा. धनगर स्त्रियांच्या कामाची सुरुवात भल्या पहाटे व्हायची ती रात्री उशिरापर्यंत कामे संपत नसायची. दळण दळताना रात्र होत

होती. रात्री दळण दळताना झोप येऊ नये म्हणूनही गीते म्हटली जात होती. धनगर समाजात पुरुषांबरोबर स्त्रियाही श्रमाची कामे करतात. दैनंदिन जीवनात जे घडत असते तेच स्त्री गाऊन सांगते.

### ३.२.२.१ आशयनिष्ठ अभ्यास

धनगर स्त्री आपल्या दैनंदिन जीवनात अनेक श्रमाची कामे करते. जात्यावरील दळण दळणे हे ही श्रमाचे काम दररोज करते. काम करत असताना काही ओव्या गात असते ज्यामुळे त्या श्रमाची जाणीव होत नाही.

**उदा. जातं कशी ग एकली वडू**

**केला ग खुटा कुणीग हेचा**

**हाती ग पडी चुडी ग याचा**

**दळन दळीते बारीक म्हणते**

**सासू ग म्हणते बारीकू म्हणते.**

उपरोक्त ओळीतून दिसून येते की स्त्रिला  दळण दळायचे आहे. तिला एकटीला जात्ये ओढायला होत नाही. त्या जात्याचा जो खुटा ( लाकडाची जाड काठी) तो बारीक झाला आहे. त्यामुळे तिला खुटांला धरता येत नाही. एक तर तिला दळायला होत नाही वरून सासू म्हणते दळण बारीक दळ.

दळण दळत असताना घडणाऱ्या गोष्टी स्त्रिया गाऊन दाखवतात. धनगर स्त्रि ओवीगीताततुन जीवनातीला घटना प्रसंग,भावभावना, अपेक्षा, रुढी, परंपरा या सगळयांचा सहज आविष्कार होतो. शारिरीक कष्ट आणि भावनिक स्थिती या दोन्हीचाअन्योन्य ओवीत संबंध आहे

**उदा. दळान दळीते नाचण्याच**

**दळान दळीते सवा ग खांडी**

**पीटू ग पडत एक मांडी.**

. उपरोक्त ओळीतून स्त्री नाचण्याचे पिठ दळीत आहे हे लक्षात येते. स्त्री दळण जास्त दळीत आहे पण पिठ मात्र कमी पडत आहे. म्हणजे आपण कष्ट जास्त करीत पण पीठ मात्र थोडच पडत आहे.

**उदा. आग मी जाते बाजारातू**

**दादा माझ्या झाले लेकू**

**आग मला कळले भरल्या बाजारातू**

**खडम साखर देते, घे ग पदरातू**

**आग जाते दादाच्या नगरातू**

स्त्री सांगते आता मी बाजारात जाते. बाजारात गेल्यानंतर तिला कळते की आपल्या भावाला मुलगी झाली आहे. ती इतरांचे तोंड गोड करण्यासाठी साखर वाटते. त्या स्त्रिला आता आपल्या भावाच्या घरी जायचे आहे. तिला आता माहेरची ओढ लागली आहे. पुढे ती म्हणते-

**उदा.  आग पाऊस पडतो डहू ग पवूळ्याचा**

**दादा माझ्याचा घराकड पाऊस पडते डहू ग पवळ्याचा**

**चिखूल झाले भारी  ग.**

स्त्री तयार झाली आहे माहेरी येण्यासाठी पण पावसाचे दिवस चालू असल्या कारणाने पाऊस जास्त पडत आहे. स्त्री आपल्या भावाला कळवते की आपल्या घराकडे **'डहू ग पवळ्याचा'** म्हणजे मुसळधार पाऊस कोंसळत आहे. मुसळधार पाऊस असल्यामुळे येण्याच्या वाटेवर सगळीकडे चिखल झाला आहे.

बहीण भावाच्या नात्यामधील गोडावा धनगर गीतातून दिसून येतो. पुढे भाऊ आपली बहीण यावी म्हणून वाट तयार करून तिला माहेरी घेऊन जाण्यासाठी येत आहे. नदी पाण्यानी भरलेली आहे.  मुसळधार पाऊस  कोसळत आहे तरी भाऊ पोहून येत आहे. हे खालील ओळीतून स्पष्ट होते.

**उदा. दादा माझा वाट ग शिवू लागले**

**बंधुराया येतो माझा निह्याग**

**नदी भरील्या दोन्ही ग तडी**

**दादा माझा छाती तोडीतो पानी छातीनी.**

धनगर स्त्रियाच्या कामाची सुरुवात सकाळी पहाटेला होते ती रात्र  होई पर्यंत संपत नाही. पहाटे काला ( शेण सारवणे) काडण्यापासून ते रात्री दळण दळेपर्यंत  सर्व कामे धनगर स्त्रिया करतात. हे खालील ओळीवरून दिसून येते.

**उदा.सकाळी पाऱ्याला शानू ग काला काडी**

**दळान दळीते मदान  राती**

धनगर समाजामध्ये लग्न लहान वयात केली जात होती. पाळण्यात देखिल लग्न झालेली आहे.  मुलगी वयात आल्यानंतर तिला सासरी पाठवले जायचे. आई- वडील ज्यांच्याबरोबर लग्न ठरविते त्याच मुलाबरोबर लग्न केले जात असतं. नेहमी मुली वयाने लहान व पुरुष वयाने मोठे असयाचे. मुलीपेक्षा वयाने मुलगा मोठा असल्या कारणाने तिची जी कुंचबणा होत असायची. म्हणून एका गीतातून ती म्हणते.

**उदा. आग घरदारू लागले मोहरू  ग**

**पित्या बापा कितीम दूरु दिले.**

या ओळीतून स्त्री आपल्या वडिलांना विचारते आपल्याला इनके दुर का दिले. पुढे आपल्याला होणाऱ्या त्रासाविषयी सांगते.

**उदा. घरदारु गेल दूरु**

**पित्या खडी लागली**

**पित्या चालाय येईना**

**पित्या कितीम दूरु ग दूरु दिले.**

स्त्री सांगते वडिलांना नवरा पुढे गेला आपण मात्र पाठीमागेच आहे. तो इतका जलद चालत आहे की तो खूप पुढे निघून गेला आहे. वाटेत डांबराचा रस्ता असल्यामुळे पायला आपल्या खडी लागली आहे. आपल्याला चालायला होत नाही. पित्याला स्त्री परत प्रश्न विचारते की आपल्याला इतक्या लांब लग्न करून का दिले.

धनगर समाजामध्ये  स्त्रिचे लग्न करून दिल्यानंतर  पाच दिवसांनी भाऊ बहिणाला आणण्यासाठी जातो. त्याला '**मुराळी**' असे म्हणतात. धनगर स्त्रियांच्या कामाचा व्याप इतका असतो की त्यांना कोणाकडे बसून गप्पागोष्टी करायला वेळ नसतो. आपल्या माहेरून आलेल्या भावा सोबत ही बोलायला त्यांना वेळ नसतो. हे पुढील ओळयातून स्पष्ट होते.

**उदा. बाहुराय आले ग सकाळी येळ**

**मी बगीते वाट सांज वेळा**

**बस म्हनाय विसारले, नाही धंद.**

**घरदारू गेले म्हशीकड**

या ओळीमधून भाऊ बाहिण्याच्या घरी आल्यानंतर घडलेला प्रकार सांगितला आहे. भाऊ सकाळी आपल्या बहिणीला माहेरी घेऊन जाण्यासाठी आला आहे. बहिणीला वाटल होत की तो संध्याकाळी येणार. कामाच इतका ताण होता की ती स्त्री आपल्या भावाला बस म्हणायला विसारते. नवरा म्हशी चरायला घेऊन गेला आहे. पुढे नवरा घरी येतो आणि त्यांच्यामध्ये संवाद होतो तो पुढीलप्रमाणे-

**उदा. मल बोलते बंधूरायाला क्या ग केले**

**बंधूरायाला बहिण पाट दिले बसाया**

**आग शैवनाच ताब्या भरून दिले पाणी पिया**

नवरा घरी येऊन बायकोला विचारतो की तू भावासाठी काय केले आहे. बायको सांगते आपल्या नवऱ्याला मी भावाला पाट दिले बसायला. पाणी भरून ताब्या दिला प्यायला.

देवावर असलेली भक्ती धनगर स्त्रिया आपल्या गीतातून व्यक्त करतात. त्याचप्रमाणे देवावर असलेली श्रद्धा त्याच्या गीतातून व्यक्त होते.

**उदा. मी जाते पंढरपपुरु**

**माझ्या वटीतू पिकले क्याळू**

**आग संग न्हेते लेकरू – बाळू**

वरील गीतात स्त्रिला पंढरपुरला जायचे आहे. तिला मुल -बाळ असल्यामुळे ती आपल्या बाळाला घेऊन पंढरपुरला जाणार आहे. पुढे ती क्रमाने आपल्या सगळया घरातील व्यक्तींची ना नावेव घेऊन त्यांच्याबरोबर पंढरपुरला जाणार. इथे स्त्री देवाला आपल्याला हा भरलेला कुटुंब दिल्यामुळे आभार मानण्यासठी जात आहे. पुढे ती जनाबाई आणि विठ्ठलाचे वर्णन करते.

**उदा. विठोबा देवू दळू लागं**

**जना नारी दळी ग तेचे संग.**

या ओळीतून दिसून येते विठोबा देव आपल्या सखी जनाबाईची कामामध्ये मदत करत आहे. जनाबाई आणि विठोबा मिळून दळण दळीत आहेत.

### ३.२.२.२ भाषिक अभ्यास

गीताची भाषा धनगर भाषा आहे. ही भाषा मराठी भाषेला जवळ जाणारी आहे. भाषा अगदी सोपी व साध्या पद्धतीने वापरली आहे.

गीताच्या काही ठिकाणी यमक जोडण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. **१.माझे वटीतू पिकले क्याळू. आग संग न्हेते लेकरू – बाळू. ळू** हा यमक जुळवला आहे. **२. ग म्हणते बारीकू दळ. माझ्या कंबरेला आले कळ.** यामध्ये **ळ** हा यमक जुळवला आहे.

त्याचप्रमाणे काही ठिकाणी उपमा दिल्या आहेत. **उदा. माझे वटीतू पिकले क्याळू**. या ठिकाणी **मुलांना केळाची** उपमा दिली आहे. काही शब्द असे आहे ते आता लुप्त झाले आहे. **उदा. कुरुड.** कुरूड या शब्दाचा अर्थ दगड आहे.आता कुरुडच्या जागी **धोंडा ( दगड)** हा शब्द वापरला जातो.

मराठी भाषा धनगर भाषेला जवळ जाणारी असल्यामुळे मराठी शब्द गीतातून ठिक ठिकाणी आढळतात. **उदा. कशी, माझा, दादा, आई, भेटीसाठी, सकाळी इ.** धनगर लोक काही ठिकाणी **'ण'** ऐवजी **'न'** हा शब्द वापरतात. **उदा. 'दळण'** हा शब्द **'दळन'** असे उच्चारतात.

### ३.२.२.३ कौटुंबिक विषय

धनगर गीतातून कौटुंबिक विषय प्रतिबिंबित होतात. सासू-सुनेचे भांडण, घरतील कष्टाची कामे, लग्नपद्धती, या लोकजीवनातील कोटुंबिक घटना लोकगीतांतून त्या व्यक्त करतात. श्रमाची कामे करताना स्त्रियांना शारिरीक पिडा होते. तरीही सासूला मात्र आपल्या सुनेची दया येत नाही. असे भासवून खालील ओळी तयार केल्या आहे.

**उदा. सासू ग म्हणते बारीकू दळ**

**माझ्या कंबरेला आले कळ.**

सुनेला दळण दळताना त्रास होत आहे. कंबरेला कळ आली आहे तरीही सासू तिची वेदना समजून घेण्याचा प्रयत्न करत नाही. उलट तिला धान्य अजून बारीक करायला सांगते. सासरबद्दल मनात असलेल्या भावना इथे व्यक्त करते.

भाऊ- बहिणीचे प्रेम लोकगीतातून प्रकट होते. भाऊ बहिणीला घरी घेऊन जाण्यासाठी कशा प्रकारे प्रयत्न करतो याचे चित्रण गीतातून स्त्रिया करतात.

**उदा. दादा माझा छाती तोडीतो पानी छातीनी**

**बहनी माहेरी घेवूनी जाई .**

धनगर समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. कुठल्याही गोष्टीचा निर्णय  घेण्याचे तिला स्वतंत्र नसते. स्त्रियांच्या जिवनातील सर्व निर्णय पुरुष घेतात. धनगर स्त्रिया कोणती ही तक्रार न करता पुरुषाच्या आज्ञाचे पालन करते. त्यामुळे त्यांना ज्या वेदाना व्हायच्च्या त्या गीतातून त्या व्यक्त करतात. वाडील आणि मुलीमधला संघर्ष गीतातून व्यक्त झाला आहे. वडील जे मुलीच्या आयुष्याचे निर्णय घेतात त्यामुळे मुलीना जो त्रास, वेदना होतात त्या आपल्या गीतातून व्यक्त करतात.

**उदा. पित्या बापा कितीम दूरु दिले**

**घरादारु गेलं दुरु**

**पित्या खडी लागली.**

**३.२.२.४ श्रमाचे निरसन**

धनगर स्त्रियांचे जीवन हे कष्टमय असते. धनगर स्त्रिया दैनंदिन जीवनात अनेक कष्टाची कामे करतात. त्यांना विसावा घेण्यासाठी वेळ नसतो. जात्यावरील गीते म्हणताना त्यांच्या जीवनातील सुखःदुखांना वाचा फुटते. गीत गात असताना स्त्रिया त्यामध्ये मग्न होतात यामुळे आपण श्रम करत आहे याची जाणीव त्यांना राहत नाही. आपल्या दैनंदिन जीवनात होणाऱ्या असंख्य वेदना गीत गाताना त्यांच्या डोळयासमोर उभ्या राहातात. यामुळे त्या वेदना पुढे श्रम करताना होणाऱ्या वेदना त्यांना कमी वाटतात.

गीत गाताना स्त्रिया त्यात रमतात. तो अनुभव डोळ्यासमोर उभा करतात. काही सुखद अनुभव असतात तर काही दुखद असतात. त्यावेळी त्या कल्पनेमध्ये जगतात. त्या काल्पनिक जगात जगत असताना आपण करत असलेल्या श्रमाचे त्यांना भान राहत नाही. सासरी दळण दळत असताना त्या माहेरच्या आठवणीत रमतात.

**४.२.३ लग्न गीते**

'लग्न' हा मानवी जीवनातला एक महत्त्वाचा भाग असतो. परंपरागत चालत अनेक विधी या निमित्त करतात. धनगर समाजामध्ये पुण्यवचन करत नाहीत. लग्नाच्या आदल्या रात्री मंडोळया गुतात (सूय व धागा घेऊन गहू, हारभारे, रवीची पान इ. गुंततात), हळद कुटतात आणि लग्नाच्या दिवशी हळद लावली जाते. काही ठिकाणी वर्तमानात पुण्यवचन हा विधी करतात. त्याचबरोबर हळद लग्नाच्या आदल्या रात्री लावतात. पळसकटा परिसरातील धनगर समाज लग्नात हळदीच्या वेळी विधी करताना अनेक स्वरूपाची गीते त्यावेळी म्हटली जातात. प्रसंगानुरूप गीते म्हटली जातात. उदा. मंडोळया गुताना, हळद कुटताना, हळद लावताना इ.

**हळदी गीत**

**३.२.३.१ आशयनिष्ठ अभ्यास**

' हळद कुटण्याचा' विधी लग्नाच्या आदल्या रात्री करतात. हा विधी करताना हळद तयार झाल्याची प्रक्रिया गीताच्या माध्यमातून सांगितली जाते. ही प्रक्रिया क्रमांने सांगितले जाते. घरातील प्रत्येक व्यक्ती या प्रक्रियेमध्ये सहभागी होतो. त्याचबरोबर निसर्ग ही त्यांना साथ देतो.

**उदा. हळदायी रवील्याता मेघावाच्या पाण्यानी मेघवाच्या पाण्यानी**
**हळदायी रवील्या नवऱ्याचे आईनी नवऱ्याचे आईनी**

वरील ओळीतून स्पष्ट होते की हळद रोवताना म्हणजे लावताना त्या हळदीला पाणी देण्याचे काम पावसाने केले आहे. म्हणजेच त्यावेळी पाऊस पडला आहे. हळद रवल्या ( मातीत लावल्या) नवऱ्याचे आईने. पुढे ती हळद कशी मोठी होत गेली यांचे वर्णन केले आहे.

**उदा. नवऱ्या बाळाची हाळदायी घाटू हो हाळदायी घाटू**

**हाळदायी घाटाया गावाच मान्य हे गावाच मान्य हे**

उपरोक्त गीतातून हळद कुटण्याचा विधी सांगितलेला आहे. हळद कुटण्याचा पहिला मान गावातल्या प्रमुखाचा असतो. त्यासाठी हळद कुटाया गावाचे प्रमुख आलेले असतात. हा क्षण इतका महत्त्वपूर्ण असतो की याला साक्ष देण्यासाठी निसर्ग ही त्यांच्या सोबत असतो. हळद कुटताना वातावरणामध्ये बदल होत आहे. ढग गरजत आहे. आभाळ गडगडत आहे. अशी प्रचिती त्यांना येते. हे खालील ओळीतून स्पष्ट होते.

**उदा. हाळदायी घाटाय मेघूसू गरजल हे मेघूसू गरजला**

**गराजलं मेघू गडगडळ आभाळ गडगडळ आभाळ.**

त्यानंतर मंडोळ्या गुतल्या जातात. सर्वात अगोदर हारभरे, गहू भिजत घातले जातात. मंडोळ्या सुई दोरा घेऊन गुतल्या जातात. त्यामध्ये मूग, हरभारे, खोबरे, रवीचे पान, आंब्याची पाने यांचा वापर करतात. मंडोळ्या गुंतताना गावातल्या सुवासीनी मिळून गीत म्हणतात.

**उदा. नवऱ्या बाळाच्या मंडोळ्या गुतू मंडोळ्या गुतू**

**मंडोळ्या गुताया आई- बापस येवा हो.**

मंडोळ्या गुंतण्यासाठी घरातील प्रत्येक व्यक्तिला गीताद्वारे बोलवले जाते. सर्वात अगोदर आई- वडिलांना बोलावले जाते. नंतर बहीण, भाऊ, मामा – मामी, जावा इ. बोलवतात. पुढे देव- देवतांचे वर्णन केले जाते.

**उदा. राम कळ्या कुटी**

**सीता मंडोळ्या गुती हो, मंडोळ्या गुती हो.**

राम आणि सीतेचा या गीतातून उलेख येतो. राम कळे काडत आहे. सीता ते कळे गुतून मंडोळ्या तयार करत आहे. इथे राम-सीतेचा उल्लेख करून या गीताला जास्त आकर्षित आणि प्रभावी करण्याचा प्रयत्न केला आहे. पौराणिक कथेचा आदार घेऊन हे गीत आले आहे.

हळद कुटुन व मंडोळ्या गुंतुन झाल्यानंतर लग्नाच्या सकाळी हळद लावण्याचा विधी सुरु होतो. धनगर समाजामध्ये नवऱ्याला हळद लावण्यापूर्वी कुळ देवाला हळद लावली जाते. देवाला हळद लावून नंतर नवरा - नवरीला हळद लावली जाते.

**उदा. नवरीच्या देवाला हाळदायी लावूया ह्या हळदायी लावूया ह्या**

**आनदि लावू देवाला मग लावू नवऱ्याला मग लावू नवऱ्याला.**

हळद आणि तेल मिसळून हळद लावतात. पाच वेळा हळद लावली जाते व उतरवली जाते. त्यानंतर हळद लावायला सुरुवात होते. हळद लावायला येण्यासाठी घरातील प्रत्येक मंडळीचे नाव घेतात.

**उदा. नवऱ्या बाळाला तेलशी चडवू हो तेलशी चडवू हो**

**पाच पावटी चडवू.. पाच पावटी उतरुशा पाच पावटी उतरुशा**

**नवऱ्या बाळाला हळदायी लावू हो हळदायी लावू**

**हळदायी लावाया मावळ मामा हे मावळ मामा हे.**

सर्वात अगोदर मुलांचा मामा हळद लावतो. धनगर समाजात मुला- मुलीच्या लग्नात मामाला मानाचे स्थान असते. मग आई- वडील लावतात. त्यानंतर घरातील प्रत्येक मंडळी हळद लावतात. धनगर समाजात मावशीला हळद लावत नाही. मावशी म्हणजे आई असे मानतात. त्यामुळे आईला मुलांनी हळद लावायची नसते अशी समजूत आहे. नवऱ्याचे ही वर्णन गीतातून करतात.

**उदा. आमचा नवरा न्हान म्हणू नका ह्यो न्हान म्हणू नका**

**आमचा नवरा आईचे जोपचा, आईचे जोपचा**

वरील ओळीतून सांगितले आहे की नवरा आता मोठा झाला आहे. त्याला लहान म्हणू नका. आई एवढा उंच झाला आहे. हळद लावताना काही सुचना गीताद्वारे देतात. त्या खालील प्रमाणे

**उदा. बापा हळद थोडी लावा, बापा हळद थोडी लावा**

**नवरा जातो ह्यो परगाव, जातो ह्यो परगावा.**

या गीतातून नवऱ्याराच्या वडिलांना सांगतात हळद थोडी लावा कारण नवरा लग्न करण्यासाठी दुसऱ्या ठिकाणी जाणार आहे. धनगर समाजामध्ये लग्ना पूर्वी घरातल्या अंगणात हा विधी केला जात असत. वर्तमानात ही स्थिती बदलेली आहे.

**३.२.३.२ भाषिक अभ्यास**

लग्नगीते ही धनगर भाषेत आहेत. धनगर लग्नगीते एक लय धरून म्हटली जातात. गीत म्हणताना आवाजाचा चड उतार लक्षात घेऊन गीते म्हटली जातात.या गीतावर आधुनिकतेचा प्रभाव दिसून येत नाही.

लग्न गीतांमध्ये उपमाचा वापर केला आहे. समर्पक अशा उपमांमुळे ही लग्नगीते जिवंत आणि रसरशीत वाटतात. उपमामुळे ही गीते जास्त आकर्षित होतात. उपमा वापरल्यामुळे या गीतांना एक सौंदर्य प्राप्त होते.

**उदा. राम कळ्या कुटी**

**सीता मंडोळ्या गुती हो, मंडोळ्या गुती हो.**

इथे एका जोडप्याला राम सीताच्या जोडप्याची उपमा दिली गेली आहे. इथे सरळ एका जोडप्याचा उल्लेख न करता उपमा वापरून त्या गीताचे सौदर्य वाढवले आहे. प्रत्येक गीतांतून शब्दांची पुनरावृत्ती झालेली दिसून येते.

**उदा. नवरा जातो ह्यो परगाव, जातो ह्यो परगावा.**

लग्नगीते ही साध्या सोप्या व सरळ बोलीभाषेत आहे. धनगर स्त्रिया एका तालात ही गीते म्हणतात. साजेल अशा शब्दाचा वापर करून ही गीते आकारास आणली आहे.

**४.२.४ बालगीत**

बालगीत लहान मुलांमध्ये प्रचलित असतात. बालगीते ही आकारने लहान असतात. या गीतातून लहान मुलांचे मनोरंजन होते. धनगर समाजात ही बालगीते पहायला मिळतात. मुले जेव्हा जेवण जेवत नाही किंवा रडतात तेव्हा त्यांना हसवण्यासाठी ही गीते म्हटली जाते. तालावर गीते म्हटली जातात. गीतातील यमकांवर जास्त भर दिलेला असतो. या गीतामध्ये काही वेळा अर्थ नसला तरी मुलांना खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य या गीतात आहे.

**३.२.४.१ प्रयोजन**

- **मनोरंजन**

बालगीताचे मुख्य प्रयोजन म्हणजे लहान मुलांचे मनोरंजन करणे हेच असते. लहान मुलांना खेळावण्यासाठी किंवा त्यांची समजूत काडण्यासाठी बडबड गीते म्हटली जातात. निसर्ग, पक्षी, प्राणी, माणसे इ. घटनांचे विनोदी दृष्ट्या दर्शन या गीतातून होते.

- **शिकवण**

कल्पनांचा वापर करून गीते रचलेली असली तरी या गीतातून नकळतपणे बाल मनावर संस्कार केले जातात.

**३.२.४.२ बालगीतातून सामाजिक आशय**

लहान मुलांची आकलन शक्ती बरी असते. बालगीतातून पशु पक्षी यांच्या उपमा देऊन बाल मनावर संस्कार केले जातात.

**उदा. तुपात पडली माशी, चांदोबा राहिला उपाशी**

वरील ओळीतून मुलांना समजावले जाते कि जेवण खाल्ले नाही तर त्यामध्ये माशी पडणार त्यामुळे चांदोबा सारखे उपाशी रहावे लागणार. धनगर बालगीतातून धनगर लोकांचे जीवन प्रतिबिंबीत होते. त्यांच्या दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनांचा उल्लेख बडबड गीतात केला जातो.

**उदा. गवळन बाई ताक चाळी**

**बुज हालवून लोणी काडी**

धनगर समाजात गोपपालन हा मुख्य व्यवसाय आहे. गुरांच्या दुधापासून ताक केले जाते. त्या ताकापासून घरात लोणी तयार केले जाते. व्यवससायविषयक अशी गीते या समाजात म्हटली जातात. पुढे ही शेतीविषयी सांगितले आहे.

**उदा. बैल घेतला चादर मोरा**

**भात भरल सव्वा खांडी**

धनगर समाजात शेती हा व्यवसाय परंपरेने चालत आलेला आहे. शेती करण्यासाठी बैलाची गरज भासते. ट्रक्टर हा आधुनिक काळात वापरला जातो. पूर्वी दोन बैलाच्या जोडीने शेत नांगरले जात होते.

धनगर समाजात पाळण्यातच लग्न करण्याची परंपरा होती. लग्न झाल्यानंतर वयात येईपर्यंत त्या मुलीला माहेरी रहावे लागत होते. वयात आल्यानंतर तिला गृहिणीच्या जबाबदारी सांभाळावी लागत असे. धनगर समाजातील बालगीतातून कौटुंबिक विषय मोठ्या प्रमाणात मांडले गेलेले आहे.

**उदा. माहेरी वाटी हारेक दाटे**

**सासरे वाटी कुचूकुचू काटे.**

वरील ओळीत माहेर व सासर यांची तुलना केली आहे. माहेर हरयाळी म्हणजे माहेर शांत मायाळू असते. सासर काट्याप्रमाणे असते. काटे पायाला लागल्यानंतर ज्या वेदना गेल्यानंतर होतात तशाच पद्धतीच्या वेदना सासरी होतात. लहान वयात लग्न होते म्हणून सासरी जाण्यापूर्वी मुलींना या बालगीतातून समजावून सांगले जाते.

धनगर लोक आपल्या शेळया, गायी, म्हशीना सकाळी चरायला घेऊन जातात ते संध्याकाळी परतात. धनगर मुले शाळेत जात नसल्याने ती ही लहान वयातच आपल्या वडिलधाऱ्या माणसाबरोबर शेळया , गायी म्हशीना चरायला घेऊन जाण्याचे काम करतात.

**उदा. काळू काका मी जाते घरा**

**जाग जाग लेकी घरा**

**पाच पावल पावाय येयाचो हुतो**

**शेळ्या गेल्या रानात**

धनगर समाजात लहान वयातच मुलांवर मोठ्या जबाबदाऱ्या येतात म्हणून बालगीतातून तसा उल्लेख येतो. धनगर लोकांना विश्राम घेण्यासाठी वेळ नसतो. दिवसभर शेळया, गायीमध्ये त्यांचा दिवस जातो.

लहान वयात मुलांच्या वेगवेगळया समजुती असतात. लहान मुलांना वाटते पैसे दिले की सगळ काही मिळते. पैशाने काहीही विकत घेऊ शकतो. त्यामुळे काही मुले पावसाला पैशाचे आमिष दाखवून बोलवण्याचा प्रयत्न करतात. म्हणजे संवाद साधतात.

**उदा. येरे येरे पावसा**

**तुला देतो पैसा.**

धनगर समाजातील प्रत्येक स्त्रिकडे पान सुपारी असते. धनगर स्त्रियांना जेवण नसले तरी चालते पण पान सुपारी पाहिजे. पान सुपारी या स्त्रियांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग असतो. बालगीतातून हा उल्लेख येतो.

**उदा. आपटी दपटी खाऊचे पान**

**३.२.४.३ भाषिक अभ्यास**

बालगीते ही लहान मुलांसाठी असतात. त्यामुळे त्यांची भाषा अगदी सोपी असते. मुलांना आकलन होणार अशा भाषेचा वापर करून बालगीताद्वारे मुलांवर संस्कार केले जातात. बालगीते ही सूरात म्हटली जातात. सूराने म्हटल्यामुळे ती लहान मुलांच्या लक्षात राहतात.

बालगीतांमध्ये शब्दांची पुनरावृत्ती केली जाते. शब्दांची पुनरावृत्ती केल्याने ती गीते अधिक आकर्षित बनतात. **उदा. चवळी झाली गोड गोड.** त्याचप्रमाणे यमकची जुळवाजुळवी करून बालगीते म्हटली जातात. त्यामुळे त्या गीताला एक प्रकारे लय मिळते. ऐकायला ही चांगली वाटतात.

**उदा. जीभेचा फोड फुटेना**

**डॉक्टर मामा उठेना.**

वरील ओळीमध्ये **फुटेना** व **उठेना** ही दोन यमके जोडून गीत पूर्ण केले आहे. धनगर बालगीते इंग्रजी भाषेचा वापर करून म्हटली जात नाही. परंतु मराठी आणि कोंकणी या भाषेचा प्रभाव धनगर बालगीतांवर झालेला दिसून येतो.

**४.२.५ शिमगा गीत**

धनगर पुरुष शिमगा अगदी उत्साहाने खेळतात. धनगर समाजात पाच दिवस शिमगा खेळला जातो. २०-२५ पुरुषांचा एक गट तयार करतात. तो गट घेऊन दुसऱ्या गावात खेळायला जातात. **'ताळ'** आणि **' घुमट'** या दोन वाद्याचा वापर केला जातो. हा गट चार दिवस घराच्या बाहेर राहतो. ज्या गावात शिमगा खेळण्यासाठी जातात तिथे रात्री निवास करतात. पहाटे उठून दुसऱ्या गावाची वाट धरतात. अशा प्रकारे चार दिवस शिमगा खेळतात. पाचव्या दिवशी स्वतः च्या गावात खेळतात. सर्वात अगोदर गावतल्या मांडावर खेळतात नंतर गावात पहिला मान असलेल्या जानू झोरे यांच्या घरी. नंतर दुसरा मान असलेल्या शेळके या कुटुंबायांच्या घरी शिमगा खेळाला जातो. गावात शिमगा

खेळण्याचे दोन गट आहेत. एक झोरे, सुझरे, शेळके, पावणे, पाटील, थोरत यांचा तर दुसरा सुझरे, मिसाळ, खरात, झोरे यांचा गट आहे.

शिमगा खेळतात त्या गटाला **'खेळगडी'** असे म्हटले जाते. या गटाला खेळताना कुणीही अपशब्द बोलू नये अशी समजूत आहे. खेळगडी ज्या घरात खेळतात त्या घरातील स्त्री त्यांच्या पायावर पाणी घालते त्यांचे पाय धुते. नंतर आपल्या पदाराने त्यांचे पाय पूसतात. त्यानंतर त्यांना कुंकू लावून पाया पडतात. त्या दिवशी त्या गटाला देवाचा मान दिला जातो.

शिमगा खेळून झाल्यानंतर तो गट त्या घरात **'तळी'** मागतो. 'तळी' म्हणजे घराच्या दारात कांबळ घातली जाते. त्या कांबळीवर ताट ठेवतात त्यात दिवा, अगरबत्ती, तांदूळ, पिंजर, नारळ आणि पैसे ठेवतात. खेळगडी ताटातले पैसे आणि नारळ घेऊन जातात. पहिल्या दिवशी मिळालेले नारळ ठेवले जातात. इतर दिवशी मिळालेले नारळ वाटून घेतात. पैसे मात्र तसेच ठेवतात. शिमगा संपल्यानंतर त्या पैशातून **'पोस्त'** हा सण साजरा करतात. हा सण होळी जाळतात त्या ठिकणी साजरा केला जातो. शिमगा हा खेळ खेळताना अनेक जती म्हटल्या जातात.

### ३.२.५.१ आशयनिष्ठ अभ्यास

शिमगा खेळताना त्या घरतील सर्व लोक कुळ देवाचे नाव घेऊन खेळतात. त्याचबरोबर त्या देवाची काही वैशिष्ट्ये सांगतात.

**उदा. अशी अशी जानाबाई मानाची हो**

**इडाबा घेती पानाचा हो. खडाबा घेती धुपाचा**

**तुरोबा ठेवती मोत्याचा हो. येडाबा घेती सूताचा.**

उपरोक्त गीतात सांगितल्याप्रमाणे पहिला मान जानाबाई देवीचा आहे. या देवीला सुपारीचा विडा ( इडा) ठेवला जातो. तिला धूप घातला जातो. भक्तीचे चांगले फळ देवी देते. देवी येडा ( फेरा) सुताचा घेती. अशा प्रकारे इतर देवाची नावे घेऊन जत संपविली जाते.

भाऊ- बहिणीची तुलना जतीद्वारा केली जाते. भाऊ जी कामे करू शकतो ती कामे बहीण करण्याचा प्रयत्न करते पण तिला ते जमत नाही.

**उदा. दादानी आवळी कुड्याळी हो. माझ्याने चवळी कुटू नजो.**

पुढे उपरोकत भाषा वापरून माणसाकडे सगळे असूनही त्याला ते वापरता येत नाही याविषयी सांगितले आहे. लोक आपल्याकडे आहे त्यात कधीही संतोष मानत नाही. जे आहे त्याच्यापेक्षा जास्त असावे अशी इच्छा करत राहतात. त्यामुळे ते न मिळाल्यामुळे तो व्यक्ती खूष राहू शकत नाही. जे आहे त्यामध्ये सुख मानावे  नाही तर कधी ही सुखी राहणार नाही. असा बोध देणारी एक जत आहे.

**उदा. पाठीत दहीबा उपशी गेला**

**भरलेल्या नहीतल्यांनी तान्हशी गेला**

**सुकेले नहीत जाऊन संतोशी झाला**

उपरोक्त गीतात लक्षात येते की दही पाठीवर होते पण दहीपेक्षा जास्त काही तरी चांगले मिळेल या आशेने दही न खाता तो व्यक्ती पुढे गेला. पुढे त्याला काहीच मिळाले नाही. त्यानंतर त्याला भरलेली नदी मिळाली. मनात लालच असल्यामुळे तो नदी  त्याची तान्ह भागवू शकली नाही. सुकलेल्या नदीमध्ये जाऊन त्याची तान भागली. याचाच अर्थ जास्त लालच करू नये. जे आहे त्यात समाधान मानावे.

जतीच्या स्वरूपात पांडवाची पौराणिक कथा सांगितली जाते. पांडव वनवाशी जाताना काय घडले यांची कथा जतीद्वारा गाऊन सांगितली जाते.

**उदा. पांडव निघालं वनवाशी हो**

**चालत बोलत किती रात्र झाली हो.**

पांडव वनवासाला जाण्यासाठी निघाले. जाताना फार रात्र होते. रात्री झोपण्यासाठी निवासस्थान शोधतात. पांडवाना चिंचेचे झाड दिसते. त्यानंतर ते चिंचेखाली विश्राम करण्यासाठी थांबले. चिंचे डाळे काडून ते अंथरूण करतात. कराड ( सुकलेले गवत)  काडून जमखान करतात. दगडाची उशी करतात. ताडमाडाचे झाड मोडून आग पेटवली जाते. पहारा देण्यासाठी पाच ही जणाना पार ( वेळ) वाटून दिला जातो. पहिला पहार कोण देणार  यांच्यावर चर्चा सुरू होते. दुसऱ्या पहारा सहदेव देणार असे ठरते. नंतर अर्जून आणि भीम ठेवणार असे ठरत. असा एकंदरीत जतीचा आशय आहे.

स्रिला उद्देशून काही जती म्हटल्या जातात. स्रिच्या भांगात कुंकू आहे म्हणजे ती विवाहित आहे हे लक्षात येते. नवरा घरात नसेल तर तिला तिच्या नवऱ्याबद्दल गीताच्याद्वारे विचारले जाते.

**हातात काठ्या कण्यारणीचा**

**भांग भरला नारी तुझा**

**नारी तुझा घरदार कुणानी गेला ?**

**३.२.५.२ भाषिक अभ्यास**

शिमगा गीते बोली भाषेत आहे. ही गीते सरळ म्हटली जात नाही. यामध्ये कल्पनाचा, उपमाचा ही समावेश असतो. गीतावर आधुनिक जीवनशैलीचा प्रभाव दिसून येतो. काही गीते प्रश्नाअर्थी स्वरूपाची असतात.

**उदा.भांग भरला नारी तुझा**

**नारी तुझा घरदार कुणानी गेला ?**

गीतामध्ये काही ठिकाणी यमक जुळवण्याचा प्रयत्न केला आहे. यमक जुळवून गीते पूर्ण केली आहे.

**उदा. इडाबा घेती पानाचा हो. खडाबा घेती धुपाचा**

**तुरोबा ठेवती मोत्याचा हो. येडाबा घेती सूताचा.**

शिमगा गीतामध्ये एक प्रकारे ताल असणे आवश्यक असते. त्या तालाच्या नादात म्हटले तरच ते गीत प्रभावी होते. तो ताल या गीतातून दिसून येतो. गीतात काही ठिकाणी शब्दाची पुनरावृत्ती पहायला मिळते.

**उदा.अशी अशी जानाबाई मानाची हो.**

## ४.३ पळसकाटा परिसरातील धनगर समाजातील लोककथा

लोककथा मौखिक परंपरेने एका पीढ़ीकडून दुसऱ्या पिढ़ीकडे संक्रमित होते. लोककथा समाज मनाशी एकरूप असतात.

लोककथेचे अनेक प्रकार आहे. दैवत कथा, अद्भूतरम्य कथा, उत्पती कथा, स्पष्टीकरणात्मक, दंत कथा, बोध कथा, प्राणी कथा, हास्य कथा, वीर कथा, अनुभव कथा, वर्त वैफल्य कथा, वास्तव कथा इ. लोककथेचे प्रकार

आहेत. जिथे जिथे माणूस आहे तिथे तिथे लोककथा अस्तित्वात आहे. पळसकाटा परिसरात अशाच प्रकारच्या वेगवेगळया कथा धनगर समाजातील लोक सांगतात.

## ४.३.१ कथांचा आशयनिष्ठ अभ्यास

### ३.३.१.१ प्राणी कथा

प्राणी कथांमधून प्राण्याद्वारा लहान मुलांना चांगली शिकवण देण्याचा प्रयत्न केला जातो. लहान मुलांना प्राणी प्रिय असतात त्यामुळे ती शिकवण त्यांच्या लक्षात राहते. अशा प्राण्याच्या कथा पळसकटा परिसरात सांगितल्या जातात.

**' प्राण्याची पार्टी'** या कथेतून शेवटी बोध मिळतो. ह्या कथेतून मुलांवर चांगले संस्कार होतात. खोटे बोलणे चुकेचे असते. खोटे बोलल्यामुळे शेवटी शिक्षा होतेते. नेहमी खरे बोलावे ही शिकवण या कथेतून मुलांना दिली जाते.

निसर्गाचा विचार करायचा झाला तर प्राणी कथा असल्यामुळे ती जंगलात म्हणजे निसर्गाच्या सानिध्यात कथा आकार घेत आहे. कथेमध्ये नदीचा उल्लेख आला आहे. निसर्गातील वेगवेगळे घटक प्रभावीपणे आलेले आहे.

दुसरी कथा **' म्हातारा सिंह'** ही कथा काल्पनिक आहे. कल्पनेवर आधारलेली असली तरी योग्य तो बोध देण्याचे काम कथा करते. कथेच्या माध्यमातून मुलांवर चांगले संस्कार घडविले जाते.

कोणत्याही संकटामध्ये सापडल्यानंतर जर बुद्धीने विचार केला तर त्या संकटातून आपण सहज बाहेर पडू शकतो. या कथेत ससा आपल्या बुद्धीचा वापर करून स्वतःचा प्राण वाचवतो. खालील प्रसंगातून ते दिसून येते-

**उदा. ससा मुद्याम उशीरा सिंहाकडे जातो व सिंहाला सांगतो वाटेत आपल्याला दुसरा सिंह भेटला त्यामुळे उशीर झाला. सिंह रागवून दुसऱ्या सिंहाला भेटण्यासाठी जातो. विहिरीत स्वतःचे प्रतिबिंब पाहून दुसरा सिंह समजून उडी मारतो.**

सिंहाच्या मुर्खतेमुळे सिंह आपला जीव गमावून बसतो. दुसऱ्यावर कधीही दोळे बंद करून विश्वास ठेवू नये ही शिकवण या कथेतून मिळते. संकटाच्या वेळी बुद्धीनी काम करावे.

या दोन्ही निवळ बोध देणाऱ्या कथा आहेत. समाजाला शिकवण देणे हे कथेचे मूळ प्रयोजन आहे.

**३.३.१.२ अद्भूतरम्य कथा**

धनगर समाजामध्ये अनेक कल्पनिक कथा सांगितल्या जातात. कल्पनाच्या द्वारे समाजाला शिकवण देण्याचे कार्य पार पाडले जाते. अशा कथा शेवटी बोध देऊन संपतात. अशाच कथा पळसकाटा परिसरातील धनगर समाजामध्ये प्रचलित आहेत.

‘ **म्हातारीची कथा’** नैतिक शिकवण व बोध देण्याचा प्रयत्न या कथेतून केलेला आहे. आम्ही दुसऱ्याबरोबर जसे वागतो तशीच वागणूक समोरचा आपल्याला देतो. जो दुसऱ्याबदल वाईट विचार करतो त्याचे कधीच बरे होत नाही उलट त्याचेच वाईटच होते.

**उदा. कथेतील सून आपल्या सासूला मारण्याचा प्रयत्न करते पण शेवटी ती स्वतः मरते.**

आपण जर आपल्या बुद्धीचा वापर केला तर कोणत्याही संकटातून आपण बाहेर पडू शकतो. दुसऱ्यावर डोळे बंद करून विश्वास ठेवायचा नसतो त्याचे परिणाम वाईट होऊ शकतात. ही शिकवण ही कथा देते.

**उदा. म्हातारी सांगते मला जाळण्यानंतर मला देवाने भांगर दिले. सून विश्वास ठेवून आपल्या नवऱ्याला सांगते आपल्याला जाळ.**

यावरून लक्षात येते की लोभामुळे माणूस सत्य आणि असत्यामध्ये फरक करू शकत नाही. कल्पनाच्या द्वारा समाजातील सत्य समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न या कथेतून केला आहे. आज समाजात अनेक लोक चांगुलपणाचा मुखवटा लावून फिरत आहे. या सर्वाचा विचार या कथेतून केला आहे. थोडक्यात वास्तवाचे दर्शन घडविणारी ही कथा आहे.

दुसरी कथा ‘**बायको आनी कुत्री’** या कथेतून अहंकार माणसाला कसा आंधळा करतो याचे दर्शन घडते. आई- मुलीचे प्रेमाचे नाते कल्पनेच्या आधारे रंगविलेले आहे. लोभी वृत्तीचे दर्शन कथा घडविते.

वाईट कर्माचे फळ नेहमी वाईट असते असा बोध देणारी कथा म्हणजे **‘ म्हतारी आणि ल्योक’** कथेचे वैशिष्ट सांगायचे झाले तर कथेमध्ये गीतांचा वापर केला आहे. गीते गाऊन ही कथा पूर्ण होते. या गीताची भाषा

कोकणी आणि मराठी मिश्रित आहे. कथेमधून नवरा तिच्या मरण्यापूर्वी सगळया गोष्टी करून घेतो. शेवटी शेवटचा श्रृगांर ही करून घेतो.

**३.३.१.३ वास्तव कथा**

काही कथांतून इतिहासाचे दर्शन घडते. तर काही कथा वास्तवावर आधारित असतात. पळसकाटा परिसरात 'गवळी' आणि 'धनगर' यांचा सहसंबंध दाखवणारी एक कथा आहे. कथेतून धनगर समाजाचे सामाजिक जीवन दिसून येते. **' धनगर आणि गवळी'** या कथेतून धनगर लोकांचे व्यवसाय, वेशभूषेचे चित्रण केले आहे. त्याचप्रमाणे रुढी, परंपराचे, विधीचे दर्शन कथेतून घडते. उदा. गुरांना चारणीला घेऊन जाण्यापूर्वी नक्षत्र पाहिले जायचे.

धनगरांचेचे खरे धन त्यांची संपत्ती म्हणजे गुरे आणि बकऱ्या. मुलांवर झालेल्या चांगल्या संस्काराची झलक कथातून दिसून येते. वडिलधाऱ्या माणसाला मान देणे. मोठ्या माणसाचा शब्द राखणे इत्यादीचे दर्शन कथा घडविते.' **गवळी आणि धनगर'** या कथेतून या सर्व गोष्टी दिसून येतात.

देवचाराविषयी कथा धनगर समाजात सांगितली जाते. पूर्वीच्या काळात रात्री, दुपारी देवचार फिरायचे. देवचाराची जो वाट अडवित असे त्यालाच ते शिक्षा देत असे. काही दिवस त्यांना अदृश्य करत असे. **'देवचार'** या कथेत जेव्हा आपण दुसऱ्याच्या गावात जातो तेव्हा त्यांच्या रिती समजून घेणे आवश्यक आहे हा बोध ही कथा देते. आपल्याला इतर कोणी काही सांगत असेल तर ते ऐकण्यात स्वतःच हित असते नाही तर त्याचे परिणाम वाईट होते. **उदा. कथेत देवचार नवीन विवाहित स्रिला सांगतो दुपारी तळीजवळ येऊ नको तेव्हा ती ऐकत नाही. दुसऱ्या दिवशी परत जाते. परत सांगून ही ऐकत नसल्यामुळे तिला अदृश्य करतो.**

**३.३.१.४ दंत कथा**

दंत कथा म्हणजे ती असत्य असते. तरीइतिहास आणि कल्पनानेच्या मिश्रणातून या कथांचा जन्म होतो. अशीच एक कथा धनगर समाजामध्ये सांगितली जाते. **उदा. नंदी आणि महादेव .** ही कथा पौराणिक कथा आहे. नंदीने केलेल्या एक चूकीमुळे त्याला धरतीवर यावे लागते. **उदा. एक प्रसंग- महादेवाने नंदीला सांगले धरतीवर जाऊन सर्वाना सांग दिवसातून एक वेळा जेवायचे व दोन वेळा आंघोळ करायची. नंदी धरतीवर येऊन**

**उलट सांगतो. त्यामुळे लोकांना धान्य कमी पडू लागते. तेव्हा महादेवाने शेत कसण्यासाठी नंदीला पाठवले.** यावरून लक्षात येते की एका चुकी किती नुकसान होऊ शकते.

**४.३.२ भाषिक अभ्यास**

कथा साध्या आणि सोप्या भाषेत सांगितल्या जातात. कथेची भाषा धनगरी भाषा आहे. धनगर भाषा मराठी भाषेला जवळ जाणारी आहे. पण काही शब्द आहे जे मूळ मराठीत वेगळे व धनगर भाषेत वेगळे आहे

| **मराठी** | **धनगर** |
|---|---|
| हा | ह्यो |
| नाही | नव्हता |
| होता | हुता |
| कुठुन | कुठणी |
| केव्हा | कवा |
| कोणाला | कुनाला |

आधुनिकतेमुळे इंग्रजी शब्दांचा वापर झाला लोक करायला लागलेले आहे. उदा. **मिंटिग, लेट, पार्टी , लास्ट इ.** शब्द कथेत आलेले आहे. काही गीते कोकणी आणि मराठी मिश्रित आहे.

**उदा. जेवण- बिवण कर मगे नारी. सांगता तुका कुम कुम काणी.**
**भाकरी- बिकरी भाज मगे नारी. सांगता तुका कुम कुम काणी.**

उपरोक्त गीतात **'भाकरी'** हा शब्द मराठीतला आहे. काही अर्थ नसलेले शब्द केवळ तो नाद निर्माण करण्यासाठी वापरले जातात**. उदा. बिवण, बिकरी.** उपरोक्त गीतात प्रत्येक ओळीतून यमक जुळवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. **उदा. जेवण- बिवण.** त्याचप्रमाणे शब्दाची पृनरावृत्ती ही पहायला मिळते. **उदा. कुम कुम इ.** काही ठिकाणी उपमा दिलेल्या आहे. **उदा. ' घाटेला'** देवाची उपमा दिली आहे.

कथांमधले काही शब्द वर्तमानात कालबाह्य झालेले आहे. **उदा. लिंगायीत. लिंगायीत** या शब्दाचा अर्थ शुद्ध शाखाहारी असा आहे. आज हा शब्द वापरला जात नाही. काही कथानकाचा शेवट प्रश्न चिन्हाने होतो. त्यामुळे मनात एक उत्सुकता निर्माण होते. म्हणजे ऐकणाऱ्याला विचार करायला लावणाऱ्या कथा या समाजात सांगितल्या जातात. कथानमधून वातावरणाचा ही उल्लेख एकदम सौदर्यपूर्ण केला आहे.

**४.३.३ कौटुंबिक विषय**

सासू आणि सूनेमधला संघर्ष काही कथांतून पहायला मिळतो. परिवारमध्ये होणारे वादविवाद कथातून मांडले जातात. एकत्र कुटुंब पद्धतीत होणाऱ्या अडचणी कथेत चित्रित केल्या आहे. सामाजिक प्रश्नांची उकलही करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आई व मुलांच्या नात्याविषयी एक कथा आहे. त्या कथेत आपल्या आईला त्रास होऊ नये म्हणून सगळी सोय करून नोकरीसाठी तो परगावी जातो. बायकोला आईची काळजी घे म्हणून सांगतो. बायको नवरा गेल्यानंतर आईला फार त्रास देते. मुलगा घरी येऊन जेव्हा आपल्या आईचे होणारे हाल बघतो व आपल्या बायकोला  मारतो. आईच्या तुलनेत बायकोची किम्मत शुन्य असते अशी शिकवण कथा देते. आईवर असलेले अटूट प्रेम या कथेतून दिसून येते.

## ४.४ पळसकाटा परिसरातील धनगर समाजीतील उखाणे आणि कोडी

**४.४.१ उखाणे**

‘उखाणा’ या शब्दाला संस्कृतमध्ये प्रहेलिका, ब्रहमोद, कुट, प्रश्न इ. प्रतिशब्द आहे. उखाण्याची परंपरा अनेक काळापासून सुरू आहे. उखाणा सर्वत्र आढळतो. प्रत्येक जाती - जमातीत उखाणे घेतले जातात. धनगर समाजात स्त्री, पुरुष आनंदी प्रसंगी किंवा लग्नाप्रसंगी उखाणे घेत असल्याचे दिसून येते. उखाण्यातून कधी कधी थटामस्करी  केली जाते.

**३.४.१.१ प्रयोजन**

धनगर समाजामध्ये नवऱ्याला मान असतो. बायका नवऱ्याला नावाने हाक मारत नाही. फक्त उखाण्याच्या माध्यमातूनच त्यांना आपल्या नवऱ्याचे नाव घेता येते. उखण्यातून ती स्त्री कोणाची पत्नी आहे हे समजते. त्याचबरोबर प्रथा परंपरा याचा भाग म्हणून उखाणे घेण्याची पद्धत आहे.

**३.४.१.२ आधुनिक जीवनशैलीचा प्रभाव**

जस जसा काळात बदल होत राहातो तस तसा माणसामध्ये बदल होतो. माणूस नवे बदल स्विकारायला लागतो. त्यामुळे त्यांच्या भाषेत नवे शब्द यायला लागतात. आधुनिक जीवनशैलीचा प्रभाव त्यांच्यावर होऊ लागतो. इतर समाजाशी वा लोकांशी संबध आल्यानंतर भाषेमध्ये नकळतपणे बदल होतो.

पळसकाटा परिसरात हा बदल पहायला मिळतो. त्यांच्या लोकवाङ्मयवर आधुनिक जीवनशैलीचा आणि भाषेचा प्रभाव दिसून येतो.

**उदा. १.ग्लासार ग्लास.** ग्लास हा इंग्रजी शब्द आहे. आधुनिक जीवनातले हे शब्द आहे.

**उदा. २ इंग्रजीत चंद्राला म्हणतात मून ( पत्तीचे नाव ) रावाचे नाव घेत मी ( आडनाव ) ची सून.** यामध्ये इंग्रजीतला मून हा शब्द वापरून उखाणा तयार केला आहे. आधुनिक काळात इतर भाषेतील शब्द स्विकारून धनगर महिला आपला उखाणा तयार करतात.

**३.४.१.३ व्यवसायाशी असलेला संबंध**

अवतीभोवती लेखक जे पाहतो, अनुभवतो त्याचाच उल्लेख तो आपल्या साहित्यात करतो. लोकजीवनातील अशा अनेक प्रसंगांना शब्दांची जोड देऊन उखाणे, म्हणी, लोकगीते इ. नकळत आकारास येतात. लोकजीवनातील एक महत्वाचा घटक म्हणजे व्यवसाय होय. तेव्हा व्यवसायाशी संबधित गोष्टी सांगणे साहजिक आहे.

**उदा. अवटंग चुन्ना नवटंग चुन्ना**
**शेरबर सुपाऱ्या, बत्तीस पानं.**

या ओळीमध्ये सुपारी आणि पाने यांचा उल्लेख आला आहे. पळसकाटा परिसरात जास्त प्रमाणात धनगर लोक सुपारी उत्पादन करतात. सुपारी उत्पादन हा काही लोकांचा व्यवसाय आहे.

त्याचप्रमाणे शेती पळसकाटा परिसरातील मुख्य व्यवसाय होय. अगोदर गावातला प्रत्येक व्यक्ती शेती करीत होता. शेती करण्याची एक विशिष्ट पद्धत असते. ही पद्धत पूर्ण झाल्यानंतर पीक येते. त्यातील एका पायरीचा वापर करून धनगर स्त्रियाने उखाणा तयार केला आहे .

**उदा. भाताच्या खळ्याव नासण्याचा कोंडा**

**नकलीच्या च्या पाठीत रेशमाचा गोंडा.**

धनगर समाजामध्ये भात कापल्यानंतर वारे करण्यासाठी खळयाव (शेताच्या बाजूला शेणाने सारवलेल अंगण) घेऊन जातात. त्या भाताच्या खळयाव नाचणे कापून ते वाळवले जातात. त्यानंतर त्या नाचण्यातील कोंडा वेगळा काडतात.

गोपपालन हा धनगर समाजाचा मुख्य व्यवसाय आहे. आधुनिक काळातही हा पहायला मिळतो. वर्तमानत पळसकाटा परिसरात गयी, म्हशी पाळतात. या व्यवसायाचे प्रतिबिंब धनगर उखाण्यातून पहायला मिळते.

**उदा. म्हशीत म्हस टिकी**

**पिंजरीच मोते नकलीच्या नाखी.**

### ३.४.१.४ भाषिक अभ्यास

आधुनिक जीवनशैलीच्या प्रभावमुळे इंग्रजी शब्दाचा वापर केला आहे. **उदा. ग्लास, मून इ.** काही असे शब्द वापरले आहेत ज्याचा अर्थ वेगळा असतो. तो शब्द तिथे अभिप्रेत नसतो.

**उदा. चमचम चगात ,मी हुते मनात**

**खन चोळी अंगात, गुलार भांगात**

**लवंग मुठीत, जायफळ वटीत**

**_____ जोड सुपारी वाटीत**

**गुलार** ह्या शब्दाचा अर्थ होळीत जो लावतो तो रंग आहे. स्त्रिया भांगत लावतात ते **कुंकू** असते. इथे गुलार ह्या शब्दाच्या जागी कुंकू हा शब्द अभिप्रेत होता. कुंकू हे सौभाग्यवतीचे लेणे असते. कुंकू शब्दात जो भाव आहे तो गुलार या शब्दातून स्पष्ट होत नाही.

काही शब्दाची पुनरावृती झालेली दिसून येते पण काळाच्या ओघात हे शब्द नष्ट झाले आहेत. **उदा. गावड्याची इ.** गावडा म्हणजे प्रमुख जो असतो तो. सर्वांच्या घरात घरातला पुरुष हा गावडा असायचा. म्हणून त्यांच्या उखाण्यातून तसा उल्लेख येतो.

**उदा. झाड झुमराच, फुल हुमऱ्याच**

**लेक मराठ्याची सून सम्रताची**

**अस्तुरी बाप्या गावड्याची.**

त्याचप्रमाणे **खन चोळी, अस्तुरी, सम्रताची** हे शब्द ही काळाच्या ओघात कालबाह्य झालेले आहे. पूर्वीच्या काळात हे शब्द वापरण्यात येत होते. आधुनिक काळात यांचा वापर होत नाही. '**अस्तुरी'** या शब्दाचा अर्थ धनगर भाषेत **बायको** असा आहे. तर **सम्रताची** या शब्दचा अर्थ **श्रीमंताची** आहे**. ' खन चोळी'** याचा अर्थ खन म्हणजे ' **कपड्याचा पिस'** तर ' **चोळी'** या शब्दाचा अर्थ ब्लाऊज आहे. पूर्वा कपडा विकत घेऊन ब्लाऊज शिवत होते म्हणून खन चोळी हा शब्द वापरला जायचा.

प्रत्येक उखाण्यातून यमक जोडण्याचा प्रयत्न केला जातो. **उदा. मसाला- कशाला, अंगात- भांगात इ.** प्रत्येक उखाणा यमक जुळवून पूर्ण केला आहे. काही उखण्यात प्रश्न चिन्हांचा वापर केला आहे.

**उदा. अवटंग चुन्ना नवटंग चुन्ना**

**शेरबर सुपाऱ्या, बत्तीस पानं**

**गळ्यात हार वाकू कशी ?**

**पायात पैंजण चालू कशी ?**

**सदरव बसून बोलू कशी ?**

गळ्यात हार म्हणजे ते एक बंधन आहे ज्यामुळे तिला तिच्या इच्छेप्रमाणे जगता येत नाही. पायात पैंजण म्हणजे पायात बेड्या आहेत. ज्यामुळे ती कुठे ही बाहेर सरु शकत नाही. धनगर समाजातील बायका पूर्वी आपल्या

कामात दंग असायच्या. त्यांना बसून बोलायला वेळ नसायचा. ह्या तिन्ही ओळीत मोठा अर्थ दडलेला आहे. प्रश्न चिन्हांमुळे तो लक्षात येतो. धनगर स्री काहीही करण्यापूर्वी परवानगी घेते.

**४.४.२ कोडी**

लोकसाहित्यात कोड्यांची परंपरा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. प्रश्न आणि उत्तर असे कोड्याचे स्वरूप असते. कोड्यात प्रश्न काव्यात्मक पद्धतीने विचारला जातो तर उत्तर एका शब्दात सांगायचे असते. आपल्या दैनंदिन जीवनातील घटनांचे कल्पनाचा आधार घेऊन कोड्याची रचना केली जाते. कोडी ही सरळ पद्धतीने न विचारता ती उपमांच्या आधारे घेऊन विचारली जातात.[ii]

**३.४.२.१ प्रयोजन**

धनगर समाजातील लोक शेतात काम करताना वेळ लवकर सरावा म्हणून कोडी घालत होते. कोडी हा मनोरंजनाचा .एक भाग असतो. कोड्यामुळे मनोरंजन होत होते त्यामुळे श्रमाची जाणीव त्यांना होत नाही. कोड्यातून विचार करण्याची क्षमता वाढते. बुद्धीचा वापर करून कोडी सोडावावी लागतात. कोड्यांमुळे एक प्रकारे बुद्धिला चालना मिळते.

**३.४.२.२ कोड्याचा लोकजीवनाशी असलेला संबंध**

कोडी ही मानव जीवनाचा भाग असतात. धनगर समाजात शेती करताना वेळ लवकर सरावा म्हणून कोडी घालून वेळ घालवत असे. ही कोडी दैनंदिन जीवनावर आधारित असतात. लोकजीवानातूनच कोडी आकाराला येतात. कोड्याचा लोकजीवनाशी संबंध असतो. कोड्यातून धनगराचा व्यवसाय प्रतिबिंबीत होतो.

**उदा. ये म्हटल्याव येईना जा म्हटल्याव जाईना वाघ का खाईना.**

वरील कोड्याचे उत्तर बुजगावणे आहे. बुजगावणे म्हणजे गवत आणि काठी वापरून केलेला पुतळा. रात्री शेतात जनावर येऊन नाशाडी करू नये म्हणून हा पुतळा शेतात लावला जातो. जनावर त्या पुतळयाला पाहून घाबरून शेतात येत नाही. ते बुजगावणे रात्री माणसाप्रमाणे दिसते. पण त्याला बोलावले तरी येत नाही. ते एका जागेवर स्थिर असतो.

**उदा. बत्तीस चिऱ्यामध्ये नागीण डुले.**

या कोड्याचे उत्तर - **जीभ** आणि **दात** आहे. बत्तीस चिऱ्यामध्ये म्हणजे बत्तीस दातामध्ये नागीण म्हणजे जीभ. जीभ नागीण सारखी दातामध्ये डुलत असते. दाताना चिऱ्याची उपमा दिलेल्या आहे तर जीभेला नागीणीची उपमा दिलेली आहे.

**उदा. काळी काठी त्याल लाटी बाकती म्हणून मोडना**

वरील कोड्याचे उत्तर केस आहे. केस काळे असतात त्यांना तेल लावून कसे ही हलवले जाते. पण ते केस मोडत नाही.

धनगर जीवनात काठी हा जीवनाचा भाग असतो. धनगर पुरुष म्हणजे कमरेला रुमाला, खांद्यावर कांबळ, हातात काठी अशा वेषात असतो. या काठीला घेऊन कोडे घातले जाते.

**उदा. फिर फिर फिरत पशा येवड्या जाग्याव येऊन बसत.**

या कोड्याचे उत्तर – काठी आहे. धनगर लोक गुरांना रानात घेऊन जाताना सोबत जातात. ती काठी मालकाबरोबर दिवसभर हिंडत असते. काठी छोट्याशा जागेत मावते.

धनगर समाजात शेती हा पारंपरिक व्यवसाय केला जातो. शेती करण्यासाठी अनेक अवजारांचा वापर केला जातो. त्यामध्ये खुरप यांचा वापर करून भात, कणसे कापली जातात. खुरप याला धरून कोडे घातले जाते.

**उदा. चारे भोरेचा पाला माझ्या बकून खाल्ला.**

यांच उत्तर खुरप. शेत, गवत खुरप्याच्या सहाय्याने कापले जाते. चारे भोरेचा पाला म्हणजेच हिरवे शेत आणि माझ्या बकून खाल्ला म्हणजे तो खुरप्याने कापला. इथे उपमा वापरून इथे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

धनगर समाजात नाचण्याची शेती करतात. नाचण्याची भाकरी हा त्यांच्या आहारातला एक भाग आहे. नाचण्याची भाकरी हाताने थापटून घातली जाते. ती चपातीप्रमाणे लाटता येत नाही. या भाकरी संबधीत ही काही कोडी आहे.

**उदा. दहाने धभकले पाचाने परतले**

उत्तर भाकरी. दहाने धभकले म्हणजे ती भाकरी दोन्ही हाताचा वापर करून थापली जाते. दोन्ही हाताच्या दहा बोटाचा इथे वापर होतो. त्यानंतर पाचाने परतले म्हणजेच ती भाकरी एका हाताने परतली जाते.

धनगर समाजात इतर वस्तूंप्रमाणे जात्याला महत्त्वाचे स्थान असते. धनगरांच्या प्रत्येक घरात जाते हे असतेच. या जात्याविषयी काही कोडी घातली जातात.

उदा.**कोरडे व्हाळात वाघ ओराडतो**

याचे उत्तर **जातं** आहे. जेव्हा जात्यामधे दळाण्यासाठी घातलेले धान्य संपते तेव्हा जाते ओडताना वेगळाचा आवाज येतो. कोरडे व्हाळात म्हणजे जात्यामध्ये काही नसते तेव्हा ते कोरड पडत त्यावेळी वाघ ओरडतो म्हणजेच जात्यामधून वेगळाच आवज येतो.

अशा प्रकारे दैनंदिन जीवनातील संदर्भ घेऊन कोडी धनगर समाजात घातली जातात. ही कोडी धनगरांच्या जीवनाचा एक भाग असतात.

**३.४.२.३ भाषिक अभ्यास**

धनगर समाजात कोडी मराठी किंवा कोकणी भाषेत घातली जातात. कोडी सरळ भाषेत विचारली जात नाही. कोड्यामध्ये उपमांचा वापर केला जातो. उपमाच्या आधारे ही कोडी आकाराला येतात. दैनंदिन जीवनात वापरणारे शब्द कोड्यामध्ये येतात.

कोड्याना योग्य स्वरूप येण्यासाठी काहीकडे शब्दाची पुनरावृत्ती केली जाते. कोड्यामध्ये आवश्यक त्या ठिकाणी शब्दाची पुनरावृत्ती करून कोडी पूर्ण केली जातात.

उदा. . फिर फिर फिरत पशा येवड्या जाग्याव येऊन बसत.

कोड्यामध्ये काही ठिकाणी यमकाची जुळवाजुळवी केलेली पहायला मिळते. यमकाच्या सहाय्याने काही कोडी पूर्ण होतात. यमक जोडल्याने कोड्याना एक प्रकारची लय येते.

उदा. ये म्हटल्याव येईना, जा म्हटल्याव जाईना, वाघ का खाईना.

## ४.५ पळसकाटा परिसरातील धनगर समाजात प्रचलित असलेली म्हणी आणि वाक्यप्रचार.

### ४.५.१ म्हणी

**' म्हण'** एक समाजाचा आरसा आहे. माणसाच्या जन्माबरोबरच म्हणी जन्माला येतात. म्हणी मौखिक परंपरेने पुढे आलेल्या असतात. कै. वि.वि. भिडे म्हणतात, " लोकांनी वारंवार म्हटले किंवा उच्चारलेले जे वाक्य ते म्हण." म्हणी मोजक्या शब्दात जास्त आशय सांगतात. म्हणीतून जे व्यक्त होते ते समाजजीवनाचे सत्य असते.

अशाच प्रकारच्या म्हणी पळसकाटा परिसरातील धनगर समाजामध्ये प्रचलित आहे. ज्या मोजक्या शब्दात जास्त आशय व्यक्त करतात.

### ३.५.१.१ प्रयोजन

'म्हण' जी कमीत कमी शब्दात खूप काही सांगून जाते. म्हणीद्वारे समाजाला शिकवण दिली जाते. प्रत्येक म्हणीमागे एक कार्य असते. म्हण अशीच येत नाही. म्हण अस्तित्वात येण्यामागे ही काही कारणे असतात. म्हण नैतिक शिकवण देणे. सत्याचा बोध करून देणे. ही म्हणी मागची एक प्रयोजने असतात.

### ३.५.१.२ अर्थ दृष्ट्या अभ्यास

म्हणी दिसायला लहान असल्या तरी त्यामध्ये मोठा अर्थ दडलेला असतो. कमीत शब्दात शिकवण देतात त्या म्हणजे म्हणी. म्हणीद्वारा लोकांना त्यांच्या चुका दाखवता येतात. धनगर समाजात अशा काही म्हणी आहेत.

**उदा. आयत्याव कोयता.**

**आयत्याव कोयता** या म्हणीचा अर्थ स्वतः काही करायचे नाही. दुसऱ्याने जे करून ठेवले आहे ते स्वतः केले असे सांगून मिरवायचे. आळशी वृत्तीचे दर्शन या म्हणीतून घडते. पुढे परिस्थितीवर आधारित म्हणी सांगितल्या.

**उदा. शेंदरी बघून पाय पसरा.**

या म्हणीचा अर्थ असा आहे की परिस्थिती पाहून माणसाने वागले पाहिजे. आपल्याला आर्थिक दृष्ट्या ज्या गोष्टी करता  येणे शक्य नाही त्या करण्यासाठी धावू नये. म्हणजेच नको त्या गोष्टीचे  हट करणे सोडा. जे आहे त्यामध्ये खुश रहायला शिका. तशीच आणखीन एक म्हण आहे जी परिस्थिवरून म्हटली जाते.

**उदा. नेट मोठ घरात उंदीर शेपट्या बडीवत्यात.**

या म्हणीतून सांगितले आहे की ज्याच्याकडे काहीही नाही घरात खाण्यासाठी अन्न नाही तो पण इतरांपुढे आपण मोठा असल्याचा आव आणतो. गरीब आहे पण आपण श्रीमंत असलेले नाटक करतो. श्रीमंतीचा मुखवटा चडवून मिरवतो त्या माणसाला पाहून ही म्हण म्हटली जाते.

लोकांची नेहमी वाईट सवय असते जेव्हा माणूस असतो तेव्हा त्याची किमंत कोणी करत नाही. त्या व्यक्तिबद्दल नेहमी वाईट बोलतात. तो जेव्हा मरण पावतो तेव्हा त्याच्याबद्दल चांगले बोलतात. जिवंत असताना त्याची प्रशंसा कोणीही करत नाही. पण तो जेव्हा मरतो त्यांच्यावर प्रशंसाचा पाऊस बरसतो. धनगर समाजात याला एक म्हण आहे.

**उदा. मेलेल्या म्हशीला शेरभर दूध.**

म्हणजेच म्हैस जिवंत असते तेव्हा म्हणतात म्हैस दूधच देत नाही. जेव्हा ती मरते तेव्हा मात्र सत्य सांगतात की ती फार दूध देत होती. माणसाच्या वृत्तीवर काही म्हणी धनगर समाजात प्रचलित आहे.

**उदा. कुत्र्याची शेपटी वाकडी ती वाकडीच.**

कुत्र्याची शेपटी किती सरळ करण्याचा प्रयत्न केला तरी ती सरळ होत नाही. या म्हणीप्रमाणे समाजात कुत्र्याच्या शेपटीसारखी माणसे असतात. म्हणजे ती वाईट मार्गावर चालत असतात. त्यांना काहीही सांगितले तरी ते ऐकतात पण नेहमी स्वतः ला हवे तसेच वागतात. त्यांना कितीही समजवण्याचा प्रयत्न केला तरी ते सुधरत नाही. दुसरी म्हण जी वृत्तीवरून म्हटली जाते.

**उदा. भय हा पूण अक्कल नाही.**

या म्हणीचा अर्थ असा आहे की माणसाला भय असतो त्याला माहिती असते आपण जी गोष्ट करायला नको ती केल्याने काही तरी वाईट होणार तरी तो ती गोष्ट करतो. त्या माणसाला उद्देशून वरील म्हण म्हटली जाते. करण्याची भीती असते पूण अक्कल नसते.

समाजात अशी काही लोक असतात ज्यांची कोणतीही गोष्ट करण्याची तयारी नसते पण ती गोष्ट करण्यासाठी पुढे धावतात. तयारी नसताना कोणती ही गोष्ट करायला तयार असतात. अशा लोकांना उद्देशून खालील म्हण म्हटली जाते.

**उदा. कशात काय आणि फाटक्यात पाय.**

म्हणजेच आपल्याकडे काही नाही तरी पुढे पुढे करायचे. काही लोक असतात जे आपल्या जबाबदाऱ्या इतरांवर सोपतात. त्यांना उद्देशून एक म्हण म्हटली जाते.

**उदा. कुनाच्या म्हशी कोण क्याडत्यो उठाभशी.**

या म्हणीचा अर्थ ज्या व्यक्तीचे काम असते तो ते करत नाही. आपले काम दुसऱ्यांना सांगतो. ते काम करण्यासाठी दुसराच व्यक्ती त्रास घेतो ज्याचे काम आहे तो मजेत असतो तेव्हा ही म्हण म्हटली जाते. म्हणजेच कोणाचे काम आणि कोण करतो मेहनत आशी गत असते. पुढे आणखीन एक म्हण आहे जी वृत्तीवरच आधारित आहे.

**उदा. आंगाव आलेल शिंगाव उडावाच.**

या म्हणीचा अर्थ स्वतः चूक करायची ती चूक आपल्यावर आली की दुसऱ्यावर ढकलायची. आपण ती चूक केलीच नाही असा आव आणायचा. त्या चूकीत दुसऱ्याला अडकवायचे. त्याचप्रमाणे काही असे ही लोक समाजात असतात जी आपण किती चांगले आहेत हे सांगून मिरवत असतात. स्वतःचीच इतरांपुढे प्रशंसा करतात. पण ते जसे स्वतःला इतरांपुढे दाखतात वास्तवात ते त्याच्या उलट असतात. त्यांना उद्देशून एक म्हण म्हटली जाते.

**उदा. बाहेर बड़ाई घरात लड़ाई.**

माणसाच्या गुणाविषयी काही म्हणी धनगर समाजात प्रचलित आहे. काही म्हणी शरीराच्या अवयाचा आधारे रचलेल्या दिसून येतात.

**उदा. हाताची पाचीव बोट सारखी नसत्यात**

याचा अर्थ समाजात वेगवेगळ्या गुणधर्माची लोक असतात. जशी हाताची बोट सारखी नसतात तशीच सर्व माणससारखी नसतात. प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र अशी वेगळी ओळख असते. प्रत्येकाचे गुण वेगळे असतात. आणखीन एक म्हण आहे जी शरीराच्या अवयाची उपमा देऊन म्हटली जाते.

**उदा. एका हाताने टाळी वाजत नाही.**

या म्हणीचा अर्थ भांडण होते तेव्हा फक्त एका पक्षाची चुक नसते. भांडण होण्यामागे दोन्ही पक्षाचा समान वाटा असतो.

**उदा. जातं फुटलं नात तुटलं.**

धनगर समाजात भाविकी मध्ये भांडण झाले की वरील म्हण म्हटली जाते. जात्याला धनगर लोकांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान असते. जातं फुटल म्हणजे काहीही शिल्लक राहिले ते पुन्हा जोडता येत नाही. तसच नाते तुटले की ते पुन्हा जोडता येत नाही.

अशा अनेक म्हणी धनगर समाजात प्रचलित आहे. या म्हणीतून समाजातील अनेक वृत्ती प्रवृतीच्या लोकांची होते. म्हणी म्हणजे एक प्रकारचा ठोमणाच आहे. म्हणीतून प्रत्येकाचे गुणधर्म उपमाद्वारे सांगितले जातात.

**४.५.२ वाक्प्रचार**

वाक्प्रचाराचे स्वरूप म्हणीसारखेच असते. वाक्प्रचारात कमी शब्दात जास्त अर्थ दडलेला असतो वाक्यप्रचारात मुळच्या शब्दाचा लक्ष्यार्थ घ्यावा लागतो. विशिष्ट अर्थाने रूढ झालेल्या शब्दांना वाक्यप्रचार म्हटले जाते. वाक्प्रचार मोजक्या शब्दात गहन अर्थ व्यक्त करतो. लोकवाङ्मयातून किंवा लोकश्रद्धेतून हे वाक्यप्रचार निर्माण होतात. धनगर समाजात माणसाकडून त्यांच्या दैनंदिन जीवनात अनेक वाक्यप्रयोग होतात. त्या लोकांना माहिती ही नसते जे महत्त्वाचे प्रयोजनशील शब्द त्यांने वापरले आहे त्यांना वाक्प्राचार म्हणतात.

**३.५.२.१ प्रयोजन**

धनगर समाजात दैनंदिन जीवनात अनेक प्रयोजनशील शब्द नकळत वापरतात. यांतूनच वाक्प्रचार अस्तित्वात येतात. धनगर समाजात अनेक वृत्ती प्रवृतीचे लोक असतात या लोकांवर वाक्यप्रचाराचा वापर करून टिका केली जाते. वाक्प्रचारात मोजक्या शब्दात गहन अर्थ सांगण्याचे सामर्थ असते.

**३.५.२.२ अर्थदृष्ट्या अभ्यास**

वाक्प्रचार हे कमी शब्दात असले तरी त्यांच्यामध्ये गहन अर्थ दडलेला असतो. वाक्प्रचारात लक्ष्यार्थ समजून घेणे आवश्यक असते. वाक्प्रचारात मानवाच्या गुणावरून त्यांना प्राणी पक्ष्यांची उपमा दिली जाते.

**उदा. माशा मारणे**.

माशा मारणे हे रिकामटेकड्या माणसाला पाहून म्हटले जाते. माणसू जर काम करत असेल तर त्यांचे लक्ष इतर गोष्टीवर नसते तेव्हा त्याला आसपास असलेले जिव जंतू दिसत नाही. काहीही काम नसते तेव्हा त्यांचे लक्ष इतर गोष्टीकडे जाते. आणखीन एक वाक्यप्रचार आहे जे अशाच स्वरूपाचे आहे.

**उदा. नंदीबैल.**

नंदीबैल कोणती ही गोष्ट विचारली तर मान हलवितो. त्याचप्रमाणे जो नंदीबैलाप्रमाणे कोणेत्याही गोष्टीला मान हलवितो त्याला पाहून हा वाक्प्रचार म्हटला जातो.

संकट आल्यानंतर त्याला उद्देशून काही वाक्यप्रचार पळसकाटा परिसरातील धनगर लोक म्हणात.

**उदा. आभाळ कोंसाळणे.**

आभाळ कोसळणे म्हणजे याचा अर्थ मोठे संकट येणे. जेव्हा एखादे मोठे संकट नशीबी येते तेव्हा लोक आपल्यावर आभाळ कोंसळले असे म्हणतात.

**उदा. कपाळ फुटक.**

एखाद्याच्या आयुष्यात नेहमी दुख असते तेव्हा त्याला पाहून हा वाक्यप्रचार म्हटला जातो. म्हणजे त्याच्या नशीब काहीही चांगले लिहले नाही.

धनगर समाजात कष्ट करणे हा जीवनाचा मोठा भाग आहे. धनगर लोक हे कष्टाळू असतात. यांच्या कष्टाला संबोधणारे काही वाक्प्रचार पहायला मिळतात.

**उदा. जीवाचे रान करणे.**

धनगर पुरुष, स्त्री यांचे जीवन कष्टाने भरलेले असते. जीवाचे रान करणे म्हणजे खूप कष्ट करणे असा आहे. धनगर समाजात दैनंदिन जीवनात प्रत्येक व्यक्ती खूप कष्ट करतो. असाच आणखीन एक वाक्प्रचार पहायला मिळातो.

**उदा. हातपाय हलविणे.**

धनगर समाजात स्त्री, पुरुष यांच्या कामाची सुरुवात भल्या पहाटे होते ती उशिरा रात्रीपर्यंत काम संपत नाही. धनगर लोक दिवसभर एखाद्या यंत्राप्रमाणे काम करत असतात. त्यांना विश्राम करण्यासाठी किंचित ही वेळ नसतो. दिवसभर ही लोक हातपाय हलवित असतात म्हणजेच काम करत असतात.

माणूस हा समाजात वावरत असताना अनेक वृत्ती प्रवृत्ती घेऊन जगत असतो. माणसाच्या वृत्ती प्रवृत्तीला धरून काही वाक्यप्रचार अस्तित्वात आले आहेत.

**उदा. बाता मारणे.**

समाजात अशी काही माणसे असतात ज्याच्याकडे काहीही नसते पण आपल्या सगळं आहे असा आव आणून आपला मोठेपणा सांगतात. वरील वाक्प्रचार अशा लोकांना उद्देशून म्हटला जातो. आणखीन असाच एक वाक्प्रचार आहे जो माणसाच्या प्रवृत्तीचे दर्शन घडवितो.

**उदा. चण्याच्या झाडाव चढविणे**

चण्याच्या झाडाव चढविणे म्हणजे आपले काम करून घेण्यासाठी त्या माणसाची खोटी स्तुती करणे. त्या माणसाबद्दल चांगले चांगले बोलून आपले काम करून घेणे. आणखीन एक वाक्प्रचार अशाच पद्धतीचे पहायला मिळते.

**उदा. बुधवंत.**

बुधवंताला उद्देशून म्हटले जाते जो इतरांचा सल्ला न घेता काम करतो आणि त्याचा परिणाम वाईट होतो. बुधवंत म्हणजे जो स्वतःला हुशार समजतो.

जेव्हा एखाद्या वयस्कर व्यक्ती लहान मुलाप्रमाणे वागतो. लहान मुलाप्रमाणे हट करतो. शुल्लक गोष्टी वरून लहान मुलांनसारखा भांडतो त्याला पाहून खालील वाक्यप्रचार म्हटला जातो.

**उदा. म्हाल म्हातारो धनगोर.**

धनगर समाजात जास्त श्रिमंत लोक असतात त्यांना पाहून काही वाक्यप्रचार म्हटले जातात. असंख्य पैसा आहे त्याला पाहून खालील वाक्प्रचार म्हटला जातो.

**उदा. लाखपती.**

संख्येचा वापर करून काही वाक्यप्रचार पळासकाटा परिसरात म्हटले जातात.

**उदा. छत्तीसाचा आकडा.**

**३.५.२.३ भाषिक अभ्यास**

धनगर समाजातील वाक्प्रप्रचार त्यांच्या बोली किंवा मराठी भाषेत असतात. वाक्प्रचार  एका वाक्यात किंवा एका शब्दाचे असतात. त्या एका शब्दामध्ये मोठा अर्थ दडलेला असतो. वाक्प्रचार सरळ नसतात उपमाचा वापर करून ते अस्तित्वात येतात. वाक्यप्रचार म्हणीच्या स्वरूपाचे असतात.

वाक्यप्रचार हे संख्येचा कलात्मक वापर वाक्यप्रचारातून केला आहे. **उदा. छत्तीसाचा आकडा.** त्याचप्रमाणे माणसांच्या गुणावरून त्यांना पशु पक्ष्याची उपमा दिलेली दिसून येते. **उदा. माश्या मारणे.** तसेच

शरिराच्या अवयाचा वापर करून ही काही वाक्यप्रचार अस्तित्वात आले आहेत.**उदा. कपाळ फुटक, हातपाय हलविणे इ.**

## ४.६ समारोप

धनगर समाज म्हणजे एक भटकी जमात असे म्हटले जाते. एकेकाळी हा समाज डोंगरावर राहत होता. कालंतराने हा समाज एका ठिकाणी स्थिर झाला. गोमंतकात विविध ठिकाणी हा समाज वास्तव्यास आहे. धारबांदोडा तालुक्यात बऱ्याच ठिकाणी हा समाज पहायला मिळतो.

धनगर समाज हा  इतर समाजापेक्षा वेगळा समाज आहे. या समाजाच्या रुढी, परंपरा, चाली- रिती ह्या इतर समाजापेक्षा भिन्न असलेल्या आढळतात. धनगर लोकसाहित्य वैशिष्टयपूर्ण असते. धनगर लोकवाङ्मय मौखिक परंपरेने पुढे आलेले असते. लोकगीते, लोककथा, म्हणी, कोडी, उखाणे इ. लोकवाङ्मय धनगर समाजात अस्तित्वात आहे. धनगर लोकवाङ्गतून त्यांच्या भाव-भावनाचे, व्यवसायाचे, आचार-विचाराचे दर्शन घडते. दैनंदिन जिवनात घडणाऱ्या गोष्टीचा उल्लेख लोकगीतातून केला जातो.

धनगर समाजात लहान वयात लग्न केली जात होती. त्यामुळे लहान वयातच त्यांना आपल्या संवसाराचा डौलारा सांबळावा लागायाचा. त्यावेळी स्त्रियांची होणारी कुंचबना लोकगीतांतून दिसून येते. धनगर स्त्री ही नेहमी कष्टाची कामे करते. पहाटे सकाळी त्यांच्या कामाला सुरुवात होते ती रात्री झोपेपर्यंत  कामे संपत नाही. ही कष्टाची कामे करताना कष्टाची जाणीव होऊ नये म्हणून अनेक लोकगीते म्हटली जातात.

धनगर समाजात लग्नाच्या वेळी अनेक विधी केले जातात. हे विधी करत असताना अनेक लोकगीते म्हटली जातात. लग्नाच्या वेळी धनगर समाजात उखाणे घेण्याची प्रथा आहे. धनगर समाजात स्त्रिया आपल्या नवऱ्याला नावाने हाक मारत नाही. उखाण्याच्या माध्यमातून धनगर स्त्रिया आपल्या नवऱ्याचे नाव घेतात. त्याचप्रमाणे दैनंजिवन जीवन जगताना नकळत कितेक म्हणी उच्चारतात. धनगर समाजात लोकवाङ्मयाचा मोठा साठा आहे.

धनगर समाजाचे लोकवाङ्मय वैशिष्टपूर्ण आहे. धनगर गीतांतून भावभावनांचे चित्रण, कल्पनारम्यता, उपमाचे, सुरेख शब्दकळयाचे दर्शन घडते. लोकवाङ्मयातून सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे विविध पैलु मांडले आहे. धनगर लोकवाङ्मय धनगर समाजाचा आरसा आहे.

## ४.७ निष्कर्ष

१) धनगर समाजाचे लोकवाङ्मय वैशिष्टपूर्ण आहे. धनगर लोकवाङ्मयात वाङ्मयीन मूल्ये दडलेली आहेत. लोकवाङ्मय भाषिक दृष्ट्या वेगळे आहे.

२) धनगर लोकगीतांतून त्यांच्या भावभावनांचे चित्रण, कल्पनारम्यता, शब्दकळेचे सुरेखपणे दर्शन घडते.

३) धनगर गीतांतून त्यांच्या जीवनानुभवाचे प्रतिबिंब पहावयस मिळते.

४) लोकगीतांतून धनगर लोकांच्या व्यवसायाचे दर्शन घडते.

५) धनगर लोकवाङ्मयात वाङ्मयीन मूल्ये आढळतात.

६) धनगर बालगीतांतून सामाजिक विषय हाताळले आहे.

७) धनगर समाजात पुरुषांबरोबर स्त्रिया ही श्रमाची कामे करतात.

८) धनगर श्रम गीतांत अनेक कौटुंबिक विषय आढळतात.

९) धनगर लोकगीतांवर आधुनिक जीवनशैलीचा प्रभाव पडला आहे.

१०) धनगर लोकगीतातून स्त्रिया आपल्या भावना व्यक्त करतात.

११) धनगर लोककथांतून इतिहासाचे दर्शन घडते.

१२) धनगर लोकथांतून नैतिक शिकवण दिली जाते.

## संदर्भ सूची

[i] १. कालभूत पुरुषोत्तम: "लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन". विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, १० जानेवारी २००७, पृ. क्र. १६३

[ii] २ . गवते ज्ञानेश्वर: " धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन". प्रकाशक: के. एस. अतकरे, केलाश पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, मार्च २०११.पृ.क्र.२१३

## श्रेयनामावली

- नागी शेळके , वय-५५, पळसकाटा, गृहिणी.
- गंगी शेळके, वय- ६८, पळसकाटा, गृहिणी
- धाकी शेळके, वय -४४,पळसकाटा, गृहिणी
- पुजा शेळके, वय-२५, पळसकटा, लॅब टेक्निशियन.
- गंगाराम शेळके, वय-४५ , पळासकटा, होम गार्ड
- बाबूराव , वय-४८,पळासकटा, होम गार्ड
- भैरू झोरे, वय-६३, पळासकाटा, रिटार्य सरकारी कर्मचारी
- सुरेखा झोरे, वय-४८, पळसकाटा, गृहिणी
- ठमी झोरे, वय-५०, पळसकाटा, गृहिणी
- गोदी झोरे, वय-५४, पळसकाटा, गृहिणी
- जानू पाटील, वय-३९, पळसकाटा, पोलीस
- नकली पाटील,६४,पळसकाटा, गृहिणी
- बापू पावणे , वय-५५, पळसकाटा, सामान्य नागरिक
- संगीता पावणे, वय-५२, पळसकाटा, गृहिणी

# प्रकरण ५
# पळसकाटा परिसरातील धनगर समाजाच्या प्रयोगसिद्ध लोककला

५.१ प्रास्ताविक ....................................................................................................86
५.२ दसरा खेळ....................................................................................................86
५.२.१ स्वरूप ....................................................................................................86
५.२.२ सादरीकरण....................................................................................................88
५.३ ‘ चपय’ खेळ ....................................................................................................89
५.३.१ स्वरूप ....................................................................................................89
५.३.२ सादरीकरण....................................................................................................90
५.४ ‘ गजा’ खेळ ....................................................................................................90
५.४.१ स्वरूप ....................................................................................................90
५.४.२ सादरीकरण....................................................................................................92
५.५ फुगडी ....................................................................................................92
५.५.१ स्वरूप ....................................................................................................92
५.५.२ प्रकार ....................................................................................................93
५.५.३ सादरीकरण....................................................................................................94
५.६ समारोप ....................................................................................................95
५.७ निष्कर्ष ....................................................................................................95

# प्रकरण ५

# पळसकाटा परिसरातील धनगर समाजाच्या प्रयोगसिद्ध लोककला

## ५.१ प्रास्ताविक

लोकजीवनात निरनिराळ्या विधीच्या निमित्ताने होणारी लोकनृत्ये, खेळ म्हणून खेळली जाणारे नृत्य- खेळ तसेच मनोरंजनासाठी केली जाणारी लोकनाट्य, लोकसंगीत, सण-उत्सव विधी प्रसंगी भिंतीवर रेखाटली जाणारी चित्रे, घरापुढील रांगोळी, नागपंचमी अशा प्रसंगाच्या निमित्ताने होणारी सर्व प्रयोगरुपे म्हणजे प्रयोगात्म किंवा प्रयोगसिद्ध लोककला असून या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात होतो. प्रयोगसिद्ध लोककलामध्ये सादरीकरणाला महत्व असते. इथे संवादाला जास्त महत्तव नसते.[i]

पळसकाटा परिसरातील धनगर समाजात अनेक विधी, सण, उत्सव साजरे करतात. या सणाच्या प्रसंगी प्रयोगरुपे सादर करतात. धनगर लोकांचा दसरा हा सर्वांत मोठा सण आहे. **दसऱ्याच्या** दिवशी मांडावर पुरुष मंडळी ढोल ताशाच्या नादावर **'दसरा'** खेळ खेळतात तर स्त्रिया **फुगडी** सादर करतात. **शिंमग्याला** पुरुष '**चपय'** नृत्य करतात. ' **गजा'** पुरुष **'गजा'** नृत्य खेळातात. **चतुर्थी** दिवशी मोठ्या उत्साहाने **'फुगड्या'** सादर करतात. हा खेळ गीताच्या आधारे खेळला जातो.

## ५.२ दसरा खेळ

धनगर लोकांचा सर्वात मोठा सण म्हणजे दसरा. धनगर लोक हा सण अगदी उत्साहाने साजरा करतात. सण येण्यापूर्वी तयारीला लागतात. दसऱ्याच्या दिवशी पुरुष अगदी ढोल ताशाच्या नादावर दसरा खेळ खेळतात. तर स्त्रिया मांडात मोठया उत्साहाने फुगडी घालतात.

### ५.२.१ स्वरूप

**' दसरा'** हा तीन दिवसाचा सण असतो. दसऱ्याच्या पहिल्या रात्रीला ' **जागोर'** असे म्हणतात. जागराच्या दिवशी तांब्याच्या भांड्यातून नदीवरून पाणी आणतात. या पाण्याला '**निवदाचे पाणी'** असे संबोधले जाते. पूर्वी पाणी झरीतून आणले जात होते. वर्तमानात ही स्थिती बदलली असून निवदाचे पाणी नदीतून आणले जाते. जागराच्या दिवशी म्हणजेच दसऱ्याच्या पहिल्या रात्री पुडातील पतवाचा कुळ देव काडून ( एक पेटी असते त्याला पुड असे

म्हणतात. त्या पुडात घाट, सुपारी, चांदीचे घोडे, पूर्वजाच्या नावाची पाटी किंवा वस्तू इ. असते.) निवदाच्या पाण्याने धुतात. देवाऱ्यापुढे कांबळ ठेवतात. त्या कांबळीवर वस्त्र घालून त्यावर पतवाचे कुळ देव पुजतात.

जागराला **' अनसुड'** धरले जाते. **' अनसुड'** म्हणजे आंघोळ करून गायीचे दूध काडतात. दुध गरम करताना आंघोळ करावी लागते. दुध थंड झाल्यावर त्यात दही घालून त्या दुधाचे दही करतात. दहीची रवी करून ताक तयार करतात. **' ताक'** करून जे **' लोणी'** मिळते त्यांनी देवाला दिवा पेटवतात. ताक **' दुडगा'** भरून देवासाठी काडून ठेवतात. उरलेले ताक लोक पितात. बायका जात्यावर तांदळाचे, नाचण्याचे दळण दळून त्या पिठानी स्त्री अलंकार तयार करतात. त्यानंतर ते अलंकार तेलात सोडून तळून घेतात. त्या अलंकाराना ' **कडाकनी'** असे म्हटले जाते. ती कडाकनीही मांटोळी बांधतात. पुरुष मंडोळी आरती करायला येतात. देवाचे नाव घेऊन तोरणे बांधतात. जागराच्या दिवशी एक विशिष्ट पदार्थ केला जातो. त्या पदार्थाला ' **फराळ'** असे म्हटले जाते. जसा हा पदार्थ विशिष्ट असतो त्याचप्रमाणे बनवण्याची पद्धतही वैशिष्ट्यपूर्ण आहे. सर्वात अगोदर गरम पाण्यात पिठाचा गोळा करून त्यानंतर त्यात दूध आणि गुळ घालून शिजवतात.

जागराच्या दिवशी मांडत ढोल, ताशा वाजवून पाहिल्या दिवसाची सुरुवात होते. पुरुष मंडळी दसरा हा खेळ खेळतात. पूर्वी दसरा दुसरा दिवस उजेडेपर्यंत खेळला जात असे. तर स्त्रिया मोठ्या उत्साहाने फुगड्या घालतात. वर्तमानात ही स्थिती बदललेली दिसून येते. वर्तमानात रात्री एक दोन वाजेपर्यंत खेळतात. खेळताना काही पुरुषांवर भार येतो. माणसांवर त्यांचे पूर्वज वाडतात ( भार). सगळ्या महिला पुरुष भार आलेल्या माणसाभोवती बसतात. काही चूक झालेली असेल तर वाडलेले पूर्वज सांगतात. लोक आपल्याला आजारी आहे तर गुण मागतात. खोबऱ्याच्या वाटीत असलेला भंडार वाडलेला माणसाच्या हातात असतो तो त्या व्यक्तिला भंडार लावतो. त्याला ' **भूरी'** लावले असे म्हटले जाते. भार येतो त्या माणसाला त्या पूर्वाजाचे **झाड** म्हणतात. काही वेळा जो पूर्वज वाडतो तो आपल्या आयुष्यातले सुखःद दुखःद प्रसंग सांगतो व आपण कसा मरण पावलो हे ही सांगतो.

दुसऱ्या दिवशी मुख्य दसरा म्हणतात. या दिवशी देवाची पाटी घरातून बाहेर काडतात. देवाची पाटी एका मोकळ्या मैदानावर काढतात. त्या जागेला ' **मांड'** असे म्हणतात. दरवर्षी त्याच जागेवर ' **पाटी'** काडतात. ' **शेळके'**, ' **पावणे'** आणि ' **खरात'** या कुटुंबांची पाटी या दिवशी काडली जात नाही. **सुझरे, पाटील, मिसाळ,**

**बुरुड** इ. कुटुंबांची पाटी या दिवशी मांडावर काडतात. पुरुष हातात देवाचा भंडारा असलेला थाळ आणि देवाची घाट घेतात तर घरतील मोठी सून किंवा घरातल्या इतर सूनापैकी फक्त एक सून नऊवारी लुगड न्हेसून डोक्यावर पदर घालून पाटला डोक्यावर घेते. त्यालाच **पाटी** असे म्हटले जाते पाटीत मांडावर लागणारे साहित्य असते. उदा. **कांबळ,गुळ, नैवेद, नारळ, अगरबती, धूप, पान, सुपारी, कुंकू, कोयता , हरयाली, ताकाने भरलेला दुडगा इ.** त्याचप्रमाणे घरातला एक व्यक्ती हातात चूलीतले जळते लाकूड आणि तांबच्या भांड्यातून पाणी घेऊन येतो. जळते लाकूड घरात परत येईपर्यंत विजता कामा नये असा समज आहे. मांडाव काही विधी केले जातात. देवाला नैवेद्य दाखवतात. नैवेद्य कुडड्याच्या पानात वाढला जातो. पुरुष मांडाव दसरा खेळतात. त्यानंतर पाटी घरात आणतात. घरात दसऱ्या दिवशी अनेक पदार्थ करतात. ‘ **ताक’** आणि ‘ **दुधातला भात’** हा त्या दसऱ्या दिवशी विशेष बेत असतो. पंगतीला जेवण केळीच्या पानावर वाडतात. रात्री परत दसरा खेळतात.

दसऱ्याच्या तिसऱ्या दिवशी ‘ **कारखाची’** पूजा केली जाते. त्या दिवसाला **‘ शिंलगन’** असेही म्हणतात. या दिवशी घरातल्या वस्तूची पूजा करतात. शिंलगना दिवशी पळसकाटा परिसरातील **शेळके, पावणे** आणि **खरात** या धनगर कुटुंबांची पाटी मांडावर काडतात. या कुटुंबाची पाटी ‘ **शिंलगनी पाटी’** असे म्हणतात. इतर कुटुंबांतील लोक  तिथे त्यांच्या सोबत मांडावर जातात. अगदी उत्साहाने दसरा खेळातात. जेवण झाल्यानंतर महामायाच्या देवळात सून लुटण्यासाठी जातात. शिंलगनाच्या रात्री परत आरती करतात आणि माटोळीची तोरणे उतवतात व देव भड्यारतात (देव परत पुडात ठेवतात). जर कोणत्याही कुटुंबाचे शिंलांगन म्हणजेच गज्जा असेल तर तोरण उतरले जात नाही.

अशा पद्धतीने तीन दिवसाचा दसरा पळसकाटा परिसरात मोठ्या उत्साहाने स्त्री, पुरुष, मुले साजरा करतात. दैनंदिन दिनक्रमांमध्ये तीन दिवस थोडा बदल होतो. दसऱ्याला शिक्षणासाठी, नोकरीसाठी शहरात गेलेले लोक घरी परतात. अगदी उत्साहाने आपल्या कुटुंबासह तीन दिवस घालवतात.

### ५.२.२ सादरीकरण

**‘ दसरा खेळ’** हा एक विशिष्ट पद्धतीने खेळतात त्याचप्रमाणे हा खेळ खेळाताना एक विशिष्ट पोशाख परिधान केला जातो. पुरुष पांढरा रंगाचा सदरा घालतात. त्याला ‘ **झगा’** म्हटले जाते. झगा घातल्यानंतर कंबरेला धोतर बांधतात. डोक्यावर पागोटे, पायात वाक्या, हातात वस्त्र घेऊन दसरा खेळतात. धनगरांच्या प्रत्येक सणाला

पागोटे घालावेच लागते. पागोटे घातल्यशिवाय कोणतेही देवाचे कार्य करता येत नाही. हा खेळ गोलाकारत खेळतात. सर्वात अगोदर उजवा हात आणि पाय पुढे घालतात व डावा हात आणि पाय पाठीमागे घेतात. त्यानंतर उजव्या बाजूने स्वतः भोवती गोल फिरतात व त्यानंतर डाव्या बाजूने फिरतात. दसरा खेळणारा ढोल, ताशा व ताळ यांच्या तालावर नाचतो. नाचताना काही गीते म्हणतात. **उदा. हजो गजो बलीगजो बलीग बलीग ऊय. हात घाला भात खावा**

दसरा खेळ खेळताना त्यात पुरुषांची संख्या पाहिली जात नाही. हा खेळ कितीही जण खेळू शकतात. मनोरंजनाचा भाग म्हणून हा खेळ खेळाला जातो. खेळताना प्रत्येकाचा हात आणि पाय एकसारखे पडायला हवेत नाही तर गोंधळ होतो. या संपूर्ण खेळात हातावर व पायावर भर दिला जातो. हात व पाय ढोल आणि ताशाच्या तालावर पडले नाही तर खेळ चुकतो.

### ५.३ ‘ चपय’ खेळ

**‘चपय’** हा खेळ शिमग्याला धनगर समाजातील पुरुष खेळतात. पळसकाटा परिसरात धनगर पुरुष चपय हा खेळ खेळतात. हा खेळ फक्त पुरुष खेळतात. पुरुषांचा गट हा खेळ प्रत्येक गावात जाऊन खेळतो. हा खेळ पाच- सहा दिवस खेळला जातो.

#### ५.३.१ स्वरूप

**‘ चपय’** हा खेळ धनगर पुरुष शिंमग्याला खेळतात. सर्वांत अगोदर पुरुषांचा एक गट तयार करतात आणि तो गट घेऊन दुसऱ्या गावात खेळायला जातात. या गटाला **‘ मेळ’** असे म्हटले जाते. फक्त **‘ ताळ’ आणि ‘ घुमट’** हे वाद्य घेऊन **‘ चपय’** हा खेळ खेळतात. पूर्वी हा गट चपय खेळण्यासाठी चालत दुसऱ्या गावात जात होता. त्यामुळे खेळताना रात्र व्हायची. रात्री कुठल्या तरी गावात निवास करायचे. सकाळ झाली की दुसऱ्या गावाची वाट धरत होते. माकडग्या येथीला महादेवाच्या देवळात गांवकर नमन घालत तेव्हा हा मेळ घरातून बाहेर पडतो तो पुनवेपर्यंत दिवस घरापासून लांब राहून चपय खेळ खेळतात. वर्तमानात स्थिती बदललेली आहे. वर्तमानात सर्वाकडे वाहने आली. आता जवळचा गाव निवडून दिवसभर खेळातात व रात्री घरी परतात. चपय’चा शेवटचा दिवस स्वतःच्या गावात खेळतात.

**‘ चपय’** खेळल्यानंतर प्रत्येक घरात तळी दिली जाते. तळीत पैसे किंवा नारळ देतात. नारळ सर्वांना वाटून दिले जातात. शिमग्याच्या पहिल्या आणि शेवटच्या दिवशी जे नारळ मिळतात ते ठेवले जातात. शिमग्यात जे पैसे

आणि जे दोन दिवसाचे नारळ मिळतात त्यातून **‘ पोस्त’** हा सण केला जातो. पोस्ता दिवशी देवाला मान म्हणून बकरा आणि कोंबडा मारला जातो. मेळातल्या पुरुषांना प्रथम जेवण वाडले जाते त्यानंतर त्यांच्या कुटुंबाला वाडतात.

**५.३.२ सादरीकरण**

शिमग्याच्या पहिल्या दिवशी गट मिळून **‘ होळदेव’** ला नारळ फोडतात आणि एक नारळ हळद लावून सोबत घेऊन जातात. **‘ होळदेव’** म्हणजे ज्या ठिकाणी होळी भाजतात ते ठिकाण. हळद लावलेल्या नारळाला ‘ **रनाचा नारळ’** म्हणतात. हा नारळ जमिनवर ठेवत नाही किंवा कुठे हरवू नयेत म्हणून काळजी घेतात. पूर्वी रात्री उशिरापर्यंत मेळ बाहेर राहत असे म्हणून रानातील जनावरापासून अपली रक्षा करावी म्हणून हा **रनाचा नारळ** सोबत घेऊन जात असे.

घरोघरी जाऊन चपय खेळ खेळतात. **शभय शभय** म्हणत रस्त्यावरून घरात जातात. घरातल्या तुळशी वृंदावनाला गोल फेर मारून जती म्हणायला सुरुवात करतात. जती म्हणत असताना घुमट आणि ताळ ही दोन वाद्य वाजवतात. धनगर लोक मेळ आल्यानंतर त्यांचे खेळत असताना पाण्याने पाय धुतात, आपल्या पदराने पाय पुसून त्यांना गंध फुल लावतात. मेळ खेळून झाल्यानंतर **‘ तळी’** देतात. ‘ **तळी’** म्हणजे दारात पाटावर ताट ठेवतात त्यात पैसे, तांदुळ आणि नारळ ठेवतात. नराळ, पैसे आणि तोडेसे तांदुळ घेऊन पुढे जातो.

अशाप्रकारे प्रत्येकाच्या घरात खेळून मेळ पुनवेच्या आदल्या दिवशी गावात येतो. त्यानंतर कातर धरली जाते. कातर धरल्यानंतर बाहेर गावी खेळायला जाऊ शकत नाही. मेळ त्यानंतर मांडवर जाऊन खेळतात. मांडात मेळाला काही तरी गोड करून खायला घालतात.

**५.४ ‘ गजा’ खेळ**

**‘ गजा’** हा खेळ आपल्या घरात शुभ शांती लाभावी म्हणून खेळवला जातो. अनेक वर्षांपासून धनगर आपल्या घराच्या सुख शांतीसाठी गजा खेळवतात. पळासकाटा परिसरात ही धनगर लोक गजा खेळवतात.

**५.४.१ स्वरूप**

‘ गजा’ धनगर लोक आपल्या घरात सुख नांदावे म्हणून खेळवतात. देवाला जाप (सांगण) लावून सांगतात घरात सुख-शांती लाभली तर पुढच्या वर्षी गजा खेळवतो. सांगण पूर्ण करण्यासाठी ‘ गजा’ खेळतात.

‘ गजा’ च्या चार- पाच दिवस पूर्वी गजा खेळण्यासाठी इतर गावातील धनगर लोकांना इडा दिला जातो. ‘ इडा’ म्हणजे गजाला येण्यासाठी एक प्रकारचे आमंत्रणच असते. इडा आपल्याला पाहिजे तेवढ्या गावाला देऊ शकतात. सुपारी आणि पानाचा इडा देतात. इडा मिळल्यावरच गजा दिवशी इतर गावाचे लोक आपला गजा खेळण्यासाठी गट घेऊन येतात. या गटाला ‘ पवा’ असे म्हणतात.

**‘ गजा’** दिवशी घर शेणाने सारवतात, अंगणात चूडतांचा माटोळ ( मंडप) घालतात. घरात पतवाचा देव पूजतात. ढोल, ताशा, ताळ बडवतात. इडा दिलेला **‘ पवा’** रस्त्यावरूनच गजा खेळत येतो. पवा आत येण्यापूर्वी गजा ज्यांचा घरी असतो त्या घरातील स्त्री पव्याला ओवाळून आत आणते. त्यानंतर पवा आपल्याला दिलेला इडा देवापुढे ठेवून आपला गजा नृत्य सादर करतो. अशा प्रकारे जितके इडे दिले आहे तितके पवे येऊन आपला नृत्य सादर करतात.

**‘ गजा’** दिवशी सोन लुटण्यासाठी देवाची पाटी मांडाव घेऊन जातात. **‘ आपट्याचे’** पान म्हणजे सोन असे मानतात. मांडव जाताना धोतर चारही बाजूने धरतात. धोतराच्या खालून जोडपे चालते. नवरा आरती आणि घाट हातात घेतो. तर बायको देवाची पाटी डोक्यावर घेते. जाताना देवाचे नाव घेत जाते. **उदा. बिरोबा ताम्याजाचे नाव चोंमबला, टाकळ्यातले बहिरीचे नाव चोंमबला.** मांडाव पावल्यानंतर कांबळ घडी करून घालतात. कांबळीवर तांदळाचा **चौख** घालतात. चौखाचे चारही कोनसे सारखे असावे लागतात. त्या चौखामध्ये **सुपारी-पानाचा इडा, भंडार, पिंजर, गुलार, बुका** ( काजळाप्रमाणे असलेला पिठा) ठेवतात. आरती करतात. त्यानंतर कुडीयाच्या पानावर बारा नैवेद्य भरतात. नैवेद्यात **दुधातला भात, तूप, गुळ, खोबरे** घालतात**.** सांगणे घालण्यासाठी नारळ ठेवतात. जाप लावल्यानंतर नारळ फोडतात. नारळाची शेरणी काडून सगळयांना वाटतात. नैवेद्य वाटला जातो. त्यानंतर घरात परतात.

**गजा** दिवशी चांगला बेत करतात. **ताकाची कडी, दुधातला भात** हे विशेष पदार्थ असतात. **खतखते, भात, डाल, भाजी, पापड, लोणचे** हा बेत असतो. मांडावरुन आल्यानंतर जेवणाची पंगत बसते. सगळयांना केळीच्या पानावर जेवण वाढतात. वर्तमानात काही ठिकाणी पत्रावळीमध्ये जेवण वाढले जाते. जेवण झाल्यानंतर पव्याला मानधन देऊन पाठवले जाते. अशाप्रकारे एक दिवसाचा **गजा** धनगर अगदी आनंदाने साजरा करतात.

**५.४.२ सादरीकरण**

**' गजा'** चा **पवा** रस्त्यावरून खेळत येतात. पव्याला ओवाळून आत घेतात. इडा आणून देवाच्या आरतीत ठेवतात. त्यानंतर गजा खेळायला सुरुवात करतात. दसऱ्या नृत्याला जसा विशिष्ट पोशाख असतो तसाच गजाला ही करतात. अंगात झगा, कंबरेला धोतर, डोक्यात पागोटे, पायात वाक्या, हातात वस्त्र अशा प्रकारचा पोशाख परिधान करतात. हातात वस्त्र घेऊन खेळायला लागतात. खेळताना काही गीते म्हणतात. **उदा. हजो गजो बलीगजो बलीग बलीग ऊय.**

**' गजा'** ला वेगवेगळ्या गावातले धनगर ज्यांना इडा ( विडा) दिला ते येऊन आपले सादरीकरण करतात. ' गजा' खेळण्याची प्रत्येक पव्याची पद्धत वेगळी असते. सादरीकरणातून प्रत्येक पवा आपले वेगळेपण दाखवतो ' गजा' खेळताना उजवा हात आणि पाय पुढे करतात. त्यानंतर डावा हात आणि पाय पुढे करतात. त्यानंतर उजव्या बाजूने स्वतः भोवती एक फेरा मारतात नंतर डाव्या बाजूने एक फेरा मारतात. अशा प्रकारे आपला खेळ सादर करून एक प्रकारे मनोरंजन ही करतात.

**५.५ फुगडी**

फुगडी धार्मिक किंवा समाजिक प्रसंगी घालतात. फुगडी हा पारंपरिक खेळ आहे. फुगडी हा खेळ फक्त स्त्रियां सादर करतात. फुगडीतून एक प्रकारे व्यायम ही होतो. फुगडी घालताना कोणत्याही वाद्याची गरज नसते. फुगडी गीताच्या आधारे घातली जाते.

' पळसकाटा' परिसरात धनगर स्त्रिया दसरा, गणेश चतुर्थी, गजा इ. प्रसंगी फुगडी घालतात. वर्तमानात स्त्रिया बरोबर पुरुष ही मनोरंजनासाठी फुगडी घालतात.

**५.५.१ स्वरूप**

धनगर स्त्रियां फुगडी दसऱ्याच्या मांडावर, गणेश चतुर्थीला किंवा गजा प्रसंगी घालतात. धनगर स्त्रिया फुगडी गीतातून आपल्या भावभावना व्यक्त करतात. फुगडी गीतात दैनंदिन जीवनातील काही विषय येतात. फुगडी गीतातून कौटुंबिक आणि सामाजिक जीवन प्रतिबिंबीत होते.

धनगर स्त्री कष्टकरी असते. दैनंदिन जीवनात अनेक कष्टाची कामे करते. कामाचा व्याप जास्त असल्यामुळे तिला विसावा घेण्यासाठी वेळ मिळत नाही. सण उत्सव प्रसंगी फुगडी घालताना ती फुगडी गीतातून भावना व्यक्त करते. त्यावेळी स्त्रियांच्या मनाला पाझर फुटतो. मनातील दुख, सुख, आनंद, विरह इ.भावना फुगडी गीतातून व्यक्त होतात.

**५.५.२ प्रकार**

धनगर समाजात स्त्रियांची नृत्य वेगळी आणि पुरुषांची नृत्य वेगळे असतात. धनगर समाजात स्त्री आणि पुरुष एकत्र येऊन नृत्य केलेला आढणार नाही. धनगर समाजात फुगडी हा नृत्य स्त्रिया अनेक वर्षापासून सण, उत्सवाप्रसंगी सादर करतात. पूर्वी धनगर फुगडीमध्ये अनेक प्रकार आढळत होते पण वर्तमानत काळाच्या ओघात फक्त थोडेचे राहिले आहे. वर्तमानात फुगडी फक्त पाच प्रकार पहायला मिळतात. ते पुढीलप्रमाणे-

१. उभी फुगडी
२. वाकून फुगडी
३. बसून फुगडी
४. दोन रांगेतील फुगी
५. झेमाडो

**१. उभी फुगडी :-** उभी फुगडी या नावावरूनच कळते की ही फुगडी उभ्याने घातली जाते. स्त्रिया ही फुगडी गोलकारात घालतात. या फुगडीत उजवा पाय पहिल्यादा पुढे घातला जातो आणि हाताच्या टाळया गोलकारात मारल्या जातात. या फुगडीत फक्त दोन टाळया वाजवतात.

**२. वाकून फुगडी :-** ही फुगडी वाकून घालतात. फुगडी चार टाळयाचा वापर करून घातली जाते. या फुगडीत एक उपप्रकार आहे त्याला **' भिंगरी'** म्हणतात. ही फुगडी गतीने घातली जाते.

**३. बसून फुगडी :-** बसून फुगडी नावाप्रमाणेच बसून घातली जाते. या फुगडीत दोन प्रकार आहेत. एक प्रकार ' सालोका- दाडोंका. या फुगडीत घुडग्याला हाथ लावून बसून नंतर उभे राहून टाळी वाजवली जाते. ही फुगडी जलद गतीने घालतात. या फुगडीतून बायकामध्ये स्पर्धा लावली जाते कोण किती जलद घालतो ते पाहिले जाते.

दूसरा प्रकार ‘ फुकाची फुगडी’ ही फुगडी बसून घालतात आणि तोंडातून फू… फू… फू असा आवाज काडतात. या फुगडीत ही स्पर्धा लावतात एक एक दमून बसते जी शेवटपर्यंत फुगडी घालते ती जिंकते.[ii]

**४. दोन रांगेतील फुगडी :-** ही फुगडी स्त्रिया दोन रांगा करून घालतात. एक रांग पहिल्यादा उभी राहून फुगडी घालते तर दुसरी रांग वाकून फुगडी घालते. एक रांग उभी असते ती वाकून फुगडी त्यांना प्रश्न विचारते मग ती वाकलेली रांग उभी राहून उत्तर देते आणि उभी होती ती रांग वाकते अशा पद्धतीने ही फुगडी घातली जाते.

उदा. **तुला काय पाहिजे रे शेवत्या मोगऱ्या ? (पहिली रांग)**

**मला पैंजण पाहिजे रे जाई जुई.**

५. **झेमाडो :-** हा फुगडी प्रकार प्रत्येक ठिकाणी पाहिला मिळतो. झेमाडो प्रकार जलद घालतात. हा प्रकार फुगडीच्या शेवटचा असतो.**‘ झेमाडा’** हा उभ्याने घालतात.

वर्तमानात काळाच्या ओघात काही प्रकार नष्ट झाले असले तरी जेवढे राहिले आहे ते धनगर स्त्रिया प्रत्येक सणाला उत्साहाने सादर करतात. वर्तमानात तर स्त्रियांच्या जोडीला पुरुष ही फुगडी घालताना पळासकाटा परिसरात दिसतात.

**५.५.३ सादरीकरण**

‘ फुगडी’ हा नृत्य फक्त स्त्रिया सादर करतात. धनगर समाजात सण, उत्सवाप्रसंगी मनोरंजनासाठी स्त्रिया फुगडी सादर करतात. फुगडी घालताना स्त्रिया विशिष्ट पद्धतीचा पोशाख घालतात. नऊवारी गुडघ्यापर्यंत चिरकूट ( कापड) नेसतात, हातात हातभर बांगड्या, आडव कूंकु, केसात आंबडा घालून फुल माळातात अशा पद्धतीचा पोशाख परिधान करतात.

काळाच्या ओघात फुगडीतील काही प्रकार नष्ट झाले तरी उभी फुगडी, वाकून फुगडी, बसून फुगडी, दोन रांगेतील फुगडी, झेमाडो हे प्रकार अजून अस्तित्वात आहेत. गणेश चतुर्थी, दसरा, गजा या प्रसंगी धनगर स्त्रियां फुगडी सादर करतात.

फुगडी ही गोलकारात, बसून किंवा दोन रांगेमध्ये घातली जाते. उभी फुगडी घालताना स्त्रियां गोलकारा करतात. उभ्या राहून उजवा हात व उजवा पाय गोलकारात घालतात आणि गीत म्हणतात. **उदा. बत्तीस पानाचा विंडा ठेविला श्रावण बाळ चालू लागल.** अशा प्रकारचे गीत म्हटले जाते. बसून फुगडी ही स्पर्धाच्या स्वरूपाची असते. यामध्ये फुकाची फुगडी व साळूकी-दांडूकी या फुगड्या येतात. फुकाची फुगडी घालताना फू.... फू.... फू असा आवज काडला जातो. साळूकी- दाडूकी या फुगडी बसून डोपराला हात लावून उभे राहून वर टाळी वाजवून परत बसतात. वाकून फुगडीला चार टाळ्या वाजवतात. दोन रांगेतील फुगडीला दोन रांगा करून फुगडी घालतात.

**५.६ समारोप**

' पळसकाटा' परिसरात धनगर लोक अनेक सण, उत्सव साजरे करतात. या सण, उत्सवाप्रसंगी अनेक नृत्य, खेळ सादर करतात. हे खेळ, नृत्य परंपरेने चालत आलेले आहे. वर्तमानात पळसकाटा परिसरात हे खेळ, नृत्य पहायला मिळतात. ' पळसकाटा' परिसरात दसऱ्याला दसरा खेळ, शिंमग्याला चपय, गजा दिवशी गजा नृत्य तर गणेश चतुर्थी, दसऱ्याला स्त्रियां फुगडी सादर करतात.

धनगर लोक पारंपरिक खेळ खेळताना पारंपारिक वेश करतात. धनगर समाजात पागोट्याला महत्त्व असते. डोक्यावर पागोटे घातल्याशिवाय कोणतेही देवाचेकार्य करता येत नाही. तसेच बायकाना चिरकुट नेसल्याशिवाय देवाचेकार्य करता येत नाही.

एकंदरीत धनगर लोकांच्या संस्कृतीतील वेगळेण त्यांच्या प्रयोगसिद्ध लोककलेतून दिसून येते. धनगर लोकांचे सण, उत्सावाचे स्वरूप लक्षात येते. धनगर समाज इतर समाजाहून कसा वेगळा आहे हे एक प्रकारे त्यांच्या प्रयोगसिद्ध लोककलातून लक्षात येते

**५.७ निष्कर्ष**

**१.' पळसकाटा'** परिसरात परंपरेने चालत आलेले सण उत्सव वर्तमानातही साजरे करतात.

**२.** बदलत्या काळात काही सण, उत्सव, खेळाचे स्वरूप बदलले आहे. **उदा. ' चपय'** हा खेळ पूर्वी वस्तीने दुसऱ्या गावात राहून खेळत होते वर्तमानात दुपारी जातात व रात्री घरी परतात.

**३.** धनगर लोकांच्या सण, उत्सावातून त्यांचे वेगळेपण लक्षात येते. खेळाण्याची पद्धत, वेशभूषा, खान-पान इ. इतरापेक्षा भिन्न आहे.

**४.** धनगर लोक कला सादर करताना विशिष्ट पद्धतीचा पोशाख परिधान करतात.

**५.** धनगर समाजात ‘ **पागोट्याला**’ महत्त्वाचे स्थान असते. प्रत्येक सण उत्सावेळी ‘ **पागोटे**’ घालावेच लागते. पागोटे घातल्याशिवाय कोणतेही देवाचे काम करता येत नाही.

**६.** धनगर समाजात पागोटे विशिष्ट पद्धतीने बांधतात.

**७.** धनगर स्त्री नऊवारी कापडाशिवाय देवाचे काम करू शकत नाही.

**संदर्भ सूची**

---

[i] 1. कालभूत पुरुषोत्तम : “ लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन”. विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, १० जानेवारी २००७. पृ.क्र

[ii] 2. च्यारी शुभदा : “ धनगर स्त्री”. प्रकाशक: विवेकानंद साहित्य संस्कृती अभिवृद्धी मंच केरी, सत्तरी -गोवा,२८ जुलै २०१४. पृ.क्र २४.

**श्रेय नामावली**

१. केदो शेळके, वय-६५, पत्ता- पळसकाटा, शेळके कुटुंबातिल मुख्य पुरुष.
२. संगीता पावणे, वय-५२, पत्ता- पळसकाटा, गृहिणी.
३. गंगी शेळके, वय- ६८, पत्ता- पळासकाटा, शेळके कुटुंबातील मुख्य स्त्री.
४. नकली पाटील, वय- ६४, पत्ता- पळासकाटा, गृहिणी.
५. बाप्या पावणे, वय- ५५, पत्ता- पळसकाटा, सामान्य नागरिक
६. धाकी शेळके, वय- ४५, पत्ता- पळसकाटा, गृहिणी.

# प्रकरण ६

# पळासकाटा परिसरातील धनगर समाजाची भौतिक संस्कृती

५.१ प्रस्तावना ....98
५.२ पारंपरिक व्यवसाय ....98
५.३ वन औषधाचे ज्ञान ....99
५.४ अन्न ....101
५.५ निवारा ....102
५.६ पोशाख ....102
५.६.१ पोशाखाचे विविध प्रकार ....102
५.७ समारोप ....103
५.८ निष्कर्ष ....104
संदर्भ सूची ....105
श्रेय नामावली ....105

# प्रकरण ६

# पळासकाटा परिसरातील धनगर समाजाची भौतिक संस्कृती

## ६.१ प्रस्तावना

लोकसाहित्यामध्ये भौतिक संस्कृतीचा समावेश होतो. यामध्ये सुतार,लोहार, कुंभार, सुवर्णकार यांचे कौशल्यपूर्ण काम, कलाकुसर इ. च्या आंतर्भावाबरोबरच वस्त्र विणणे, भांडी तयार करणे, घरे बांधणे, घर सजविणे, पोषाख व त्याचे विविध प्रकार, पाककला, जगण्याची कला, शेती कसण्याची पद्धती या सर्व गोष्टींचा समावेश होतो. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे परंपरेने जी कौशल्य आली आहेत त्यांचा भौतिक संस्कृतीमधे समावेश होतो. यामध्ये पारंपारिक व्यवसाय, व्यावसायातील कौशल्य, आदिवासींच्या विविध कला, तोडगे, वास्तुशास्त्र, यंत्रतंत्र याही गोष्टींचा अंतर्भाव लोक साहित्यात होतो.

**'धनगर'** जमात ही डोंगराळ भागात राहणारी जमात आहे. त्यामुळे आधुनिक सुविधांपासून हा समाज दूर आहे. या जमातीचा निसर्गाशी जवळचा संबंध आहे. त्यांना निर्सगातील औषधांचे ज्ञान बऱ्यापैकी आहे. निसर्गापासून अन्न, निवारा इ. गोष्टी त्यांना मिळतात. त्यांचे जीवन निर्सगावर अवलंबून असते. स्वतःच्या कला, कौशल्याचा वापर करून हे लोक जीवन जगत होते.

' पळसकाटा' परिसरतील धनगर लोकांना अनेक गोष्टीचे ज्ञान आहे. त्यांच्याकडे स्वतः ची अशी काही कौशल्य आहेत जी परंपरेने चालत आलेली आहे. या कला, कौशल्याचा वापर करून ते जीवन जगत होते. वर्तमानात ही स्थिती बदलली दिसून येते. पूर्वी जशी करडाची ( सूखे रानटी गवत) घरे बांधत होते ती वर्तमानात दिसत नाही. शेती कसण्याची पद्धत होती ती आता शेती ओसाड पडल्यामुळे गवत मिळत नाही. उलट जीवनपद्धतही बदललेली आहे. पूर्वीप्रमाणे एका विशिष्ट प्रकारे तुवाला ( रुमाल) बांधून फिरणारे लोक आता किंचित दिसतात.

## ६.२ पारंपरिक व्यवसाय

धनगर लोक पूर्वी डोंगराळ भागात राहून आपला उदरनिर्वाह करत होते. डोंगराळ भागात राहिल्याने शिक्षण, आधुनिक सुविधा त्यांना उपलब्ध नव्हत्या. रानात राहून आपला व्यवसाय करून हे लोक पोट भरत होते.

'पळसकाटा' परिसरातील धनगरांचा पारंपारिक व्यवसाय म्हणजे बकरी, गोपपालन आणि शेती होय. नाचना ( नाचणे), पाकड, वरी, कांग या जातीचे शेत धनगर लोक करत होते.

' पळसकाटा' परिसरात धनगर लोक मिरगात ( उन्हाळ्यामध) तसेच पावसात शेती करतात. मिरागात भात **'कुरीने'** पेरतात. ते मे महिन्यामध्ये पेरायला सुरुवात करतात. तरवा पेरतात त्यानंतर तो पावसाळ्यात उपटून भात रोपतात. घराच्या बैलाचे जोत करून जमीन खणायचे. घरात्याल्या बागेत करवंदे, चवळी उगवायचे. मिरची, वांगीचे रोपे लावायचे.

वर्तमानात शेती हा व्यवसाय पूर्णपणे बंद पडला आहे. गोपपालन पारंपरिक व्यवसाय वर्तमानात दिसून येतो. पळसकाटा परिसरातील काही धनगर सोडले तर प्रत्येकाच्या घरी दावणीला गुर आहेत. वर्तमानात गावटी गुरांबरोबर विलायती गायी धनगर लोक पाळत आहेत.

**६.३ वन औषधाचे ज्ञान**

धनगर म्हणजे निर्सगाच्या सानिध्यात राहाणारे लोक. आधुनिक सुविधांपासून वंचित असलेले. रानात राहत असल्याने त्यांना निसर्गातील गुणधर्म असलेली झाडे, वेली, फळे, फुले यांची ओळख असते. धनगर लोक जीवाला बरे नसले तर स्वतःच औषध करत असत.

१) **ताप**:- ताप आल्यानंतर **' आपताची शाल'** वाटून डोक्याला लावतात. आपताच्या शालीचे पाणी प्यायला देतात. कांदे अंगला चोळतात.

२) **जखम** :- **' रानमोडीचा पाला' (** रानात सापडणे छोटे रोपटे) रगड्यावर वाटून जखमेवर घालून जखम घट बांधायची असते.

३) **जास्त जखम**:- **' चांदाड्याचा चिक'** जखमेवर घालायचा. चांदाड्याच्या चिकामुळे जखम भाजून येते.

४) **हाड मोडल्यानंतर**:- **'वळबाची शाल'** वरट्यावर शाल वाटायची. त्यानंतर शाल शिजवायची. शिजली म्हणजे त्यात काजू फेनी घालायची. पहिल्यादा हाड मोडले तिथ गावठी अंड लावयचे त्यानंतर शाल लावून बांधायचे.

५) **रोस भल्यानंतर**:- रोस भरलेल्या माणसाला झोपवतात. त्यानंतर तांब्यातून पाणी घालून पोटावरून ओवाळून तव्यामधे उताना ठेवायचा. त्यानंतर मिरची, मिठ, डाव्या पायाचे चप्पल इ. ओवाळून तांब्यावर ठेवतात.

६) **दोळ्यात काही पडले तर**:- किंजळाची फोक ( काठी) काडून ती फुकून आलेले पाणी डोळयात घालायचे

७) **कान दुखत असल्यास**:- ' वळसरीची पात' चूलीत घालून जाळायची त्यानंतर पिळून पाणी काडून ते कानात घालायचे.

८) **थंडी** :- गंजनाचे पाणी करून प्यायचे. अडोळशाच्या पाने आणि तुळशीच्या केसऱ्या गरम पाण्यात घालून आंघोळ करायची.

९) **कामीन**:- खुरपे चुलीत घालून गरम करायचे. खूरपे लाल झाल्यानंतर पायाचा पाठीकडचा भाग खुरप्यावर ठेवायचा आणि नंतर शेणात बुडवायचा. याला कामीन भाजणे असे म्हणतात. त्यानंतर कापसाची वात करून हळदीच्या पाण्यात बुडवायची आणि कामीन भाजलेल्या जागेवर बांधायची.

१०) **सुजन:-** सोलं ( आंबटान) गरम पाण्यात घालून सुजलेल्या जागेवर शेक द्यायचा.

११) **पोट दुखी:-** कडुलिंबाची, आतनीची पान घालून पाणी गरम करून प्यायचे.

१२) **हिडी सुजने**:- पपयीच्या पानाने हिडी घासायची.

१३)**दाड दुखणे**:- लवंग दाडते घालायचे.

**६.४ अन्न**

धनगरांचा मुख्य व्यवसाय बकरी, गोपपालन आणि शेती आहे. धनगरांचा आहार त्यांच्या व्यवसायातून मिळतो. शेती करत असल्यामुळे त्यांना तांदुळ मिळत होते. त्यापासून ते पेज बनवायचे. नाचाण्यापासून भाकरी मिळायची तर बकरी व गुरापासून दुध मिळायचे.

धनगरांचा मुख्य आहार म्हणजे **पेज, नाचण्याची भाकरी, दही – दुध, ताक, तूप, कडी, आंबील** हेच होय. धनगर लोक नाचना ( नाचणे), पाकड, वरी, कांग यांची शेती करायचे. धनगर स्त्रिया नाचना वाळवून जात्यावर दळीत असायच्या. दळून पीठाच्या भाकरी करायच्या.

**भाकरी** :- धनगर स्त्रिया कणस कापून ती सुकवतात. त्यानंतर ती बडवून नाचणे वेगळे काडतात. नाचणे सुकवतात. ते नाचणे जात्यावर दळून त्या नाचण्याच्या पीठाची भाकरी करतात.

**आंबील**: नाचणेचे पीठ मोग्यात (मातीचे भांडे) घालायचे. पाणी घालून बांधून दोन दिवस ठेवयाचे. पाणी चुलीव ठेवून त्यात ते मोग्यातले पीठ ओतायचे. थोडा वेळ चुलीवर शिजवून उतरवतात.

**कडी** :- ताक चुलीवर ठेवायचे. त्यामध्ये हिरवी मिरची हळद घालायची. पळीत तेल, सासवे, लसूण, करीपता घालून कोळशावर ठेवायचे आणि कडीला फोडणी द्यायची.

**ताक**:- दुध तापवायचे उतरून थंड करायचे. थंड झाल्यानंतर दुध मोग्यात ओतायचे त्या थोडेसे दही घालून हालवायचे. त्यानंतर मोगा बांधून ठेवायचा. त्या दहीचे रवी करून ताक तयार करतात.

**ताकाची आंबील:-** ताक चुलीवर ठेवतात. त्या ताकात तांदळाचे पीठ घालून हलवतात.

**फरावळ**:- दुध चुलीवर ठेवतात. त्या दुधात तांदळाचे पीठ घालून शिजवतात. थोड्या वेळाने त्यात तांदळाच्या पिठाचे गुळे करू घालतान.

**भाजी**:-‘ पकासकाटा’ परिसरातील लोक स्वतः आपल्या बागेत तयार करून भाजी खात होते. वालीची, भेंडीची, दोडके, भोपळयाची, वांग्याची, वालीच्या पानाची, तांबडी, घेवडा, मुसकाच्या शेंगाची व पानाची, आळू, पपयी इ. ची भाजी धनगर लोक खाऊन तंदुरुस्त रहायचे.

**६.५ निवारा**

धनगरांची घरे म्हणजे करडाच्या ( रानटी सुखे गवत) छोट्या छोट्या झोपड्या. चिव्याच्या कण्यानी बांधणे धरतात. त्यावर करड घालून शिवतात. घराच्या वरती ' चांद' बांधतात. चांद म्हणजे देवाचा नारळ बांधतात. त्यानंतर घर शिवण्यास मदत केलेल्या लोकांना जेवण घालतात.

गुरांना कांब्याचा व करडाचा गोठा तर बकऱ्याना उसकीच्या ऐलीचे साठ असायचे. बकऱ्याचे साठ वर बांधतात. खाली बकऱ्याच्या लेंड्या पडतात. बकऱ्याचे **' साठ'** वरती बांधतात कारण बकऱ्याची **' गेळं'** पाणी लागल्यानंतर कुजतात. **' गेळं'** म्हणजे बकऱ्याच्या पायातील मधला भाग आहे.

**६.६ पोशाख**

धनगर लोकांची वेशभूषा इतरांपासून भिन्न असते. धनगर लोकांचा पोशाख वैशिष्टयपूर्ण असतो. त्यांची वेशभूषा त्यांचा अस्मितेचा महत्त्वपूर्ण भाग असतो. त्यांच्या वेशभूषेवरून त्यांना ओळखले जाते.

धनगर पुरुषांचा पोशाख डोक्यावर पागोटे, कंबरेला तुवाला (रुमाल), हातात कड, कानात बाळी, खांद्यावर घोमडे ( कांबळ), हातात काठी तर स्त्रियांचा गुडघ्यापर्यंत चिरकूट, आडव कुंकू, केसाचा आंबाडा, हातभर बांगड्या, नाकात मोती ( नथ), हाताच्या बाजूमध्ये तोळबन, वरच्या कानात भिकबाळी, गळयात माळा असा असायचा.

**६.६.१ पोशाखाचे विविध प्रकार**

धनगर समाजात दसरा, गजा, चपय इ. सण उत्साहाने साजरे करतात. या सण, उत्सावाच्या प्रसंगी खेळ, नृत्य सादर केले जातात. खेळ, नृत्य करताना वेगळया पद्धतीचा पोशाख परिधान करतात.

**दैनंदिन जीवनातील पोशाख:-** दैनंदिन जीवनात धनगर पुरुष कंबरेला तुवाला, खांद्यावर घोमडे ( कांबळ), डोक्यावर पांगोटे, हातात काठी अशा वेषात फिरतो. तर स्त्रिया गुडघ्यापर्यंत चिरकुट, आडव कुंकू, हातभर बांगड्या, कानात भिकबाळी, गळयात माळा अशा वेषात असतात.

**गजा नृत्य:-** अंगात झगा, कंबरेला धोतर, डोक्यात पागोटे, पायात वाक्या, हातात वस्त्र अशा प्रकारचा पोशाख परिधान करतात. हातात वस्त्र घेऊन खेळायला लागतात.

**चपय खेळ:-** चपय खेळताना दैनंदिन जीवनात जे कपडे परिधान करतात तेच चपय खेळताना परिधान करतात.

पळसकाटा धनगर समाजावर आधुनिक जीवन प्रणालींचा प्रभाव पडला. वर्तमानात धनगर लोकांच्या वेशभूषेत बदल झाला आहे. दैनंदिन जीवनात लोक तुवाला, कांबळ, डोक्यावरील पागोट्या ऐवेजी पेन्ट - शर्ट घालून वावरतो. पारंपरिक खेळ खेळताना किंचित लोक पायात वाक्या, अंगात झगा घालून खेळतात. त्याचप्रमाणे धनगर स्त्रियांच्या वेशभूषेत बदल झालेला दिसतो. धनगर समाज काळाबरोबर बदलत गेलेला दिसून येतो.

**६.७ समारोप**

धनगर लोक निसर्गाच्या सान्निध्यात राहून आपले जीवन जगणारे आहे. धनगर लोकांचे राहणीमान अगदी साधे असते. झोपड्यात राहून धनगर लोक अगदी आनंदात जगत होते. धनगरांचा पारंपरिक व्यवसाय गुरे- म्हशी, बकरी पालन व शेती आहे. धनगर लोकांचे खरी संपत्ती त्यांची जनावरे आहेत.

धनगरांचा मुख्य आहार पेज, नाचण्याची भाकरी, दही – दुध, ताक, तूप, कडी, आंबील इ. आहे. धनगर लोक आपल्या व्यवसायातून आपला आहार बनवतात. धनगर स्वतःच्या बागेत रुजवून ताज्या भाजा खातात. दुध, दही इ. पासून अनेक पदार्थ करतात.

धनगर लोकांचा निसर्गाशी जवळचा संबंध असल्यामुळे अनेक वन औषधीचे ज्ञान त्यांना आहे. छोट्या- छोट्या दुखण्यासाठी धनगर लोक दवाखान्यामध्ये जात नव्हते.धनगर स्वतःचे औषधपणी स्वतःच करत होते. रानात राहत असल्यामुळे कोणती फुल, कोणती वेल औषधी गुणधर्माने संपन्न आहे यांचे बऱ्यापैकी ज्ञान धनगर लोकांना आहे.

धनरांच्या आधुनिक जीवनात बद्दल झाला आहे. त्यांच्या पूर्वीच्या जीवनात व वर्तमानात बराच फरक आहे. वर्तमानात जीवन जगण्याची पद्धत, रीती- रिवाज सगळे बदललेले आहेत. असे असले तरीही वर्तमानात मोठ्या प्रमाणात 'पळसकाटा' परिसरात वन औषधाचा वापर करतात.

**६.८ निष्कर्ष**

१.धनगर समाजाची जीवन जगण्याची पद्धत इतरांपासून भिन्न आहे.

२. धनगर समाजाचे जीवन कष्टकरी, प्रामाणिक शेतकरी, साधेपणा, बकरीपालन, गोपपालन इ. गुण वैशिष्ट्याने संपन्न आहे.

३.धनगर लोकांचे रहाणीमान अगदी साधे असून धनगरांची गुरे, वासारु, बकऱ्या हेच त्यांचे खरे धन आहे.

४.धनगर लोकांचा पोशाख वैशिष्ट्यपूर्ण आहे.

५. समाजाचा निर्सगाशी जवळचा संबंध आहे. यामुळे धनगर लोकांना वनौऔषधीचे ज्ञान आहे.

६.धनगर लोकांचा मुख्य आहार पेज, नाचण्याची भाकरी, आंबील, दही-दुध, ताक, तूप इ. आहे.

७. धनगर लोक स्वतःच्या कला, कौशल्याचा वापर करून जीवन जगत होते.

८.वर्तमानात धनगर लोकांच्या वेशभूषेत बदल झाला आहे. दैनंदिन जीवनात लोक तुवाला, पागोट्या, कांबळे ऐवजी पेन्ट शर्ट परिधान करतात.

९.पळसकाटा परिसरातील धनगर समाज काळाबरोबर बदलत गेला आहे. धनगर समाजात परिवर्तन झाले आहे. करडाच्या ( गवत) झोपड्याऐवजी वर्तमानात कॉक्रीटची घरे दिसतात.

**संदर्भ सूची**

१) च्यारी शुभदा : “ धनगर स्त्री”. प्रकाशक: विवेकानंद साहित्य संस्कृती अभिवृद्धी मंच केरी, सत्तरी -गोवा,२८ जुलै २०१४.

**श्रेय नामावली**

१) संगीता पावणे,४७, पळसकाटा, गावची नागरिक

२) केदो शेळके,६५, पळसकाटा, शेळके परिवारातील मुख्य पुरुष सदस्य

३) गंगी शेळके,६८, पळसकाटा, शेळकेपरिवारातील मुख्य स्त्री सदस्य

४) भैरू झोरे,६२, पळसकाटा, गावचा सामान्य नागारिक

५) नकली पाटील,६३, पळसकाटा, गावची सामान्य नागरिक

६) बापू पावणे, ५५, पळसकाटा, गावचा नागरिक

७) गोदी झोरे,५८, पळसकाटा, गावाची नागरिक

# प्रकरण ७

## धनगर समाजात प्रचलित असलेल्या लोकसमजुती, लोकपरंपरा.

७.२ धनगराच्या विधी व लोकसमजुती ........ 107

७.२.१ धनगर विधी ........ 107

७.२.२ लोकसमजुती ........ 112

७.२.३ धनगर लोकांतील अंधश्रद्धा ........ 115

७.३ समारोप ........ 115

७.४ निष्कर्ष ........ 116

संदर्भ सूची ........ 116

# प्रकरण ७

# धनगर समाजात प्रचलित असलेल्या लोकसमजुती, लोकपरंपरा.

## ७.१ प्रास्ताविक

लोकरुढी, विधी, लोकसमजुती, लोकश्रद्धा, लोकभ्रम इ. लोकसाहित्याचा एक भाग आहे. पारंपरिक जीवन जगणाऱ्या लोकांच्या लोकमनात असलेल्या कल्पना, भाव - भावना श्रद्धा यांचा आविष्कार कृतिद्वारा केला जातो. समूहाने केलेल्या कृतीचा यात समावेश होतो. परंपरेने ज्या रूढी, विधी चालत आलेल्या आहे यांचा समावेश यामध्ये होतो. 'रुढी' आणि ' विधी' यांच्या मुळाशी काही लोकविश्वास, लोकभ्रम किंवा लोकसमजुती असतात. या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात केलेला आहे. जन्म, लग्न,बारसे, मार्तिक इ. विधी त्याचबरोबर दृष्ट काढणे, बाहेर बाधा होऊ नये म्हणून केल्या जाणाऱ्या, करणी या सर्वांच्या मागे कुठली तरी समजूत असते.

सण- उत्सव, जत्रा-यात्रा या प्रमाणेच गावात साजरे केले जाणारे सामुदायिक उत्सव, विधी, ग्रामदेवतांची कृपा असावी म्हणून केलेला विधी, त्यांच्याविषयी असलेल्या लोकमनातील श्रद्धा, भय यातून केले जाणारे नवस, व्रत-वैकल्ये अशा असंख्य बाबी लोकजीवनात परंपरेने प्रचलित असतात. या सर्व बाबींचा समावेश लोकसाहित्याच्या या विभागात होतो.

'पळसकाटा' परिसरात धनगर समाज अनेक वर्षापासून वास्तव करून आहे. धनगर लोकात अनेक लोकसमजुती प्रचलित आहे. त्याचप्रमाणे श्रध्देचा भाग व परंपरेने चालत आलेली विधी आहे. वर्तमानात या विधीचे स्वरूप काही प्रमाणात बदललेली दिसून येत

## ७.२ धनगराच्या विधी व लोकसमजुती

### ७.२.१ धनगर विधी

धनगर समाजामध्ये अनेक प्रकारच्या सांस्कृतीक, सामाजिक, धार्मिक विश्वास आणि धारणा पहावयास मिळतात. धनगर समाजात जन्माच्या वेळी, लग्नाच्या वेळी, मार्तिकाच्या वेळी अनेक विधी केले जातात.

**७.२.१.१ जन्म**

**'पळासकाटा'** परिसरात मुलांचा जन्म घरात होत होता. धनगर स्त्रियांचे बाळतपण गावातील बाई करायची. त्या बाईला ' वैजीण' म्हणतात. बाळाचा जन्म झाल्यानंतर आंघोळ करतात त्यानंतर त्याला तेल लावून मळतात. जन्माच्या पाच दिवसानंतर पाचवी केली जाते. पाचवीला नाव ठेवले जाते. धनगर समाजात बारसा हा विधी केला जात नव्हता. पाचवीला जास्त महत्त्व असते.

मुलं जन्मानानंतर घरात अकरा दिवसाचे सुयेर असते. अकारा दिवसाने घरातले सगळे कपडे धुतात आणि घरात शेणाचा शितोडा घालतात. ' बाळतिणेला' मुलगी झाली तर तीन महिने तर मुलगा झाल्यानंतर सहा महिने सुयेर असतो. त्यावेळी देवाचे काम करायला मिळत नाही.

**७.२.१.२ पाचवी**

धनगर समाजात ' पाचवी'ला महत्त्व असते. वर्तमानात धनगर समाजात बारसा करतात. पूर्वी ' पाचवी' दिवशी मुलांच नाव ठेवत होते. मुल जन्मात आल्यानंतर पाच दिवसानी प्याचवी केली जाते. प्याचवी रात्री करतात.

पाचवीच्या दिवशी सर्वात अगोदर मुलाला सुपात घालतात. त्यानंतर हाडगीत ( पाटला) भात्यान (सुखे गवत) घालतात. हाडगीत मुलाला घालतात. रात्री मुलांचा पायात, हातात सूतं बांधली जातात. सूपाला सूत बांधून त्यात चांदड्याचे पान ठेवतात व त्यात पानात भात वाडतात. त्यानंतर त्या पानात तांदळाच्या पीठाचा दिवा आणि पाच तऱ्हेच अलंकार शिजवून ठेवतात. त्याचप्रमाणे चणे शिजवून भाता भोवती पेरतात. दिव्यात सूताची वात घालून पेटवतात.मुलाला खाल ठेवून तो दिवा दाखवतात. त्याचप्रमाणे स्थान घरात तपल्याला सूत बांधून आता चांदड्याच्या पानात तांदळाच्या पिठाचा दिवा ठेवतात. मुलांची आई आत डोकावून तो दिवा पाहते. पाहून झाल्यानंतर तो दिवा वरून काही घालून झापून ठेवतात.

**७.२.१.३ लग्न**

मुलागा मुलगी पहाण्यासाठी येतो. मुलगी चहा घेऊन समोर येते. मुलगी पसंत आल्यानंतर थोड्या दिवसाने मुलागा आणि त्याचा कुटुंब पावणुकींची भाकरी खाण्यासाठी येतो. त्यानंतर मुलीकडची लोक मुलाच घर पहाण्यासाठी जातात. सगळ जाल्यानंतर मुलीच्या घरात लग्न ठरवण्यासाठी मुलाकडचे लोक, मुलीच्या गावातील लोक जमतात.

लग्न ठरवतात त्या दिवशी चहा घेऊन येते तील मुलाकडचे लोक भेट देतात. लेन- देना विषयी बोलणी करतात. साखरपुड्याची व लग्नाची तारीख ठरवली जाते. बोलणी झाल्यानंतर जेवण करतात. त्या दिवशी मावसाहारी जेवण केले जाते.

**‘ साखरपुडा’** मुलीच्या घरी करतात. त्या दिवशी मुलीच्या घरी अंगण शेणाने सारवून, अंगणात मंडप घालून सजवतात. गावातल्या सर्व लोकांना सांगावे लागते. मुलगा येताना साडी, फुलांचा झेला नवरी मुलीला घेऊन येतो. साखरपुड्याचा विधी तुळशी वृधावन पुढे करतात. तुळशी पुढे कांबळ किंवा शेंदरी घालतात. मुलगा येऊन तिथे बसतो. त्यानंतर मुलीला बाहेर आणले जाते. मुलगी बाजूला येऊन बसते. त्यानंतर सर्व विवाहित स्त्रिया नवरी मुलीला गंध- फुल लावून **‘ ओटी’** भरतात. ओटी भरून झाल्यानंतर साखरपुडा फोडतात. नवरी मुलीने आणलेला साखरपुडा नवरा फोडतो तर नवऱ्या मुलाने आणलेला नवरी फोडते. त्यानंतर नवरा-नवरी जोडीने तुळशीचे पाच **‘येडे’** ( फेरे) मारतात.

धनगर समाजात साखरपुडा हा विधी करण्यासाठी भटाला बोलवले जात नाही. हा विधी धनगर **‘ येडगा’** करतो. धनगर समाजात येडग्याला महत्त्वाचे स्थान असते. साखरपुड्याला मासाहारी जेवण बनवत नाही. डाल, खतखते, भात, भाजी, पापड, लोणचे इ. पदार्थ करतात. जेवण झाल्यानंतर मुलांची व मुलींची मंडळील **‘झता’** काडण्यासाठी बाजारात जातात. झता म्हणजे नवरी मुलीला लग्नाचा शालू, हळदीला एक पातळ, चिरकुट घेतात तसेच देवाला, मुलीच्या मामाला, भावाला, आई- वडिलांना इ. लोकांना मुलाकडचे लोक कपडे घेतात. हा झता लग्ना दिवशी मुलांच्या घरी वाटतात. त्याला ‘ पावत्या’ पुजणे असे म्हणतात.

लग्नाच्या आदल्या दिवशी हळदीचा कार्यक्रम असतो. दुपारी नवरी मुलीला **‘चुडा’** भरण्यासाठी ‘ कासार’ येतो. गावातल्या स्त्रिया येऊन नवरीला हिरवा चुडा भरतात. त्यानंतर गावातले सर्व स्त्रिया आपल्या पाहिजे त्या बांगड्या घेतात. रात्री कुळ देव पुजतात. हळद कुटतात, मंडोळया गुतात. हळद मुसळात घालून कुटली जाते. मंडोळ्या म्हणजे फुगत घातलेले हारभारे, गहू, खोबऱ्याचे तुकडे, रवीची पाने इ. सूने गुंतायचे. दहा मंडोळ्या गुंतात. पाच नवरीला तर पाच नवऱ्या मुलाला मंडोळ्या देतात. या दिवशी **‘देवाक’** आणले जाते. देवाक आणणे म्हणजे जुने घरातले जोडपे हुमऱ्याचे पान आणून घरात ठेवते.

लग्नाच्या सकाळी हळद लावण्याचा कार्यक्रम होतो. सर्वात अगोदर देवाला तेल चडवतात, देवाला हळद लावतात.त्यानंतर वर किंवा वधूला हळद लावायला सुरुवात करतात. हळद लावया पहिला मान मामाचा असतो. त्यानंतर आई- वडिल घरातील सर्व मंडळी हळद लावते. धनगर समाजात मुलं आपल्या मावशीला हळद लावत नाहीत. मावशी म्हणजे दुसरी आई असते असे मानतात. हळदी दिवशी **'येडगा'** येऊनसगळे विधी करतो.

लग्नात नवरी मुलगी नऊवारी कापड न्हेसून तर मुलगा शेरवानी घालून येतो. पूर्वी लग्न मुलीच्या किंवा मुलांच्या घरात करत होते. वर्तमानात ही स्थिती बदललेली आहे. वर्तमानात लोक हॉलमध्ये किंवा देवळात लग्न करतात. लग्नाचा विधी भटजी करतो.

लग्न झाल्यानंतर सर्व मंडळी मुलाच्या घरी जातात. त्याला 'वरात' म्हणतात. मुलाकडचे लोक नाचत वरात घरी घेऊन जाते. घरात प्रवेश करण्यापूर्वी नवीन जोडप्यांना ओवाळले जाते. नवरी उजव्या पायाने ' माप' ओलांडून आत प्रवेश करते. दोघेही देवाऱ्यापुढे जाऊन बसतात. त्याला **' मागारीन पाया पडविणे'** असे म्हणतात. हा विधी येडगा करतो. नवरा मुलगा ' **निवद'** ( नैवेद्य) देवाला दाखवतो. देवाची ओटी भरतात. देवाची ओटी भरून झाल्यानंतर नवरी मुलीची ओटी भरतात. ओटी पैसे, तांदूळ, सुपारी,पान, कारख, हळदकुड इ. वस्तूने भरतात. त्यानंतर हाताचे छाप ( ठसे) देव पुजलेल्या कांबळीला व चूलीला लावायचे. छाप हळद आणि कुंकूचे लावतात. त्यानंतर ओटी बांधून जोडपे सर्वांच्या पाया पडतात. पाया पडून झाल्यानंतर झता वाटायला सुरुवात करतात. झता संपल्यानंतर नवरी आपल्या घरच्या लोकांना भेटून रडते. सगळे घरी परतात.

**७.२.१.४ मार्तिक**

पळसकाटा परिसरात मेल्यानंतर थोडे लोक अग्नी देता तर थोडे दहन करतात. गावातले लोक तसेच नातेवाईक मेलेलेच्या तोंडावर नदर घालण्यासाठी येतात. 'आयाव' मेलेल्या स्त्रियांना माळ घालतात. फाती माळातात. गंध लावून ओठी भरतात. आयाव म्हणजे जीचा नवरा जिंवत असतो. रांडव मेलेल्या स्त्रिला फक्त हिरवे चिरकुट देतात. तोंडात साखर आणि पाणी घालतात.

तीन दिवसाने माती सावडतात. माती सावडण्यासाठी पुरलेल्या किंवा जाळलेल्या ठिकाणी जातात.जाताना तीन नळया ( बांबूच्या काठीने तयार करतात), पीठाचे दामटे, शेण, दुध घेऊन जातात. तीन बाजूने शेण थापटात

त्यावर पीठाच्या दामट्या ठेवतात. त्या दामट्यावर नळी ठेवून दूध ओततात. ‘ इसाव’ आहे त्या ठिकाणी तेल घालतात. गंध, अगरबत्ती लावून पाया पडतात. इसाव म्हणजे पुरलेल ठिकाण. त्यानंतर पुरलेल्या किंवा जाळलेल्या ठिकाणीच्या गोलकारात उसकीच्या डाळ्याने गावतल्या लोकांने मातीत लोटून आत घालायची तर घरच्या माणसाने हाताने घालायची असते. हे सगळ झाल्यानंतर लोक नदीवर जाऊन पाय धुऊन मेलेल्या व्यक्तिच्या घरी येऊन जामळीच्या पानाने पायवर पाणी घेतात.

मेलेल्या घरातल्या व्यक्तिच्या घरी १२ दिवस चूल व देवाला दिवा पेटवत नाही तसेच चुलीतील गोबर बाहेर फेकला जात नाही. गावातले किंवा नातेवाईक त्यांना खायला पेज, चपाती आणून देतात. त्या घराला ‘ सूतक’ लागले असे म्हटले जाते. घरातले सगळे कपडे धूऊन घरातले लोक घालतात. परंतु कपडे सुकतात तेव्हा शेजाराल्या बोलवून ते त्यांच्याकडून काडून घेतात. त्या कपड्याना ते स्पर्श करत नाही. ते सर्व कपडे बांधून ठेवले जातात कपडे घरातले.

अकराव्या दिवशी गावातले तसेच नातेवाईक येतात. त्या दिवशी दुरणाला हात लावतात. ‘दुरण’ म्हणजे पाण्याने भरलेली कळशीतून पाणी ओतात ते जामळीणीच्या पानाने हलवतात व  म्हणतात ‘जा सोन्या सारखा’. दुरणाला धरून लोक रडतात. त्या दिवशी **‘ म्हाली’** ( केस कापणार)येतो. मेलेल्या व्यक्तिच्या मुलाचे केस कापून त्याला नदीवर घेऊन जातात. घरात एक पाटला घ्यायचा त्याच्या खाली तांदळाचे पीट घालून तो झापायचा व त्या पाटल्यावरती मेलेल्या व्यक्तीचे **‘ गाठोडे’** (कपडे ) बांधून ठेवतात. नदीवरून मुलगा आल्यानंतर तो पाटला उघडतात. त्या पिटावर पायशेर ( ठसे) येतात. काठीचे, गुरांचे, मुंगीचे इ. कोणाचेही ठसे येतात. ज्याचे ठसे येतात त्यांच्या जन्मात मेलेला माणूस गेला असे म्हणतात.

रात्री माळ लावयची असेल तर गावपी आणले जातात. **‘गड’** पुजला जातो. ‘ गड’ म्हणजे पुरुष मेलेला असेल तर कांबळ आणि धोतर ठेवून तंबू कसा तयार करतात. स्त्री असेल तर चिरकुट ठेवतात. त्यात आत मोग्यात ( मातीचा तांब्या) ठेवून पाणी ठेवतात. गावपी गात असतो. घरातील लोक मोठमोठ्यान रडतात. त्यानंतर मेलेल्या व्यक्ति घरातल्या व्यक्तिवर वाडतो (भार येतो). खर जर मेलेला व्यक्ति वाडला असेल तर गडाचे पाच फेरे मारून गडाचे पाणी पितो. पाणी येऊन तो गायला सुरुवात करतो. त्याची मुल- बाळ असेल त्यांना भेटून रडतो. आपण कसा मरण पावलो ते सांगतो.

सकाळी बाराव्या दिवशी बोकड मारला जातो. गावातले सर्व लोक, नातेवाईक जेवतात. त्यानंतर मेलेल्या घरातल्या व्यक्तिचे दुख पुसतात. मेलेल्या व्यक्तिला मुलगा असेल तर त्याच्या डोक्याला तुवाला गुडाळातात ( बांधतात), बायकोला कापड  देतात. त्याला **‘ सुत’** घालणे असे म्हणतात. सुत घालून लोक घरी जातात. त्या दिवसापासून रोजच्या दिनक्रमाला सुरुवात होते.

**७.२.२ लोकसमजुती**

**‘ पळसकाटा’** परिसरात धनगर लोकांमध्ये अनेक लोकसमजुती प्रचलित आहे. या समजुतीला धरून अनेक उपाय देखिल केले जातात. दृष्ट लागणे, सापाविषयी, शुभ अशुभ, भुतपिशाच्च विषयक, देवधर्माविषयीच्या इ. गोष्टीन विषयी धनगर समाजात लोकसमजुती आढळतात.[i]

**७.२.२.१ दृष्ट लागणे**

‘ पळसकाटा’ परिसरातील धनगर समाजामध्ये नजर लागण्याचे भम्र प्रचलित आहे. लहान मुलाला काजळ लावले नाही, लहान मुलं देखण दिसत असेल, लहान मुलं चार- चौधात हसत असेल, नवीन कपडे घातल्याने, गाय जास्त देत असेल तर, देखणा बैल असेल तर बागेत जास्त पिकल्याने इ. मुळे दृष्ट लागते. दृष्ट काडण्यासाठी अनेक उपाय धनगर समाजात प्रचलित आहे. ते पुढीलप्रमाणे :-

**७.२.२.२.१ दृष्ट काढण्याचे उपाय**

१) लहान मुलांच्या पायात काळा दोरा बांधतात.

२) मिरची, केस, कोळसा ओवाळून कटीत घालून बाहेर ठेवतात.

३) फडकी ओवाळून चुलीत टाकतात. त्या फडकीचा चुलीत आकर होतो तो काडून त्याचा पिठा कपाळाला लावतात.

४) दृष्ट लागलेल्या माणसांच्या अंगावरून तीन वेळा केरसूनी  उतरवतात.

५) हातात पायात मुलांच्या वाळे घालतात.

६) लिंबू ओवाळून टाकतात.

७) देवाचा भंडारा लावतात.

८) मिट ओवाळून चुलीत टाकतात.

९) लहान मुलांना काजळ लावतात.

**७.२.२.२ भुतपिशाच्च विषयक समजुती**

' पळसकाटा' परिसरात भूताविषयी काही लोक समजुती पुढीलप्रमाणे आहेत.

१) कुत्र्यांना भूत दिसते.

२) चिंचेच्या झाडावर भूत राहते.

३) आमास्याला, शिमग्याच्या पुनवेला भूत बाहेर फिरते.

४) कातर वेळेला भूत फिरते.

५) मसणवाटीत भूताचे वास्तव्य असते.

६) केस सोडून रात्री फिरल्यावर भूत लागते.

७) रात्री फुले माळून फिरू नये.

८) इच्छा अपूर्ण राहिल्यानंतर भूत होते.

९) आत्महत्या केलेला व्यक्ती भूत होतो. त्याला **' आळवतीन'** म्हणतात.

**७.२.२.३ शुभ- अशुभाच्या लोकसमजुती**

धनगर समाजात शुभ- अशुभ या गोष्टीवर विश्वास ठेवतात. काय केल्याने शुभ होईल काय करून नये अशा अनेक लोकसमजुती धनगर समाजात प्रचलित आहे.

**अशुभ**

१) जेवताना शिकणे.

२) चातक पक्षी ओरडणे.

३) जेवताना केरसुणे मारणे.

४) शनिवारी नकशा काडणे.

५) हळद लावल्यानंतर व लग्नाच्या रात्री बाहेर जाणे.

६) घरात बोंबलणे ( तोंडावर हात मारून ओरडणे).

७) घरात पाय हलवणे.

८) स्वप्नात रेडा, बैल येणे अशुभ असते.

९) गार घरात आल्यानंतर अशुभ होते.

१०) समुद्रावर मासिक पाळी असते तेव्हा जाऊ नये.

११) नव्या घरातून माकड जाऊ नये.

१२) केरसुणी उभी ठेवू नये.

१३) कातार वेळी झोपू नये.

१४) गर्भवती स्त्रिने गिरणादिवशी बाहेर पडू नये.

**शुभ**

१) रात्री घरात दिवड राहिली तर श्रीमंत होतात.

२) रुमडाचे फुल फुलताना पहिले तर श्रीमंत होतात.

३) देवापुढे दिवा लावणे.

४) कोणत्याही कार्याला रांगोळी काढणे.

**७.२.२.४ सापाविषयक समजुती**

१) दिवड घरात एक दिवस राहिल्याने श्रीमंत होतात.

२) मासिक पाळी असते तेव्हा सापावर नदर पडली तर ते आंधळे होतात.

३) सापचे जुळण ( नरव मादीचे मिलन) पाहून नये.

४) सापचे मिलन होताना त्यांच्यावर कपडा घातल्यावर त्या व्यक्तिचे बरे होते.

५) गर्भवती महिलाने साप पाहू नये.

६) सापाला दुखवले तर तो डाव धरतो.

७) साप कितीही वर्षाने डाव पुरण करतो.

### ७.२.२.५ देवधर्माविषयीच्या धनगरांच्या समजुती

धनगर लोकांमध्ये देवाविषयी अफाट श्रद्धा आहे. देवधर्माविषयी अनेक समजुती धनगर लोकांमध्ये आढळतात.

१) देव स्वर्गात राहून सगळे पाहतो.

२) डोक्यातली ऊ खाली पडली तर मेल्यानंतर देव ती शोधायला पाठवतो.

३) गायीच्या पोटात तैतीस कोठी देव असतात.

४) पाप केल्यानंतर देव गरम तेलात सोडतो.

५) देव स्वर्गात जोड्या बनवतो.

### ७.२.३ धनगर लोकांतील अंधश्रद्धा

धनगर लोक एक भटकी जमात आहे. निसर्गात राहून जीवन जगणारे होते. धनगर लोकांचा श्रद्धा, अंधश्रद्धा यांच्यावर फार विश्वास आहे. देव, धर्म, परंपरा याद्वारे अनेक अंधश्रद्धा धनगर समाजात जोपासला जात होत्या. अंधश्रध्देचा पगडा धनगर समाजात भिनलेला आहे.[ii]

जुळी केळी खाल्यानंतर जुळी मुल होतात, खोटी शपत घेतल्यावर ज्याची शपत घेतली तो माणूस मरते, घर बांधनताना कौल घेणे, नजर लागणे, चमत्कार, शकुन- अपशकुन, रात्री घरातून केस सोडून बाहेर गेल्यावर भूतबाधा होते, अमावस्या व पौणिमेला भूत भवतात, शनिवारी नकशी काडली तर शनि लागतो, वार्षिक देवाचा मान दिला नाही तर काही तरी वाईट होणार, कातर वेळावर केस विचरले तर मेलेल्या माणसाना जेवण मिळत नाही इ. अनेक अंधश्रद्धा धनगर समाजामध्ये आढाळतात.

### ७.३ समारोप

धनगरांचे सामाजिक जीवन वैशिष्टपुर्ण असते. लोकसमजुती, विधी, अंधश्रद्धा इ. त्यांच्या जीवनाचा एक भाग असतात. ‘पळासकाटा’ परिसरातील धनगर सामाजामध्ये या सर्व गोष्टी आढळतात. पळसकाटा परिसरातील लोक अशिक्षत होते. वर्तमानत मात्र प्रत्येक घरातील व्यक्ती शिक्षण घेऊन चांगल्या पदावर नोकरी करत आहे. असे असले तरीही शिक्षित व अशिक्षित दोन्ही वर्ग अंधश्रेद्धेवर, लोकसमजुतीवर विश्वास ठेवतात.

धनगर सामाजात परंपरेने चालत आलेल्या विधी वर्तमानातही करतात. मात्र वर्तमानात काही नवीन विधीची भर पडली आहे तर काही विंधीनमध्ये परिवर्तन झाले आहे. ‘ बारसा’ हा नवीन विधी करतात. तसेच लग्न पूर्वी घरात केले जायचे आता हॉल किंवा देवळामध्ये करतात.

एकंदरीत सदर प्रकणामध्ये धनगराच्या विधी व लोकसमजुतीचा अभ्यास करण्यात आला आहे. धनगर समाजात जन्म, लग्न, मार्तिक इ. प्रसंगी अनेक विधी केले जातात या विधीचा अभ्यास सदर प्रकरण्यात केला आहे. त्याचप्रमाणे धनगर समाजात प्रचलित असलेल्या दृष्ट लागणे, भूतपिशाच्च , शुभ-अशुभ, सापाविषयक, देवधर्म इ विषयक असलेल्या लोकसमुजीतीचा आढावा घेण्यात आला आहे.

**७.४ निष्कर्ष**

1. ‘ पळासकाटा’ परिसतील धनगर समाजात विधीना महत्त्व असते.
2. विधीवर आधुनिक जीवनशैलीचा प्रभाव पडला आहे. उदा. पळसकाटा परिसरात वर्तमानात मुलांच्या जन्मानंतर बारसा हा नवीन विधी करतात.
3. अशिक्षित तसेच शिक्षित दोन्ही वर्ग अंधश्रध्देवर विश्वास ठेवतात.
4. धनगर लोकांनमधे लोकसमजुती प्रचलित आहे.
5. श्रद्धा, धारणा, लोकसमजुती इ. धनगर लोकांच्या जीवनाचा एक भाग आहे.
6. धनगर समाजात सापाविषयी, देवधर्माविषयीच्या, भुतपिशाच्च इ. विषयक अनेक लोकसमजुती आहेत.

संदर्भ सूची

---

[i] १) गवते ज्ञानेश्वर: “ धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन”. प्रकाशक: के. एस. अतकरे, केलाश पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, मार्च २०११, पृ.क्र.१७१

[ii] २) गवते ज्ञानेश्वर: “ धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन”. प्रकाशक: के. एस. अतकरे, केलाश पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, मार्च २०११, पृ.क्र १७७

**श्रेय नामावली**

१) गंगी शेळके- वय-६८, पत्ता- पळासकाटा, शेळके कुटुंबातील मुख्य स्त्री.

२) नकली पाटील -वय- ६४, पत्ता- पळासकाटा, गृहिणी.

३) संगीता पावणे, वय-५२, पत्ता- पळसकाटा, गृहिणी.

४) बाप्या पावणे, वय- ५५, पत्ता- पळसकाटा, सामान्य नागरिक

५) लखी शेळके, वय-६५, पत्ता- पळासकाटा, गृहिणी.

६) धाकी शेळके, वय-४४, पत्ता-पळासकाटा, गृहिणी.

७) गोदी झोरे, वय-५४, पत्ता- पळासकाटा, गृहिणी.

# समारोप

भारतामध्ये अनेक जाती- जमातींचे लोक राहतात. भारतीय संस्कृती अनेक जाती पंथ, धर्म, भाषा यांनी बनलेली आहे. प्रत्येक जमातीचे आपले स्वतःचे वेगळेपण आणि स्वतःची संस्कृती आहे. ती संस्कृती जपून ठेवण्याचा प्रयत्न आजतागायत करत आहे. त्यापैकी अत्यंत महत्त्वाचा असा 'धनगर समाज' आहे. जो महाराष्ट्रामध्ये तसेच गोमंतकमधेही आढळून येतो. गोमंतकमध्ये काणकोण, सांगे, धारबांदोडा, केपे, वाळपई इ. ठिकाणी हा समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहे.

धनगर समाजाच्या रुढी, परंपरा, रितीरिवाज, राहणीमान, लोकवाङ्मय किंवा त्यांचे लौकिक आविष्कार या सगळ्या गोष्टी इतरापेक्षा भिन्न असल्याचे जाणवते. गाई, शेळया हेच त्यांचे खरे धन असते. धनगर समाज म्हणजे एक भटकी जमात असे म्हटले जाते. पूर्वी धनगर लोक एका ठिकाणी स्थिर राहत नसे. एका गावातून दुसऱ्या गावात फिरत असे. जेथे आपल्या जनावरांना खायला मिळेल त्या ठिकाणी काही काळ थांबत होते मग तिथे संपल्यानंतर दुसऱ्या गावाची वाट धरत होते. अशा प्रकारे गोमंतकाच्या वेगवेगळया भागात या समाजाने आपली वस्ती तयार केलेली आहे. आता सुमारे तीस वर्षापासून धनगरांची कुटुंबे एकाच ठिकाणी आहे. बऱ्याच धनगरांनी आज पक्की घरे बांधलेली आहेत. पूर्वी भटकणारा हा समाज वर्तमानात एकाच ठिकाणी स्थिर झालेला पहायला मिळतो. काणकोण, सांगे, सत्तरी, धारबांदोडा तालुक्यात धनगरांच्या वस्त्या आहेत.

'धारबांदोडा' तालुक्यातील 'पळसकाटा' परिसरात धनगरांच्या मोठ्या प्रमाणात वस्त्या पहायला मिळतात. सुमारे देडशे वर्षापूर्वी हा गाव एक जंगल होता. वर्तमानात समृद्ध असा गाव आहे. पळसकाटा हा धारबांदोडा तालुक्यातील छोटासा गाव आहे. गावामध्ये हिंदू, खिश्चन मुस्लिम जाती- धर्माचे लोक राहत आहे. असे असले तरी धनगर लोकांच्या जास्त वस्त्या आहेत.

'पळासकाटा' पारिसरीतील धनगर लोकांची जीवनशैली, रुढी, परंपरा, व्यवसाय इ. इतर समाजापेक्षा भिन्न आहे. धनगर लोक अनेक सण- उत्सव साजरे करतात. धनगर लोकांमध्ये दसरा, गजा इ. प्रसंगी धनगर स्त्रिया फुगड्या घालतात. फुगड्या घालताना स्त्रिया अनेक गीते म्हातात. फुगडी गीते दैनंदिन जीवनातील आशय घेऊन आकारास येतात. धनगर समाजाचे लोकसाहित्य वैशिष्ट्यपूर्ण आहे.

धनगर स्त्री कष्टाळू, साधी,भोळी असते. अगोदर धनगर स्त्रियांचे लग्न लहान वयातच व्हायचे. त्यामुळे त्यांना लहान वयातच मोठ्या जबाबदाऱ्या पेलाव्या लागायच्या. जात्यावर दळण दळणे, शेतात काम करणे, विहिरीवरून पाणी आणणे इ. कष्टाची कामे करावी लागत. धनगर स्त्री एक यंत्रणाप्रमाणे दिवसभर काम करत. विसावा घेण्यासाठीही त्यांना वेळ नसायचा. त्यामुळे त्यांच्या वेदना, दुख, आनंद याला वाचा फोडण्याचे ऐकमेव साधन म्हणजे लोकगीते असायची. जात्यावर दळण दळताना, लग्नाच्या वेळी, फुगडी घालताना स्त्रिया आपल्या वेदना, विरह, दुख, सुख, इ. भावना व्यक्त करायच्या. यातूनच लोकगीताची निर्मिती झाली.

पळसकाटा परिसरतील धनगर लोकांचा मुख्य व्यवसाय गोपपालन, बकरी पालन व शेती होता. पुरुषाबरोबर धनगर स्त्रिया सर्व कामे करायच्या. शेतात काम करताना वेळ जावा म्हणून अनेक कोडी, म्हणी एकमेकांना घालायचे. धनगर समाजात पुरुषाला पहिला तर धनगर स्त्रियांना दुयम्म स्थान असायचे. धनगर स्त्री कधीही आपल्या नवऱ्याला नावाने हाक मारत नसत. फक्त उखाण्यातून त्यांना नाव घेण्याची संधी मिळायची.

धनगर लोकांच्या प्रयोगसिद्ध लोककला म्हणजे दसरा खेळ, गजा नृत्य, चपय खेळ, फुगडी इ. आहे. हे खेळ नृत्य परंपरांने चालत आलेले वर्तमानत पळासकाटा परिसरातील धनगर लोकांमध्ये पहायला मिळतात. धनगर नृत्य, खेळ एका विशिष्ट प्रकारे खेळले जातात. हे खेळ खेळताना पायावर व हातावर लक्ष द्यावे लागते. धनगर खेळ, नृत्य जसे वैशिष्ट्यपुर्ण आहे तसा त्यावेळी परिधान केलेला पोशाख वैशिष्टपूर्ण असतो.

धनगरांचा पेज, नाचण्याची भाकरी, आंबील, दुध- दही, ताक, कडी, तूप, भाजी इ. मुख्य आहार आहे. धनगर लोकांचे राहणीमान अगदी साधे असते. धनगर लोकांच्या घरे म्हणजे गवताच्या छोट्या छोट्या झोपड्या, झोपड्या पुढे गुरांसाठी गोठा व बाजूला क्यारीच्या काठ्याचे बकऱ्यासाठी साठ होते. धनगर लोक निसर्गाशी जवळ असल्यामुळे त्यांना रानातल्या औषधी वनस्पतीचे बऱ्यापैकी ज्ञान होते. गुरांसोबत किंवा बकऱ्यासोबत फिरताना काही दुखापत झाली तर ते तिथेचे औषध करायचे. धनगर लोक छोट्या छोट्या कारणासाठी दवाखान्यात जात नसे. स्वतःचा उपचार स्वतःच करत होते. धनगर लोकांचा देवावर फार विश्वास आहे. श्रद्धा, अंधश्रद्धा, विधी, लोकसमजुती इ. धनगर लोकांच्या जीवनाचा एक भाग आहे. शिक्षित तसेच अशिक्षित दोन्ही वर्ग यांवर विश्वास ठेवतात.

'धारबांदोडा पळासकाटा येथील धनगर सामजाचे लोकसाहित्य' असा प्रबंधिकेचा विषय असल्यामुळे अर्थातच सदर प्रबंधिकेत पळासकाटा परिसरातील धनगर लोकांच्या लोकसाहित्याचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रबंधिकेची सुरुवातीला लोकसाहित्य म्हणजे काय, व्याख्या, व्याप्ती ,पळसकाटा परिसरांची भौगोलिक, सांस्कृतिक, सामाजिक दृष्ट्या कसा वेगळा आहे यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

धनगर लोकवाङ्यातून आविष्कृत झालेल्या अनेक घटकांचा आढावा घेण्यात आला आहे. लोकगीतांचा विविध अंगाने अभ्यास करण्यात आला आहे. धनगर समाजात प्रचलित असलेल्या लोककथांचे विविध प्रकार हातळण्यात आले आहे. म्हणी, वाक्प्रचार, उखाणे इ. चे प्रयोजन लक्षात घेऊन अभ्यास करण्यात आला आहे.

एकंदरीत लोकवाङ्ग्याचा आशयनिष्ठ, भाषिक, सामाजिक, प्रयोजनात्मक, लोकजीवनाशी असलेला संबंध, वाङ्ग्यीन मूल्यमापन, व्यवसायाशी असलेला संबंध, आचरविचार, कौटुंबिक विषय, श्रमाचे निरसन इ. अनेक दृष्टीकोणातून करण्यात आला आहे. तसेच प्रयोगकलाचा स्वरूप, सादरीकण, प्रकार या अंगाने अभ्यास केला आहे. धनगरांच्या भौतिक संस्कृतिक अभ्यास करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे धनगर समाजातील लोकसमजुती, विधी अंधश्रद्धाचा इ.अभ्यास केलेला आहे

# निष्कर्ष

१.‘लोकसंस्कृती’ लोकसाहित्याच्या अभ्यासाचा एक महत्त्वाचा घटक आहे.

२. वर्तमानकालीन गोव्याची संस्कृती भारतीय आणि पोर्तुगीज संस्कृतीच्या मिश्रणातून तयार झालेली आहे.

३. धनगर समाज ही पूर्वी भटकी जमात म्हणून ओळखली जात होती. तरी आज धनगर समाज आज एका ठिकाणी स्थायिक झालेला आहे.

४. धनगर समाजावर व लोकसाहित्यावर आधुनिक जीवनशैलीचा परिणाम झाला आहे. उदा. वर्तमानात पूर्वीप्रमाणे धनगर लोक वेशभूषा करत नाही. रात्रभर दसरा खेळ खेळला जात नाही. आधुनिक जीवनशैलीचा परिणाम लोकांवर झालेला असला तरी लोकसाहित्य टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. उदा. वर्तमानात दसऱ्याला देव पूजण्यासाठी पूर्वीप्रमाणे नदीतून आणले जाते.

५. धनगर समाजाचे लोकवाङ्मय वैशिष्टपूर्ण असून धनगर लोकवाङ्मयात वाङ्मयीन मूल्ये दडलेली आहेत. लोकवाङ्मयामूळे आणि लोकसंस्कृतीमूळे हा समाज वेगळा ठरतो.

६. पळसकाटा परिसर सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध असून वाङ्मयीन दृष्ट्या प्रगल्भ आहे.

७. धनगर लोकगीतांतून त्यांच्या भावभावनांच्या चित्रणाबरोबर, कल्पनारम्यता आणि शब्दकळेचे सुरेखपणे दर्शन घडते.

८. धनगर गीतांतून त्यांच्या जीवनानुभवाचे प्रतिबिंब पहावयस मिळते.

९. लोकगीतांतून धनगर लोकांच्या व्यवसायाचे दर्शन घडते.

१०. वाङ्मयीन गुण धनगरांच्या गीतातून प्रत्ययास येतात.

११. धनगर बालगीतांतून सामाजिक विषय हाताळलेले आहे.

१२. धनगर समाजात पुरुषांबरोबर स्त्रियाही श्रमाची कामे करतात.

१३. धनगर श्रम गीतांत अनेक कौटुंबिक विषय आढळतात.

१४. कौटुंबिक जीवनातील सुखः दुख अत्यंत सुंदरपणे धनगर स्त्रिया लोकगीतातून व्यक्त करतात.

१५. धनगर कथांतून सामाजिक प्रश्नाची उकल केली आहे.

१६. धनगर लोककथांतून इतिहासाचे दर्शन घडते.

१७. धनगर लोकथांतून नैतिक शिकवण दिली जाते.

१८.‘ पळसकाटा’ परिसरात परंपरेने चालत आलेले सण उत्सव वर्तमानातही साजरे केले जाते.

१९. धनगर लोककला सादर करताना विशिष्ट पद्धतीचा पोशाख परिधान करतात.

२०. समाजात ‘ पागोट्याला’ महत्त्वाचे स्थान असते. प्रत्येक सण उत्सावेळी ‘ पागोटे’ घालावेच लागते. पागोटे घातल्याशिवाय कोणतेही देवाचे काम करता येत नाही.

२१. धनगर स्त्री नऊवारी कापडाशिवाय देवाचे काम करू शकत नाही.

२२. धनगर समाजाचे जीवन कष्टकरी, प्रामाणिक शेतकरी, साधेपणा, बकरीपालन, गोपपालन इ. गुण वैशिष्ट्याने संपन्न आहे.

२३. धनगर लोकांचे रहाणीमान अगदी साधे असून धनगरांची गुरे, वासरू, बकऱ्या हेच त्यांचे खरे धन आहे.

२४. धनगर स्त्रियांचा परंपरागत वेश म्हणजे नऊवारी चिरुकुट ( कापड) होय.

२५. धनगर समाजाचा निर्सगाशी जवळचा संबंध आहे. यामुळे धनगर लोकांना वनौऔषधीचे बऱ्यापैकी ज्ञान आहे.

२६. धनगर लोकांचा मुख्य आहार पेज, नाचण्याची भाकरी, आंबील, दही-दुध, ताक, तूप इ. आहे.

२७. धनगर लोक स्वतःच्या कला, कौशल्याचा वापर करून जीवन जगत होते.

२८. वर्तमानात धनगर लोकांच्या वेशभूषेत बदल झाला आहे. दैनंदिन जीवनात लोक तुवाला, पागोट्या, कांबळे ऐवजी पेन्ट शर्ट परिधान करतात.

२९.पळसकाटा परिसरातील धनगर समाज काळाबरोबर बदलत गेला आहे. धनगर समाजात परिवर्तन झाले आहे. करडाच्या ( गवत) झोपड्याऐवजी वर्तमानात कॉक्रीटची घरे दिसतात.

३०. उखाण्याची रचना काव्यात्मक उपमा, लालित्य इ. गुणांनी नटलेली असते.

३१. धनगर समाजाचे दर्शन त्यांच्या लोकजीवनाचे दर्शन म्हणीतून होते.

३२. ‘ पळासकाटा’ परिसतील धनगर समाजात विधीना महत्त्व असते.

३३. विधीवर आधुनिक जीवनशैलीचा प्रभाव पडला आहे. उदा. पळसकाटा परिसरात वर्तमानात मुलांच्या जन्मानंतर बारसा हा नवीन विधी करतात.

३४. धनगर लोकांमध्ये लोकसमजुती प्रचलित आहेत.

३५. श्रद्धा, धारणा, लोकसमजुती इ. धनगर लोकांच्या जीवनाचा एक भाग आहे.

३६. धनगर समाजात सापाविषयी, देवधर्माविषयीच्या, भुतपिशाच्च इ. विषयक अनेक लोकसमजुती आहेत.

# परिशिष्टे


परिशिष्ट १ ........................................ 125

गोव्याचा राजकीय नकाशा ........................................ 125

परिशिष्ट २ ........................................ 126

गोव्याचा प्रशासकीय नकाशा ........................................ 126

परिशिष्ट ३ ........................................ 127

छायाचित्रे ........................................ 127

३.१ पळसकाटा परिसर ........................................ 127

३.२ धनगरांचे अलंकार ........................................ 130

३.३अवजारे ........................................ 132

३.४ औषधी वनस्पती ........................................ 136

३.५ लग्न ........................................ 138

३.६ धनगर दसरा ........................................ 139

३.७ शिमगा ........................................ 144

३.८ होळी ........................................ 145

प्रबंधिकेतील कठीण शब्दाचे अर्थ ........................................ 146

संदर्भ सूची ........................................ 147

व्यक्तीनामसूची ........................................ 148

# परिशिष्ट १

## गोव्याचा राजकीय नकाशा



# परिशिष्ट २

## गोव्याचा प्रशासकीय नकाशा



# परिशिष्ट ३

# छायाचित्रे

## ३.१ पळसकाटा परिसर



पळसाचे झाड



पळसाचे फुल





धनगर लोकांची घरे



कृष्णाचे देऊळ





आजोबाची पूर्वीची घुमटी

आजोबाची नवीन घुमटी



देवळाचा गर्भगृह ( महामाया देवी )



महामाया देवीचे मंदिर

## ३.२ धनगरांचे अलंकार

वाक्या ( पुरुष नृत्य करताना पायात घालातात)



मोती ( स्त्रिया नाकात घालतात)





बुगड्या



वेडे ( विवाहित स्त्रिया पायात घालतात)



दातकड



माळा



येडी

**३.३अवजारे**



**पायली**



**खाटूक ( पिठ मळायची)**



**मोगा**



**रवी ( ताक करण्यासाठी वापरतात)**



फातर ( मिरची वाटण्याची)



रगाडा



जाते



मुसळ



खोटला ( पाटला)



सूप



भारडी (ताक करण्यासाठी वापरतात)




खुरपे



**आडिकता**



## ३.४ औषधी वनस्पती



कडूलिंबू



वळसरीची पात



रानमोडी



आडोळसा





**चांदाड्याचे झाड**

**पपईचे झाड**





**मीरी**

**गजन**

# ३.५ लग्न



देवाला हळद चडवणे



तेल लावणे



येडगा हळद लावताना



लग्नाचा विधी



# ३.६ धनगर दसरा





देवाचा दुडगा



दळण दळताना



कडाकनी





देवाचा नैवेद्य



मांडाव जातान- देवाची आरती



देवाची पाटी



मांडावरची पूजा



मांडावर जाप लावताना ( सांगणे)



ढोल- ताशा



दसरा खेळ



पुरुष पोशाख



स्त्रियांचा पोशाख





**सोन लुटांना करण्यात येणारे**

**विधी**



# ३.७ शिमगा

चपय खेळ







पोस्त

# ३.८ होळी





**प्रबंधिकेतील कठीण शब्दाचे अर्थ**

- **कडाकने :** तांदळ्याच्या पिठाने केलेला पदार्थ
- **कराड :** गवत
- **येडगा :** धनगर लोकांचा भटजी
- **मंडोळ्या :**
- **पार :** वेळ
- **लिंगायीत :** शाखाहारी
- **अनसुड**
- **दुडगा**
- **झगा :** दसरा, गजा खेळाताना घातला जाणार पोशाख
- **मेळ :** शिमगा खेळणारा गट
- **पवा :** गजा खेळणारा गट
- **इडा :** विडा
- **फोक :** काठी
- **रानमोडी :** रानात मिळणारी छोटी रोपट
- **मिरगात :** उन्हाळ्यात
- **साठ :** बकऱ्याचे घर
- **गेळं :** बकऱ्याच्या पायातील मधला भाग
- **हाडगी :** पाटला

- **वैजीण :** प्रस्तु करणारी बाई
- **निवद** : नैवेद्य
- **गाठोडे** : बांधून ठेवलेले कपडे
- **येडे** : फेरे

**संदर्भ सूची**

1. कालभूत पुरुषोत्तम : " लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन". विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, १० जानेवारी २००७.
2. केरकर पौर्णिमा राजेंद्र: " अनुबंध लोकगंगेचे". प्रकशक- विवेकानंद साहित्य संस्कृती अभिवृद्धी मंच, केरी सत्तरी गोवा, २७ ऑगष्ट २०१२.
3. गवते ज्ञानेश्वर: " धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन". प्रकाशक: के. एस. अतकरे, केलाश पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, मार्च २०११.
4. च्यारी शुभदा : " धनगर स्त्री". प्रकाशक: विवेकानंद साहित्य संस्कृती अभिवृद्धी मंच केरी, सत्तरी -गोवा,२८ जुलै २०१४.
5. भागवत दुर्गा : " लोकसाहित्याची रुपरेखा". वरदा बुक्स सेनापती बापर मार्ग पुणे, १९५७.
6. भोसले डॉ. द.ता. : " लोकसंस्कृती: स्वरूप आणि विशेष". अरुण जाखडे पद्मगंधा प्रकाशन, २७ मे २००४.
7. महांबरे डॉ. स्नेहा सुवास प्रभु: " गोव्यातील धालो या लोकनाट्य कलाप्रकाराचा चिकित्सक अभ्यास". शुभश्री प्रकाशन, ५ सप्टेंबर २०१५.
8. व्यवहारे डॉ. शरद : " लोकसाहित्य: संकल्पना व स्वरूप". सदाशिव अतकरे तिरुपती प्रकाशन लोकमान्यनगर, परभणी, द्वितीय आवृती १६ डिसेंबर २००४.

**व्यक्तीनामसूची**

१. नागी शेळके , वय-५५, पळसकाटा, गृहिणी

२. गंगी शेळके, वय- ६८, पळसकाटा, गृहिणी

३. धाकी शेळके, वय -४४,पळसकाटा, गृहिणी

४. पुजा शेळके, वय-२५, पळसकटा, लॅब टेक्निशियन.

५. गंगाराम शेळके, वय-४५ , पळासकटा, होम गार्ड

६. बाबूराव , वय-४८,पळासकटा, होम गार्ड

७. भैरू झोरे, वय-६३, पळासकाटा, रिटार्य सरकारी कर्मचारी

८. सुरेखा झोरे, वय-४८, पळसकाटा, गृहिणी

९. ठमी झोरे, वय-५०, पळसकाटा, गृहिणी

१०. गोदी झोरे, वय-५४, पळसकाटा, गृहिणी

११. जानू पाटील, वय-३९, पळसकाटा, पोलीस

१२. नकली पाटील,६४,पळसकाटा, गृहिणी

१३. बापू पावणे , वय-५५, पळसकाटा, सामान्य नागरिक

१४. संगीता पावणे, वय-५२, पळसकाटा, गृहिणी

१५.पुजा खरात, वय-२५, काणकोण, नर्स

१६. दिप्ती डोईफोडे, वय-२३, बंदिरवाडा वाळपई सत्तरी गोवा

**जात्यावरचे गीत :-**

आग पारे ग रातीच पारम कोंबड
पारे ग रातीला खेर कोंबड पखू झाडी
पंख झाडीत पारेम रातीला
खेरू कोंबड
आग दादा पेडची कुलुब काडी
दादा ह्यो माझा हावूश दारू
आग बंदूराया ह्यो हावूश दारू..
म्हसी जायत्या गावाच्या दारी
आग पार कोंबड मदानी राती पंख झाडी
पखम झाडीत खेरु कोंबड
बंदू माझा ह्यो हावूशा दारु
म्हशी चरितो शेताचा मेर
आग पारे ग रातीच पार ग कोंबड

काळया ग कुरुडाच ( फातर) हे जातं
जातं ग हे माझ कुरुड जातं
जातं कशी ग एकली वडू
काळया ग कुसडाच हे जातं
जातं कशी ग एकली वडू.

केला ग खुटा कुणी ग हेचा
हाती ग पडी तो चुडी ग याचा
दळण दळीते बारीक म्हणते
सासू ग म्हणते बारीकू दळ
दळाण दळूते नाचण्याच
सासू ग म्हणते बारीकू दळ
माझ्या कबरेला आले ग कळ.

बंधू माझा जात ग धरीले मातीवरू
जीवा लागू माझ्या बंदू
जात धरिले मातीवरू
दळान दळीते नाचण्याच.
दळीते सव्वा ग खांडी
पीट पडत एक मांडी
जीव ग लागू बंधू
आग मी जाते बाजारातू
दादा माझ्या झालेम लेकू
आग मला कळले भरल्या बाजारातू
आग जाते दादा घरी
देते साखर खडम साखरू
जीवा लागू माझ्या ग बंधू
वाटेवरू थोरूम वडू
आग वडू आमी दोघी यडू
पीत्या माझ्याच्या घरकड
आग पाऊस पडतो डहू ग पवळयाचा
दादा माझ्याचा घराकड
पाऊस पडते डहू ग पणळयाचा
चिखूल झाले भारी ग
दादा माझा वाट ग शिवू लागले
माहेरी वाटा हळद दाटा
आग वाटा माहेरी शिवू लागल्या
बंधूराया येतो माझा निह्याग
नदी भरील्या दोन्ही ग तडी
नदी शरनी दडापल्या
दादा माझा छाती तोडीतो पानी छातीनी
बहनी माहेरी घेवूनी जाई
बाहिण पाठिला बांधू
माहेरा घेऊन जाई.

सकाळी पाऱ्याला शानू ग काला काडी

दळानू दळीते मदान राती

आग दळान दळीते तांदळाच

माझ्या वटीतू दीर साडीच ग तांदूळू

तांदूळ घेते वटीयातू ग

जाते माझ्या माहेर घरासू

दळान दळीते तांदळाच

दळान दळीते बारीक गनू

आग मी जाईते माहेर घरासू

माझ्या वटीत ग

आग मी काडीते शानू काल

माय उगव्याच्या देवळातू

बा विठूबाच्या देवळाला

सकाळी पाऱ्याला शानू काल ग काडी

मी जाते माझ्या माहेर घरासू

दळान दळीते तांदळाच

मी जाते माझ्या मागल्या कुळागरा तू

माझ्या हिपरु गावात

माझ्या माहेरासू मी जाते

आई बापाच्या भेटीसाठी

दळान दळीते तांदळाच

मी जाते माझ्या माहेर घरासू

माझ्या बंधू भावाला भेटाया ग

दळीते तांदळाच

मी जाते मा

मी जाते माझ्या हिपुरू गावात.

आग घरदारु लागले मोहरु ग

पित्या बापा मला कितीम दुरु दिले

दळान दळीते माहेर घरातू

दळान दळीते नाचण्याच

पित्या बापा मना कितीम दूरु दिले

आग घरदारु लागं

पित्या बापा मना कितीम दूरु दिले

खडी लागले मुरुमाची

बापा मना कितीम दूरु दिले

येडमाच्या डामराची बोट रुतली

बोट रुतली मारुबलाच्या खडीला

पित्या बापा मना कितीम दूरु दिले

घरदारु गेल दूरु

पित्या खडी लागली

पित्या चालाय येईना ग

पित्या कितीम दूरु ग दूर दिले

घरदारु गेल दूरु देशी

पित्या देशम झेपना

दळान दळीते नाचण्याच

घरदार मला निह्याग

बाप कितम दुरु दिले मना

खडी बुरुमाची

देशातून चालाय व्हयीना

जोडमा बोटाच्या मदी खडी लागली

घरदार गेल दुरुम देशी

पित्या बापा मला देशाम झपना

बापा मी किती दुरु चालू

घरदार चालल तुरुतुरु

घरदार गेल दुरूम देशी.

बंधूराया ग आले मना न्हिया

दलान दळीते नाचण्याच.

दळान दळीत जात्यावरु ग वरु

कुठा मारले कवळया चंदनाचा

दळान दळीते नाचण्याच.

बाहुराय आले ग सकाळी येळ

मी बगीते बाट सांज वेळा

बस म्हनाय विसारले नाही धंद

घरदारु गेले म्हशीकड

मला बोलते बंधूरायाला क्या ग केले.

बंधुरायाला बहिण पाट दिले बसाया

आग शैवनाच ताब्या भरुन दिले पाणी पिया

दही भाताचा केले कालाव

बंधुरायाला दिले खाया.

बधुरायाना म्हणाले आले न्हिया

आग मी जाते माहेर घरासू

आग घरदारू काय बोलूते

त्याला चूळ पुसाया कायीम दिले

त्याला चूळ पुसाया शेदीवल मनू दिल्यात.

काळा ग कुरुडाच ग हे जात | जात दळीते माती वरु

जात रवीले माती वरु.

मी जाते पंढरपुरु | मी जाते पंढरपुरु

माझे वटीतू पिकले क्याळू

आग संग न्हेते लेकरू-बाळू.

आग मी जाते पंढरपुर

संग न्हेत ग भरताला.

माझ्या वटीत पिकले पेरू

मी जाते पंढरपुरु

आग संग न्हेते घरदाराला.

मी जाते पंढरपुरु

आग माझे वटीत पिकले नारीगू

संग न्हेते सखम दिरु.

आग माझे वटीत पिकले पोपयू

संग न्हेते माझी जाऊ.

आग माझे वटीत पिकले आजूळ

संग न्हेते माझी बाजू.

आग माझे वटीत पिकले साळीम

मी जाते पित्या- बापाला घेऊन पंढरपुरु.

आग माझे वटीत पिकले डाळिम

आई- मातेला न्हेते मी संग.

जाते मी पंढरपुरी

दळानू दळीते पंढरपुरु

काळ्या कुरुला नाचण्याच.

विठोबा देवू दळू ग लागले

जना नारी दळी ग तेचे

जना नारी ग दळान दळी

विठोबा देवू दळू ग लागले.

जना नारी धुन ग धुयी पंढरपुरु

विठोबा देवू दळान दळी.

जना नारीला दळू लाग

विठोबा देऊ पंढरपुरु

माघश्री नदीला आलाम पूरु

आग पूर आल्य सारा सगळा भिंजला गोंडा

मी गेले पंढरपुरु.

## लग्न गीत

### मंडोळ्या गुतानाचे गीत

**गीत-१**

नवऱ्या बाळाच्या मंडोळया गुतू हो, मंडोळया गुतू

मंडोळया गुताया आई- बापस येवा हो, आई-बापस येवा

नवऱ्या बाळाच्या मंडोळया गुतू हो, मंडोळया गुतू

मंडोळया गुताया भनी- भावानी येवा हो

सोनीयाच्या सूवा रेशमी धाग हो, रेशमी धाग

मंडोळया गुताया येवाव्या माम्या हो, येवाव्या माम्या

राम कळया कुटी, सीता मंडोळया गुती हो, मंडोळया गुती हो

नवऱ्या बाळाच्या मंडोळया गुतू हो, मंडोळया गुतू

पाच जणीसा जावा हातूसू लावू हो हातूसू लावू

नवऱ्या बाळाच्या मंडोळया गुतू हो, मंडोळया गुतू

वयले डोंगरी फुलले नान्या हो, फुलले नान्या

मंडोळया गुताया येवाव मामा हो, येवाव मामा

सोनीयाच्या सूवा रेशमी धाग हो, रेशमी धाग

राम कळया कुटी, सीता मंडोळया गुती हो, मंडोळया गुती हो

नवऱ्या बाळाच्या मंडोळया गुतू हो, मंडोळया गुतू

मंडोळया गुताया मावसा- मावशासा येवा हो

सोनीयाच्या सूवा रेशमी धाग हो, रेशमी धाग

पाच जणीसा जावा हातूसू लावू हो हातूसू लावू

वयले रानी कळाले हारबार हो, कळाले हारबार

राम कळया कुटी, सीता मंडोळया गुती हो, मंडोळया गुती

### हळद कुटतानाचे गीत

**गीत – १**

नवऱ्या बाळाची हाळदायी घाटू हो हाळदायी घाटू

हाळदायी घाटाया गावाच मान्य हे गावाच मान्य हे

नवऱ्या बाळाची हाळदायी घाटू ही हाळदायी घाटू

हाळदायी घाटाय मेघूसू गरजल हे मेघूसू गरजला

गराजल मेघू गडगडळ आभाळ गडगडळ अभाळ

गडगडळ आभाळ तडतडले इज हो तडतडले इज.

मेघूराया पाऊस पड ह्यो पाऊसू पड ह्यो

मेघूराया दाराशा सोडूया धाराशा सोडूया

धाराया सोडूनू पाऊसू पडी ह्यो पाऊसू पडी ह्यो

पाऊसू पड वळीव पाऊस वळीव पाऊस

मेघूराय हे रतल वळीव पाऊस वळीव पाऊस

नवऱ्या बाळाच्या हळदायी रवील्या हळदायी रवील्या

हळदाया रवाया आईस – बापू हे आईस-बापू हे

नवऱ्याच बहिणी शेणीशा पुजीवल्या शेणीशा पुजीवल्या

पूजीवल्या शेणी भाजीली खांदळ भाजीले खांदळ

नवऱ्या बाळाच्या हालदायी कोम्याल्या हलदायी

**गीत – २**

हळदायी रवील्याता मेघावाच्या पाण्यानी मेघवाच्या पाण्यानी

हळदायी रवील्या नवऱ्याचे आईनी नवऱ्याचे आईनी

हळदायी रवाया नवऱ्याचा बापू ह्यो नवऱ्याचा बापू ह्यो.

हळदायी मेघवाच्या पाण्यानी कोम्याल्या मेघवाच्या पाण्यानी कोम्याल्या

एका पानाची हाळद दोन्हू पानाशी आले हो दोन्हू पानाशी आले

दोन्हू पानाशी येऊन तीन पानाशी आले हो तीन पानाशी आले

तीन पान येऊन चार पान आली हो चार पान आली

चार पान येऊन हळद पाच पानाशी आले, पाच पानाशी आली हो

पाच पानाशी येऊन स पानाश्या आल्या हो स पानाश्या आल्या हो

स पानाशी येऊन सात पाना आल्या हो सात पान पान आल्या हो.

दर्याच्या माझ्या बुरुसू वार सुटल बुरुसू वार सुटल

सुटल वार हळदायी पिकल्या हळदायी पिकल्या.

हळदायी खांदाय नवऱ्याचा भाऊ ह्यो भाऊसा ह्यो

हळदायी निवळू कराया नवऱ्याची आई हो नवऱ्याची आई हो

कुंभार घरच ढेर बुरल घर हार हो

सुतार घरच डवल

उसपल्या हाळदी ह्या उसपल्या हाळदी

हळदी ह्या उसपुनू ग्वानूसू भरील

भरल ग्वानूसू भरल्या गोन्या ह्या भरल्या गोन्या ह्या.

**हळद लावतानाची गीते**

**गीत -१**

इसा तीसाची काठी माझी । इसा तीसाची काठी माझी

मधी हळदीची वाटी माझी । मधी हळदीची वाटी माझी

बापा हळद थोडी लावा । बापा हळद थोडी लावा

नवरा जातो ह्यो परगावा | नवरा जातो ह्यो परगावा.

इसा तीसाची काठी माझी | इसा तीसाची काठी माझी

मधी हळदीची वाटी माझी |मधी हळदीची वाटी माझी

आई  हळद थोडी लावा |आई  हळद थोडी लावा

नवरा जातो ह्या परगावा |नवरा जातो ह्या परगावा

इसा तीसाची काठी माझी | इसा तीसाची काठी माझी

मधी हळदीची वाटी माझी |मधी हळदीची वाटी माझी

बहिणी हळद थोडी लावा | बहिणी हळद थोडी लावा

नवरा जातो ह्या परगावा | नवरा जातो ह्या परगावा.

इसा तीसाची काठी माझी । इसा तीसाची काठी माझी

मधी हळदीची वाटी माझी । मधी हळदीची वाटी माझी

भाऊ हळद थोडी लावा । भाऊ हळद थोडी लावा

नवरा जातो ह्यो परगावा | नवरा जातो ह्यो परगावा.

**हळद लावतानाची गीते**

**गीत -२**

तिसा पिसाच गोंड | चवलंग सूतीच्या भाल्या ह्या

नवरीच्या देवाला हाळदायी लावूया ह्या हळदायी लावूया ह्या

आनदि लावू देवाला मग लावू नवऱ्याला मग लावू नवऱ्याला.

तिसा पिसाच गोंड | चवलग सूतीच्या भाल्या ह्या चवलग

नवऱ्या बाळाला तेलशी चडवू हो तेलशी चडवू हो

पाच पावटी चडवू… पाच पावटी उतरुशा | पाच पावटी उतरुशा

नवऱ्या बाळला हळदायी लावू हो | हळदायी लावू हो

हळदायी लावाया मावळा मामा हे | मावळा मामा हे

नवऱ्या बाळला हळदायी लावू हो | हळदायी लावू हो

हळदायी लावाया आईस - बापू हे | आईस बापू  हे

नवऱ्या बाळला हळदायी लावू हो | हळदायी लावू हो

हळदायी लावाया भनस – भाऊ  हे |  भनस- भाऊ हे

नवऱ्याला बाळाला हाळदायी लावू हो । हाळदाची लावू हो

हळदायी लावाया गावाच मान्यस हे | गावाच मान्यास हे

नवऱ्या बाळाला हाळदायी लावू हो । हाळदायी लावू हो

हाळदायी लावाया गावचा सवासीनी हो । गावाच सवासीनी

नवऱ्या बाळाला हाळदायी लावू हो । हळदायी लावू हो

पेरीला मखा हिरवागार ह्यो । हिखागार ह्यो.

आमचा नवरा  न्हान (लहान) म्हणू नका ह्यो । न्हान म्हणू नका.

आमचा नवरा आईचे जोपचा । आईचे जोपचा आणि

**फुगडी गीत**

श्री गणेशा महादेवा काय गवर जाते

माहेरा काय गवर जाते माहेरा

जाते झाल्या जाऊ दे तिला कपळा कुंकू लाऊ दे

तिला कपळा कुंकू लावू दे.

नवरातणी चांदणी ग नवरातणी चांदगी ग

चाल तूची गगनी,

तुझा प्रेमाने, तुझा प्रेमान गुफलेली वेणी ग

ग बाई मला विसरुन गेली ग बाई मला विसरून गेलीस.

पंढरीच्या पांडुरंगा विठूला रे | पंढरीच्या पांडुरंगा विठूला रे

लवकर येरे कंठ माझा दाटला रे | लवकर येरे कंठ माझा दाटला रे

सखू जा घरी देव दळन दळी | सखू जा घरी देव दळन दळी

दळन दळताना आनंद वाटाला रे | दळन दळताना आनंद वाटाला रे.

पाण्याचे वाटव दूधणीच आळ | दूधणीच आळ

दूधणीच्या आळाव पाय कशी देऊ पाय कशी देऊ

मामाच्या लेकीला जाप कशी करू जाप कशी करू

खोबाऱ्याची वाटी फोडून कशी खाऊ फोडून कशी खाऊ

पाण्याचे वाटव दूधणीच आळ | दूधणीच आळ

दूधणीच्या आळाव पाय कशी देऊ पाय कशी देऊ

मामाच्या लेकीला जाप कशी करू जाप कशी करू

खोबाऱ्याची वाटी फोडून कशी खाऊ फोडून कशी

नागाचे फडीला दिवा कसा दाऊ दिवा कसा दाऊ.

नदी वाहते खळखळ, झरा गातो झळझळ

डोंगराचे छाये खाली उभा आहे माझ गाव

नाव लावून काजू मळे काजू देतेन गोड फळ

बत्तीस पानाचा विंडा ठेविला

श्रावण बाळ चालू लागल.

चालत बोलत नदीपाशी आल ||२||

नदीपाशी येऊन त्याने चंदन कापिला

त्या चंदनाची त्याने कावड बनवली

त्या कावडी त्याने आपले आई- बाप बसविले

आई- बाप घेऊन श्रावण काशी निघाला

वाटेत त्यांना तहान लागली.

श्रावण बाळ तळ्याशी गेल

दशरथ राजाने बाण सोडविला

तो बाण श्रावणाच्या छातीत घुसला

आई-बाप म्हणून श्रावणाने प्राण सोडले.

गोठ्यान बसलेली नवरुपी पाडी गे..नवरूपी पाडी.

नवरुपे पाडीचे दुध कोण काडी गे दुध कोण काडी.

नवरुपी पाडीचे धनी दुध काडी गे धनी दुध काडी

खडकच पानी ग डोंगरचा पाला, डोंगरचा पाला

दे दादा दे दादा मरगालू म्हसू मरगालू म्हसू

माझे डोईचा टप्परु गेला टप्परु गेला

नाही बहिणी नाही बहिणी मरगाळू म्हसू । मरगाळू म्हसू

देतो बहिणी देतो बहिणी पवनाच हारु, पवनाच हारु

नको दादा नको दादा पवनाच हारू, पवनाचा हारु.

खडकच पानी ग डोंगरचा पाला, डोंगरचा पाला

"माझे डोईचा टप्परु गेला, टप्परु गेला

दे दादा दे दादा मरगालू म्हसू,मरगालू म्हसू

नाही बहिणी नाही बहिणी मरगालू म्हसू मरगालू म्हसू.

देतो बहिणी देतो बहिणी कानाच कापू, कानाच कापू

नको दादा नको वादा कानाच कापू.

पहारेच्या पारी शंख वाजविला | पहारेच्या पारी शंख वाजविला

शंखाच्या नादाने गोविंद उठला | शंखाच्या नादाने गोविंद उठला

गोविंद उठुनी फुलांशी गेला | उठुनी फुलांशी गेला

फुलांचा विटाळ पाखरांनी | फुलांचा विटाळ

बारीक चुरमूल्याचे झाड गे सखे | बारीक चिरमुल्याचे झाड

व्हरुक आयली म्हका आई गे सखे | व्हरुक आयली म्हका आई

धाडीना म्हणटा म्हका माय गे सखे | धाडीना म्हणटा म्हका माय

उपाशी गेली माझी आई गे सखे | उपशी गेली माझी आई

चिटमीटी पडलो माजो जिव गे सखे | चिटमीटी पडलो माजो जिव

बारीक चुरमूल्याचे झाड गे सखे | बारीक चिरमुल्याचे झाड

व्हरुक आयलो म्हका बाबा गे सखे | व्हरुक आयलो म्हका बाबा

धाडीना म्हणटा म्हका माव गे सखे | धाडीना म्हणटा म्हका माव

उपाशी गेलो माजो बाबा गे सखे | उपशी गेलो माजो बाबा

चिटमीटी पडलो माजो जिव गे सखे | चिटमीटी पडलो माजो जिव.

धनी दुध काडुनी कशावर ठेवी गे | धनी दुध काडुनी कशावर ठेवी गे

धनी दुध काडुनी शिक्यावर ठेवी गे शिक्यावर ठेवी.

चांदणी चंद्र उगवला । चांदणी चंद्र उगवला तुळशीचे गे पेडवरी… पेडवरी.

नवस आज मीच करीन | नवस आज मीच करीन गळ्यातल्या त्या मणण्यासाठी… मणण्यासाठी.

शेवत्या मोगऱ्या तुला काय पाहिजे रे शेवत्या मोगऱ्या (१रांग)

मला पैजण पायजे रे  आबोल्या मोगऱ्या    (२)

पैजण बियजण आणिन पाया तुझा चडविन || काय पाहिजे रे शेवत्या मोगऱ्या  (१)

मला काकण पाहिजे रे  आबोल्या मोगऱ्या  (२)

काकण बिकन घडविण हाथी तुझ्या चडविण || काय पाहिजे रे शेवत्या मोगऱ्या.  (१)

वाड्या वयल्या वडाची कोंथमीरी पान, कोथमीरी पान

दुरूनी दिसती हिरवी रान, हिरवी रान

हिरव्या रानाच पिवळ ठस, पिवळ ठस

गवरायी म्हणते माहेर दिस, माहेर दिस

माहेरू दिस झाल्या येऊन जा ग लेकी येऊन जा ग लेकी

साठ्याची साडी तुला घेऊन जा ग लेकी, घेऊन जा ग लेकी.

आड्यात काय बाई झिगझिगत झिगझिगत

मी ग म्हणते सवरी डोर, सवरी डोर

सवरी ग डोर नव्ह ते नव्ह ते

संगीत गोंड कुणाचं, कुणाचं

भाऊ असलेल्या बहनीच बहनीच.

दही लोनी ग ताब्याच पानी, ताब्याच पानी

ये ये व्हनी न्हायाला, न्हायाला

शाल गोंड न्हीयाला न्हीयाला

शाल गोंड  तेजाच तेजाच

आमच्या ग बंधू राजाच राजाच

राज बंधू खेळत्यात खेळत्यात

माळीव फुल गुत्यात गुत्यात

माळ गेली हटाला हटाला

बहिन दिली भटाला भटाला

बहिणच नाव काय लिंगरी लिंगरी

शिंग वाजत डोंगरी डोंगरी

पवा ग खेळी नगरी नगरी.

ऐ ग ऐ ग विठ्बाई, माझे पंढरीचे आई

पंढरी ग मी जाताना, पंढरी ग मी जाताना

घेईन घेईन मी कुंदळ

खणीन खणीन मी आंगण

माझ्या सावळ्या विठ्ठलाचे.

का ग पोरी वाकना वाकना

कंबार धुकती सांग ना सांग ना

लवंग लसुन मांग ना मांग ना.

ऐ ग ऐ ग विठ्बाई, माझे पंढरीचे आई

पंढरी ग मी जाताना, पंढरी ग मी जाताना

घेईन घेईन मी सारन

झाडीन झाडीन मी आंगण

चिकुली ग बाई, चिकुली

एक चिकुली नासल्ली, एक चिकुल्ली नासल्ली

गंगेला व्हरून पाजली, गंगेला व्हरून पाजली

गंगेला आला लोंडा, गंगेला आला लोंडा

भिजला ग बाईचा गोंडा, भिजला ग बाईचा गोंडा

गोंड्यात हुत रुपय, गोंड्यात हुत रुपय

माझ ग बंधू शीप, माझ ग बंधू शीप

ऐ ग ऐ ग विठ्बाई, माझे पंढरीचे आई

पंढरी ग मी जाताना, पंढरी ग मी जाताना

घेईन घेईन मी फुल

घालिन घालिन माझ्या सावळ्या विठ्ठलाला.

ऐ ग ऐ ग विठ्बाई, माझे पंढरीचे आई

पंढरी ग मी जाताना, पंढरी ग मी जाताना

घेईन घेईन मी फुल

घालिन घालिन माझ्या सावळ्या विठ्ठलाला.

एक फुलला फुलला नागीण, फुलला नागीण कुडा.

जत्रा भरली भरली वडाखाली , जत्रा भरली वडाखाली

अशी लयलायी लयलायी माझी आई, लयलायी माझी आई

आई न्हावुली न्हावुली तळी पाणी, आई न्हावुली तळी पाणी

आई आखुडली आखुडली थंडयीने, आई आखुडली थंडयीने

आई न्हेसली न्हेसली पिंताबरी, आई न्हेसली पिंताबरी

आईन लाविला लाविला चंदन टिळा, आईने लाविला चंदन टिळा

आई बसली बसली मखरात, आई बसली मखरात आईने

शोक शोक माझी आई गे

दुधाची चाय मका जाई गे

बागेन फुल फुलेल्या गुलाबाचे

लहानपणी सुख माझ्या आईचे

लाट ग लाटानी ग बाई, लाट ग लाटानी

पाणी जाऊ दे पाठाणी ग बाई, पाणी जाऊ दे पाठाणी

मोगरीणीच्या देठाने ग बाई, मोगरीणीच्या देठाने

मोगरीणीची मोगरी काडू ग बाई, मोगरीणीची मोगरी काडू

मोगऱ्याचा हार गुतू ग बाई, मोगऱ्याचा हार गुतू

गणपतीची सेवा करू गे बाई , गणपतीची सेवा करू.

माझी नेटेली बाई सीता | माझी नेटेली बाई सीता

सीता गेली ग न्हायला सीता गेली ग न्हायला.

सीतान पहिला साद केला | सीतान पहिला साद केला

साद वाऱ्याच्या नादाने गेला | साद वाऱ्याच्या नादाने गेला.

सीताना दुसरा साद केला | सीताना दुसरा साद केला

साद दर्याच्या लाहराने गेला | साद दर्याच्या लाहराने गेला

सीतान तिसरा साद केला | सीतान तिसरा साद केला

साद बापाच्या कानी गेला | साद बापाच्या कानी गेला

बाप गडबडीत घाबरून आला | बाप गडबडीत घाबरून आला

धुये कसला संकट आला | धुये कसला संकट आला

बापा मिळाला धनुष्य बाण | बापा मिळाला धनुष्य बाण

धुये दवर गे तुळशीच्या पेडार | धुये दवर गे तुळशीच्या पेडार

धुये कर ग नमस्कार | धुये कर ग नमस्कार

तितक्यान धावूनी आला राम | तितक्यान धावूनी आला राम

धुये कर गे नमस्कार | धुये कर गे नमस्कार

रामान घतिली सीतेक माळ | रामान घतिली सीतेक माळ.

एक लिंबीणीचा रोपा ग | एक लिंबीणीचा रोपा ग.

रोपा रोयला बायच्या धडेक गे | रोपा रोयला बायच्या धडेक गे.

आळे धरिले साखरीचे गे | आळे धरिले साखरीचे गे.

लिंबीन शिपीली दुदयानी गे | लिंबीन शिपीली दुदयानी गे.

लिंबिन पालली पानो पानी गे | लिंबिन पालली पानो पानी गे.

लिंबीन फुलली देटान गे | लिंबीन फुलली देटान गे.

लिंबू लागले देटान गे | लिंबू लागले देटान गे.

लिंबू कुठीले सोन्याच्या ताटान गे | लिंबू कुठीले सोन्याच्या ताटान गे.

आळवान कोण गो सूरसूराता सूसूराता

आळवान सूरीट सूरसूरता सूसूरता

पावणो दोरी वळटा वळटा

वळी दोरी मारली बडी

चल गो सगी महिरा.

गाडी चालली घुगराची | गाडी चालली घुगराची

ही वाट बायी डोंगराची

गाडीत बसले मी पहिल्यादा आज | गाडीत बसले मी पहिल्यादा आज

माहेर आहे कोकणात माझ

आई- बाप माझा ग दर्याचा राजा, दर्याचा राजा

इकुडले स्वारीला परवायाच नाही

गाडी चालली घुगराची ही वाट बायी डोंगराची.

साडी नेसले झरीची पटकन घसरायची

गाडी चालली घुगराची ही वाट बायी डोंगराची.

चुलीकडल्या बिलूबाय

कितले तांदुळ घालू गो?

घाल घाल वयऱ्याचे

पावणे येयल्या परियाचे

चूलीर तांदुळ रहमटटा

बाहिर पावणे बडबडटा

चुलीर तांदुळ शिजले

बाहिर पावणे न्हिदले

नाना तू शणबापा रे | नाना तु शणबापा

लेक देऊ नये रे धाकुलपणा रे , लेक देऊ नये धाकुलपणा

बापा वेदना सरली रे , बापा वेदना सरली

बापा वांगड कोणाचा रे, बापा वांगड कोणाचा

धुये गळ्यातल्या पिडुकाचा, धुये गळ्यातल्या पिडुकाचा

बापा वांगड पावना, बापा वांगड पावना

कृष्णा घालितो लोळण, कृष्णा घालितो लोळण

यशोधा आली ती धावुनी, यशोधा आली ती धावुनी

आता काय मागशील माग रे बाळा, देते मी आणून, देते मी आणून

आई मला सूर्य दे धरून, आई मला सूर्य दे धरून

त्याचा मला चेंडू दे करून, त्याचा मला चेंडू दे करून

असल र कसल मांगन बाळा जगाच्या वेगळ जगाच्या वेगळ.

जाय जाय फुलली जाय

(मुलाच नाव) तुझ्या किशान काय?

( मुलाच नाव) च्या किशान ( मुलीच नाव) बाय

(मुलाच नाव) वाजय रे पेपेरे

( मुलीच नाव) झाले रे म्हातारे.

तांबडा तुवालो, पांढरा तुवालो

पळसकाट्या कसो पावलो, पळसकाट्या कसो पावलो

पळसकाट्याचे चेडे दिसताले बरे

चेडवांचेर लाईन मारता हा हा.. चेडवांचेर लाईन मारता.

फुडल्या दारान तुळस फाटल्या दारान फणस

ऐदेशे अनुशका केदे व्हडले झाले

ते सांगता आपल्या आई क आपले लग्न कर कर.

दारातले तुळसी गे | दारातले तुळाशी गे

पानपान फुलसे | पानपान फुलसे

कपळातल्या कुंकवासाठी किती लोक वनवासी ग.

ढोलके वाजता  ढुलारा ढुलारा

ढोलके साजून कोण गेला?

ढोलके साजून माव गेला माव गेला

मावान तुका किदे किदे हाडला?

मावान मका रिंगा जोडी रिंगा जोडी

रिंगा जोडी हाव घालचे ना

मावा वांगडा हाव वयचे ना.

ढोलके वाजता  ढुलारा ढुलारा

ढोलके साजून कोण गेला?

ढोलके साजून घो गेला घो गेला

घोवान तुका किदे किदे हाडला?

घोवान मका खोबऱ्या वाटी खोबऱ्या वाटी

खोबऱ्या वाटी हाव कुरुकुरु खाता

घोवा वांगडा हाव तुरुतुरु वयता.

नवा चिबडंगीचा वेल ग

लांब रुद गेला ग

___ माझा भाऊ गो

चिबडा हाडूक गेला

घराकडल्यान हाडल्या पिकना

बाजरान व्हेल्यार खपना

हाथीन पाच पैश मेळना

सांग्याचे चेडू तेका मेळना.

तुझ्या नावाची दासी रे दत्ता

विनंती ऐकावी रे दत्ता विनंती ऐकावी

तुझ्या नावाचा मणी रे दत्ता गळयान घातिला रे

६) कोंरडे व्हाळत वाघ ओराडतो.

उत्तर – जातं

७) काळी गाय काटे खाय. देऊळ बघून उभी राह्य

उत्तर – चप्पल

८) आळटून पालटून बांधलो भारो. माझे हुमाण सांगता तेका कटीबर सरो.

उत्तर- आंबडो.

९) बत्तीस चिऱ्यामध्ये नागीण डुले.

उत्तर - दात आणि जीभ.

१०) दहाने धबकले पाचाने परतले.

उत्तर – भाकरी

११) साणचे नेसता सकाळचे सोडटा.

उत्तर – बेड ( gate)

१२) तिघ भाऊ एकाच घरात राहत्यात. पण एकमेंकाला कधीच मेळत नाहीत.

उत्तर - पंखा.

१३) भाजलेला बांगडा झाडाव चडला.

उत्तर – इळा ( कोयता)

१४) काळी काठी, त्याल लाटी बाकती म्हून मोडना.

उत्तर- केस.

१५) साठ वर्सानी फुल फुलत तेच नाव कै?

उत्तर – कोंब.

१३) झाडावर कोयतेच कोयते.

उत्तर- चिंचा

१४) फिर फिर फिरत पशा येवडया जाग्या व येऊन बसत.

उत्तर – काठी.

२०) सर सराटा, उपर काटा. फुगली मेंडी, घ्यातला वाटा.

उत्तर- फणस.

१) साठ वर्सानी फुल फुलत तेच नाव कै?

उत्तर – कोंब.

२) चारे भोरेचा पाला, माझ्या बकूनी खाला.

उत्तर- खुरपे

३) ये म्हटल्याव येईना, जा म्हटल्याव जाईना वाघ का खाईना.

उत्तर- बुजगावने ( शेतामध्ये लावले जाते)

४) जिऱ्या येवड हुत मिऱ्या येवड झाल फडकल कान धरल वयल रान.

उत्तर- धूर.

५) दोघ भाऊ शेजारी, भेट नाही संवसारी.

उत्तर- चंद्र आणि सूर्य किंवा दोन दोळे.

१३) घाटावनी बकी आली, तिच्या मानत दिली बुकी, तिच्या घर बर लेकी.

उत्तर- फणस.

१४) सात तऱ्हची पाखर योक रंग घेवून आली.

उत्तरे- लाकूड.

१५) येवड्या राष्ट्रात चार जुनुस नाहीत.

उत्तर- जिभेला हाड नाही.

तळ हाताला क्योस (केस ) नाही.

कोंबडीला थान नाही.

घोड्याला शिंग नाही.

१६) फुगली मेंडी लागली वाटत.

उत्तर- आंबड

१७) घडावनी घड पडला, पाचजण धावला, दोघांनी वडला.

उत्तर - नाक, हात, हाताची पाच बोटे.

१८) हजाराचा पाळणा, शंभराचा दोर
सून गेली माहेरा, हालविन कोण ?

उत्तर - होड

१९) शाईवर शाई तिन दागिन दुनियेत नाही.

उत्तर- घोड्याला शिंग नाही, कोंबडीला थान नाही, तळ हाताला केस नाही.

**उखाणे –( नाव घेणे)**

१२) चमचम चगात
मी हुते मनात
खन चोळी अंगात
गुलार  भांगात
लवंग मुठीत
जायफळ वटीत
(नाव) जोड सुपारी वाटीत.

१३) माझ्या दारात हुती तुळस
तिला घाली कुडचा कुडचा पानी
आदि हुती आई- बा ची तान्ही
आता झाले (नाव) गवड्याची रानी.

१४) ग्लासार ग्लास
सात पाच ग्लास
मधल्या ग्लासात गरम मसाला
लग्ना अगोदर नाव कशाला.

१५) झाड झमराच, फुल हुमऱ्याच
लेक मराठ्याची सून सम्रताची
अस्तुरी (नाव) गावड्याची.

१६) अवटंग चुन्ना, नवटंग चुन्ना
शेरभर सुपाऱ्या, बत्तीस पान
गळ्यात हार वाकू कशी ?
पायात पैंजण चालू कशी ?
सदरव बसून बोली कशी ?
नदार पुरुषाची, अस्तुरी (नाव) गावड्याची.

१७) खन खन खुदळी,  मन मन माती
उभ्यारल्या भेती, चित्यारले घाम घाम
घाम कशाच ?  घाम केळीच
उडी वाघाची, फडी नागची
भन ( बहिण) भावाची, लेक ( बापाचे नाव) ची
धुवडी ( नाव), अस्तुरी ( पत्तीचे नाव) गावड्याची.

१८) बाड बाड भिशात
( नाव) माझ्या किशात.

१९) भाताच्या खळयाव नासण्याचा कोंडा
(नाव ) पाठीत रेशमाचा गोंडा.

२०) मी निजलो हुतो मळयात, सपान पडल तळयात
चाट करून टिकली ल्यावली (पत्तनी चे नाव) तिच नाव.

१) आत्यावर व्याडली पत्रावळी
पत्र्याव व्याडला भात
भाताव व्याडल तूप
तूप सार रुप
रुपा सारा जोडा
चंद्र भागाला येडा
पायात पैंजण चालू कशी ?
गाळ्यात हार वाकू कशी ?
सदरव बसून बोलू कशी ?
सदार सोन्याची, नदार पुरुषाची
अस्तुरी (नाव) गावड्याची.

२) उभा हुतो खळयात
नदर गेली मळयात
हजाराचा हार
(नाव) गळयात.

३) चिन्न चिन्ना चिन्नात
उभी हुते मेन्यात
खन चोळी आंगात
गुलार भांगात
जायफळ वाटीत
लवंग मुठीत
( नाव) बसत दाटीत
मी गेले पान सुपारी वाटीत.

४) शीडी वर शीडी कुंकवाची पुडी
आदि ह हुती आई -बा  तान्ही
आता झाले ___ ची रानी.

५) म्हशीत म्हस टिकी
पिंजरीच मोती (पत्तनीचे नाव) नाखी.

६) जन्म दिला मातेने
पालन केले पित्याने
( पत्तीचे नाव) घेते पत्तनी या नात्याने.

७) इंग्रजीत चंद्रला म्हणतात मून
____ रावाचे नाव घेते मी ____ ची सून.

८) महादेवाच्या पिंडीवर बेलाचे पान
_____ रावाचे नाव घेते राखून सर्वाचा मान.

९) आलीकडे गंगा पलिकडे गंगा
मध्ये टाकला दोर
____ राव थोर त्यांच्या हाती खेळे मोर.

**म्हणी**

१) आंगाव आलेल शिंगाव घेणे.

२) कशात काय फाटक्यात पाय.

३) कुत्र्याची शेपटी वाकडी ती वाकडीच.

४) आयत्याव कोयता

५) कुंड्याव शिजत

६) शेंदरी बघून पाय पसरा

७) मेलेले म्हशीला शेरभर दूध

८) कुनाच्या म्हशी कोण क्याडत्यो उठाभशी.

९) घरात उंदीर शेपटी बडीवत्यात

१०) भय हा पूण अक्कल नाही.

११) हाताची पाचीव बोट सारखी नसत्यात.

**१२)** एका हाताने टाळी वाजत नाही

**वाक्यप्रचार**

१) आभाळ कोंसाळाला

२) म्हाल म्हातारा धनगोर

३) मिश्या फुटल्या

४) बुद्धवत्त

५) बाता मारणे

६) चण्याच्या झाडाव चडविणे

७) झेत म्यारतो

८) कानाला खडा लावणे

९) दात पाडणे

१०) नंदीबैल

११) माश्या मारणे

१२) लाखपती

१३) पोट पाठ एक करण

१४) थोबाड रगविण

१५) जीवाचे रान करणे

१६) कपाळ फुटक

१७) दात खाणे

१८) वाकडं पाऊल

१९) हातपाय हलविणे

## शिमग्याची जती



१- जत

आवळी कुटु काय चवळी कुटु हो ||२||
दादानी आवळी कुट्याळी हो | माझ्यानी चवळी कुटु नजो
माझ्य ग वटीत फ्योल ग | पन्याळ गावचा योल ग
पन्याळ गावच्या म्हावऱ्या म्हशी
म्हावऱ्या मशीच कोल्हापूर वाड हो
वाडकी फोडून म्हशी न्हेल्या चोरट्यानी हो म्हशी न्हेल्या
म्हशीच्या धनयानी धावनाशी केला ||२||
धाऊन - धुऊन पेडच्या कुलपा
दोन्ही पेडची कुलप काडी हो ||२||
हातात लगठी नागडाशी गेला हो
पाठीत दहीबा उपाशी गेला
भरलेल्या नहीतल्यानी तान्हशी गेला
सुकेले नहीत जाऊन संतोशी झाला
जीत्येल्या सर्पार पाय देऊन गेला
मेलेल्या सर्पान डकीनात केला
तिथूनी उकलून जिवतवाडी न्हेला हो
जिवनच्या लोकांनी काय सहन केल हो ||२||
अर्ध राज्य त्याला मोकाशी दिला हो ||२||

पांडव निघाल वनवाशी हो ||२||

चालत बोलत किती रात्र झाली हो ||२||

चालत बोलत मधरात्री झाली हो ||२||

रात्रीच आश्राराम कुठसा करू हो ||२||

आशी- पाशी बगल्या घोडक्या चिंचा हो

घोडके चिंचपाशी आश्राराम करू हो

कराड काडून हाथरून केल हो

जांबे धोडीच उस दिल हो ||२||

ताडमाड मोडून परला भाजाल

पल्हाच्या उजवाडी आल जती

पाच्यानी पाच पार वाटून दिल हो

पयल्यान पारा कोन देव राखी हो

पयल्यानी पारा महादेव राखी दो

महादेव राखी काय सहदेव राखी

सहदेवाचा महादेवाचा पारा नदयेच्या गरा

दुसऱ्यानी पारा कोन देव राखी हो

दुसऱ्यानी पारा सहदेव राखी

सहदेवाचा पारा बंदुकचे भरा

तिसऱ्यानी पारा कोन देव राखी हो

तिसऱ्यानी पारा अर्जून राखी हो

अर्जूनाचा पारा पुस्तकाच्या भरी

१ – जत

आटकुळी थोराण रतान गिरी हो | आटकुळी थोराण रतान गिरी
कोंद्याव सार रतानी पवो | कोंद्याव सार रतानी
जानाय सार रतानी पव | जानाय सार रतानी पव
अशी अशी जानाबाई मानाची हो | अशी अशी जानाबाई मानाची हो
इडाबा घेती पानाचा हो
खडाबा घेती धूपाचा
तुराबा ठेवती मोत्याचा हो
येडाबा घेती सुताचा.

आटकुळी थोराण रतान गिरी हो | आटकुळी थोराण रतान गिरी
कोंद्याव सार रतानी पवो | कोंद्याव सार रतानी पवो
नवलाई सार रतानी पव | नवलाई सार रतानी पव
अशी अशी नवलाबाई मानाची हो | अशी अशी नवलाबाई मानाची हो
इडाबा घेती पानाचा हो
खडाबा घेती धूपाचा
तुराबा ठेवती मोत्याचा हो
येडाबा घेती सुताचा.

आटकुळी थोराण रतान गिरी हो | आटकुळी थोराण रतान गिरी
कोंद्याव सार रतानी पवो | कोंद्याव सार रतानी पवो
धाडोबा सार रतानी पव | धाडोबा सार रतानी पव
असा असा धाडोबा मानाचा हो | असा असा धाडोबा मानाचा हो
इडाबा घेतो पानाचा हो
खडाबा घेतो धूपाचा
तुराबा ठेवतो मोत्याचा हो
येडाबा घेतो सुताचा.

हातात तासनी खांधावर कोळासनी
लोहार दादा वयले रानी हो ||२||
हिंडून- फिरून दराखण झाला हो
आपचीत चंदन थायी पडला हो
अवगा दिस तिथ गडी धरी हो
माळ तेशी तेला वाटून घातिला
माळ तशी गडी धरी हो

चक्र पूकर गणेशा राणी ख्योळ केला हो ॥२ ॥

तिकडचा राजा खेळाय लागला हो

क्रिशनाच्या शी नगरी ख्योळ लागला हो

हातात फळी घेऊन ख्योळ लागला

हातातली फळी गुजांवन चवरण

खेळर खेळ गड्या नानाच्या कान्हा

आजग बुजग बामन बुरम
गवळन बाई ताक चाळी
बुज हालून लोणी काडी
आलगी दोरा तलगी दोरा
बैल घेतला चादर मोरा
भात भरल सव्वा खांडी
दिनकराच्या पडल्या झुंडी
पत्ति पळाल म्होरले खिंडिन
हत्ती पळाल म्यागले खिंडिनी.

माहेरी वाटी हारेक दाट
सासरे वाटी कुचूकुचू काटे
हित कुठे राहू दर्याचे देगे
चिकन सुपारी फोडून खाऊ
दिवाळीच्या सणाला परतून येऊ.

आपडी दपडी खाऊचे पान
घाल गो बेबी मुजे राम
आफू जिदा फू तेरी मेरी फू.

चांदोबा चांदोबा भागलास का?
लिंबवीणीच्या झाडामागे लपलास का?
लिंबवीणीचे झाड करवंदी
मामाचा वाडा चिरेबंदी.
मामाच्या वाडी येऊन जा
तूप रोटी खाऊन जा
तूपात पडली माशी
चांदोबा राहिला उपाशी.

अटक मटक चवळी चटक
चवळी झाली गोड गोड
जीभेला आला फोड फोड
जीभेचा फोड फुटेन
डॉक्टर मामा उठेना
जीभेचा फोड फुटला
डॉक्टर मामा उठला
जीभेचा फोड फुटला.

काळू काका किरकिर क किरकिरल
कावळा कर्रकर्रला
काळू काका मी जाते घरा
जा ग जा ग लेकी घरा
पाच पावल पावाय येयाचो हुतो
शेळ्या गेल्या रानात
व्हाना सरसरल्या
दाही कडची तास भरली
जा लेकी घरा.

# लोककथाचे संकलन

## १. गवळी आनी धनगर

खूप वर्सा पयलीची गोष्ट. गवळ्याची खूप घर होती. गवळ्याचा म्हशी, धन, दौलत, गुर, बकरी भरपूर होती. एक गवळी हुता. त्याच दोन्ह पोरग हुत. धाकटा आणि मोठा. त्या गवळ्याचा सगळा कुटुंब हुता. पयली गुर चारणीला घेऊन जाईत. गुर चारणीला न्हियाची झाली. पयली डोंगरात जायाच जागा बघाचा, पाणी बगाचा, निवळ कराच. तिघ गेले गवळी आणि दोघ ल्याक तिथं निवळ केलं. उखाड ( झोपडी) ब्याधल आणि घरात आलं. नक्षत्र बघलं गुर कव्हा न्हियाची. आमक्या दिसा दिशी गुर न्हायाची ठरली.

दिस आलं गुर न्हियाचा. मग ती गुर, म्हशी, शेळ्या, गायी घेतली सगळ्या न्हेल्या. एक मोडक तोडक हुत ते तिथ राहिल. त्या डोंगरात न्हेल्या. बा पावून आला. धाकटा ल्योक तिथ राहिला. धाकटा भाऊ राहिला डोंगरात आपली बायको- पोर, गुर, म्हशी, बकरी घेऊन. जवळ तिथ बाजार हुता तिथ दूध विकून त्यो आपल पोट चालवितो. पयली तितक्या दिसाच सामान न्हेऊन ठेवल्याल आसत.

तेला एक दिस शेळ्यात बकर दिसल. ते बकर खायाची त्याला इच्छा निर्माण झाली. हेरची गवळी शुद्ध शाखाहारी. गवळी लिंगगायीत ( pure veg) पूण तेला बकर खायाची इच्छा झाली. तेन्नी विसरायचा खूप खूप प्रयत्न केला. पूण त्याला न्हिज पडना. मग र्याचा उठला बकर घेतल. बकर म्यारल, निवळ केल. त्या पोरग्याचा बा घरात बसले आणि तो गाताडीव बसून धाकटा ल्योक के करतो त्या परागती बघतो. गवळ्याकड दैवी शक्ती हुती. तेला सगळ दिसत तिथ बसून झाल त्या पोरग्यानी मटाण केल खाल्ल. गवळ्यानी ते सगळ तिथ बसून बघल.

दुसरा दिस उजाडला. गवळ्यानी थोरल्या पोरग्याला उठविला सगळ्या परागती के हा त्या सांगल्या. अस अस झाल्य. कुठ बकर क्यापल, कच्च्या इळ्यानी क्यापल, कुठ प्या पुरल, कुठ चमड पुरल, कोथळा कुठ पुरला सगळं बा नी थोरल्या लेकाला सांगल. फटीग बोलन नव्ह त्यो. थोरला ल्योक गेला. बा नी सांगल आनी याक तू तेच्या घरात गेल्याव पाणी पियाच नाही. भायीर उभा रहा.

थोरला पोरगा गेला. सकाळच्या तिनाला गेला त्यो नव्वाला पावला. बगल सगळ सारक हा. शेळ्यात लक्ष घ्यातल. बघत्यत शेळ्या कमी कशा दिसत्याता. त्यो विचारतो पांढरे शेळीच पांढर बकर क्ये झाल. धाकट्याची मोखळ बसली. तवा थोरला बोलला की आवाज प्येक न्ही. त्याला कडकडा भरला. कोयता बगला, वास कसला के विचारल. आनी सांगल दिस मावळाचे पयली घरात पावाय व्हयी. बकरी चराय न्हेली मग परतली आनी घरात नव्वाला पावला. बा म्हणला तिथच उभा रा पोरगी बायको झाडा बुडी आणि तेला

तिथच पेडत उभा केला. म्हनाय लागला तू बाटला. म्हनाय लागला माझ घर भरुन दार वत्ये. म्हणजे धन, भांगर, चांदी, तांब्या हा. तुला के होई ते याकूच. माग. याकूच तुला होई ते देतो.

त्यो रात्रभर तिथच उभा राहतो. सकाळच्या च्याराला मागतो. एका पायाव र्यातभर उभा राहिला. काठी हातात, डोईत पागोडा, खांधाव घोमंड. सकाळी याकूच मागतो. भांगर, गुर, चांदी कायीच मागल नाही. त्यांनी याक अशी गोष्ट मागली जी मागल्याव गवळ्याची शेळ्या, म्हशी, गुर सगळ त्या पोरग्याक गेल. सगळ ३३ कोठी देव त्याच्या मागनी गेल. गवळ्याकड फक्त मोडक तोडक उरल. गवळ्याकड दैव उरला? मग धनगराच्या पाठीव ३३ कोठी देव गेला. गवळ्याकड काय उरल ? गवळ्यापासून धनगर झाला.

## २. एक हुती म्हातारी

एक हुती म्हातारी आणि तिचा योक हुता पोरगा. दोघ बरी रहिती. थोड्या दिसानी पोरग्याच लगीन झालं. बायकोला आपले सासो संग राह्या नको हुत. एक दिस बायकोनी आपल्या धनगाराला सांगल तुझे आईला मारून ट्याक नाही झाल्या मी घर सोडून जाईन. पोरगा भिला बायको सोडून जाईन म्हणून. एक दिस आईला बर खाया दिल आणि त्या जेवणात न्हीजच वखाद घ्यातल. म्हतारी पोटाभर जेवली.

थोड्या वेळानी म्हातरी न्हिदली. पोरग्यानी आईला पोतीत भरली आणि जाळाय रानात घेऊन गेला. लाकड क्याडली म्हातारीला घ्यातली वयनी लाकड घ्यातली. फस्क माराय जातो तर फस्क नाही. फस्क आनाय घरात गेला. थोड्या वेळानी म्हतारी जागी झाली. लाकडी क्याडली आणि हुती तशी परत लाकड करून ठेवली. तिथ याक झाड हुत त्या झाडाव जाऊन बसली. पोरगा आला फस्क घेऊन. लाकड जाळली आनी गेला घरात.

त्यादिशी म्हातारी झाडव रात्री न्हिदली. रात्री चोर आल भांगर, पैस चोरून घेऊन. पैस मेजाय त्या झाड्याच्या बुडी बसल. म्हतारी वर सुसंत न्हिदल्याली घोराय लागली. चोर भिल त्यांना वाटल भूत आल भिऊन पैस आणि भांगर टाकून चोर पळून गेल.

सकाळी म्हतारी झाडावनी खाल उतारली. सगळ भांगार आणि पैस जमा केल आनी घरात घेऊन आली. सून आणि पोरगा बघितूच राहिली. भांगर आणि पैस बघून म्हतारीला विचाराय लागली हे सगळ कुठणी आणल. तिन सांगल आपल्याला जाळल तिथ घावल. मग बायकोनी सांगल आपल्या धनगाराला आपल्याला भी ज्याळ आपल्या भांगर घावन. तिला जाळतो तिचा धनगोर पूण ती मागारी येईत नाही. धनगोर सदीना जाळले तिथ जाऊन सांगतो मेळल तेवड घेऊन ये नाही झाल्या तशीच ये. बायको काय येईत नाही.

## ३ बायको आनी कुत्री

एक हुती बायको. ती गुरुवार हुती आणि त्यांची एक कुत्री होती ती भी गुरुवार हुती. बायको म्हणती आपल्याला मुस्काच्या शेंगा खाऊच्या झाल्यात कुणी आणून दिल्यासत्या तर खूप बरं झालं असतं. ती कुत्री ते आयीकती आणि कुत्री धावत जाती खूप लांब जाऊन ती मुस्कानच्या शेंगांचा भारा बांधून पाठिव मारून घेऊन येते आपुन गुरुवार असताना घेऊन येती आणि ते बायकोला देती. ती बायको शेंगांचं बरं सुख करती आणि एकटीच खाती. कुत्री तिच्या तोंडाकडे बगीत बसती पुण ती बायको कुत्रीला घालीत नाही. कुत्रीला खायाची चव येती. ती कुत्री देवाला म्हणती आपण इतक आणून दिलं आपल्याला एवडस सुध्दा तिनी घ्यातल नाही तवा बायकोच्या पोटात हा ते माझ्या पोटात जाऊनीय आणि माझ्या पोटात हा ते बायकोच्या पोटात जाऊनी.

थोड्या दिवसांनी दोघीव सुटत्याता. बायकोला कुत्र्याची पेटक होत्यात आनी कुत्रीला दोन सुंदर पोरी होत्याता. बायको पेटक टाकून देती. कुत्री आपल्या पोरीना घेऊन एक सुकलेले बावीच्या ( विहिर) आत ठेवती. आपल्या पोरीना कुठलं कुठलं के आनून खाया घालून मोठी करती. त्या पोरी मोठ्या होऊन खूप बऱ्या दिसत्याता. एक दिस त्या पोरी बावीच्या बाहिर येऊन वर खेळट्याता. ते दिस दोन राजकुमार शिकारीला रानात येतात. तेन्ना त्या पोरीचा खेळट्याला आवाज येतो. ते तिथ येऊन बगत्याता. त्या पोरी तेन्ना खूप आवडत्याता. ते राजकुमार लगीन कराय त्या पोरींचा हात कुत्रीकड मागत्यात. कुत्री दोगीव लेकींनच लगीन करून देती.

त्या लेकी खूप मज्जेत राहत्याता लगीन करून. एक दिसती कुत्री आपल्या लेकींचींत जाती. थोरली लेकीसत पयली जाती. थोरली आईला कुत्री म्हणती आनी जमनीव बशीवती. पाड ताटात पेज दिती आणि धाडावून घ्यालती. कुत्री भापडी रडत बारके लेकीस्त जाती. धाकटी लेक आई बगून यांग म्यारती. आई आली म्हणून बर जेवन करती. आईला आंघुळ कराय पानी देती. बसाय पाट देती. बर जेवान व्याडती. आई जाताना भेटून रडती. थोड दिस जात्यात धाकटी लेक आईचीत येती. कुत्री बर खाया करून घ्यालती. धाकटे लेकीला घरा जाताना खूप भांगार देती. हे सगळ थोरले लेकीला कळट. आई आपल्याला भी भांगर देईन म्हनून आईस्त येया येती वाटत तिला साप चावतो आनी तिथच ती मरती.

## ४. म्हतारी आणि ल्योक

एक हुती म्हातारी. तिचा योक ल्योक भायीर गेल्याला आसतो . त्या पोरग्याची बायको घरात आसती. पोरगा जाताना घरात सगळं ठेवून गेल्याला आसतो. बायकोला सांगून जातो आईला आपले सगळं बर खाया करून घ्याल. आईला कसल काम कराय लावू नको. आईला सुखात ठेव. पोरगा गेल्याव तेची बायको आईला सगळं काम ल्यावती. आपून घरात राणी कशी बसून राहती. जेवाय म्हतारीला एकाच टाइमाला देती. खूप त्रास करती.

खूप दिसानी पोरगा घरात येतो. बगतो तर बायको घरात नाही. आई सगळ काम करते. आई सामकी बारीक झाली हुती. आईला विचारतो काम का करत्य के. आई सांगती सगळ सून करती ते. थोड्या वेळानी बायको जग भऊन येती. धनगराला बगून नाटक कराय लागती. आपून घरातली सगळी काम करती म्हणून सांगती. तसा धनगोर म्हनतो-

**जेवण- बिवण कर मगे नारी. सांगता तुका कुम कुम काणी.**

**भाकरी- बिकरी भाज मगे नारी. सांगता तुका कुम कुम काणी.**

**उदक- बिदक भर मगे नारी. सांगता तुका कुम कुम काणी.**

**झाडू- बिडू मार मगे नारी. सांगता तुका कुम कुम काणी.**

**नवीन साडी- बिडी न्हेस मगे नारी. सांगता तुका कुम कुम काणी.**

**भांगान- भिंगान कुंकू घाल मगे नारी. सांगता तुका कुम कुम काणी.**

**फुलाचो झेलो- बिलो माळ मगे नारी. सांगता तुका कुम कुम काणी.**

**हातान बांगडो - बिंगडी चडय मगे नारी. सांगता तुका कुम कुम काणी.**

**ठोणको- बिणको हाड मगे नारी. सांगता तुका कुम कुम काणी.**

धनगोर सांगतो ते सगळं करती. लास्ट ठोणका आनती. त्योच ठोणका तिचे मानत घालून तिला मारून ट्याकतो.

## ५. वनगायीची गोष्ट

एक दिस सगळी पोरगी जांभळ खाया. सगळ्याच्यानी जांभळ आनी उतरून घरात गेली. योक पोरगा झाडाव उरला. तेला खाल उतराय कळना. खूप दिस त्यो पोरगा भूखाचा तानचा झाडाव उरला. मग खूप बारीक होऊन खाल उतारला. तिथ खाल योक घोटा हुता. त्या घोट्यात गेला आनी सगळ शान क्याडल, घोटा सगळा ल्योटला, निवळ केला आनी परत जाऊन झाडाव बसला. श्यानच्या सगळ्या गयी आल्या. घोटा बगते झाल्या निवळ हा. गयी म्हनाय लागल्या कुणी केला आमचो ह्यो घोटा इतका निवळ. घोटा निवळ केला त्यो मेळला असता तर तेला आमी दुध दिल आसत, दही दिल आसत, धूप पव दिला आसता, सूप पव दिला आसता.

सकाळी ग्या एक राहिली. रहिली, राहिली तर त्यो उतराना. ते ग्याला अशी लागली. मग गेली पानी पिया. तसा पोरगा उतारला घोटा निवल केला आनि परत जावून झाडव बसला. गयीच्यानी विचारल राहिलेले ग्याला तर तिनी सांगल आपुन पानी पिया गेले तवा निवळ करून गेल कोन ते.

दुसरे दिशी एक पाडी राहिली. पोरगा येईना खाल. मग तिला लिप होईना तशी गेली पानी पिया. परत तवा पोरगा उतरला आनी सगळा घोटा निवळ केला आनी वर जाऊन बसला. तिसरे दिस तान्हशिवाय राहिली मग घावला तेन्ना. तेच्यानी तेला दूध दिल, दही दिल. सूपपवा आनि धूपपवा दिला आनी सांगल तुला कोन न्हिया आल के वाजीव.

एक दिस मग एक म्हातारी शिरपूट न्हिया तिथ आली. पोरग्याला बगल आनी सांगल बाबा मना यायीस उकलाय येर. नाही म्हनाला पोरगा. शाण्या यायीस उकल आनी जा. मग उतरला. तवा म्हातारीनी घ्यातला साकात ब्याधली पोटली ती म्यारली पाठीव. वाटत म्हातारीला मुताय झाल. पोटली खाल ठेवली आनी गेली. पोरगा हाळूस भायीर सरला साकात सूरीट, काटक, काट भरल आनी ब्याधला मूडगा. पोरगा पळाला. म्हातारी आली पोटली उचली आनी खांधाव घेऊन चालाय लागली. वाटत तिला काटक टोपाय लागली तवा म्हतारी म्हनाय लागली “राव राव मना चिमट क्याडतो. तुजी बरीच कडी करून खाईन.” घरात आली आनी लेकीला सांगल कडी करून ठेव. दात पाजवाय जाते. लेकीन साक उगडला तर सूरीट बी तिच्या घागऱ्यात भरल. आईला शिव्या दिल्या. म्हतारी आली म्हनाय लागली “ पळून गेला. राव तुजी बरीच कडी करते.”

दुसरे दिशी परत गेली. पोरगा जांभळ खाईता. सांगाय लागली “बाबा बाबा मना क्याक जांभळ दे.” पोरगा उडिवतो. मूतात पडल म्हनती. दुसर उडिवतो शेनात पडल म्हनती. खाल येऊन दे सांगती. पोरगा सांगतो मी नाही तू मना क्याल न्हेलत तशी नन्हेशीन. म्हातारी म्हनती “नाही नाही बाबा ती मी नव्ह. ती कुठली म्हतारी ती कुनास ठाव.” पोरगा येतो खाल. तशी परत घ्यालती साकात आनी घेऊन जाती. पोरीला सांगती बर मटन कर. आपून दात पाजवून येते. प्योर साक उगडती. साकातला पोरग्याच्या भांगाव चांद असतो. त्यो बगून म्हणती “ बाबा ह्यो चांद तुजा कपाळाव कसा आला?” तसा पोरगा सांगतो “ न्हान आसताना आईनी मना व्हानात घालून कुटल्याला.” तशी प्योर आपल्याला भी कुट सांगती. पोरगा व्हानात घ्यालतो आनी तिला कुटतो आनी कडी करून ठेवतो. कपडे ते पोरीच घालून बसतो.

म्हतारी दात पाजवून येती. लेकीला वाडाय सांगती. पोरगा त्यो व्याडतो. म्हातारी बकाबक खाया लागती. तिथ मांजूर आसत ते म्हनत “ म्याव मना एक फोड घ्मातल्याव मी एक चूरका सांगन.” परत परत मांजूर म्हनाय लागत तस म्हातारी याक हाड घ्यालती. मांजूर म्हनत “ आपलेच धुयेची आपूनूच कडी खाता.” तस पोर हातात योक पान्याचा मोगा, योक चुन्नाचा मोगा, योक मिठाचा मोगा घेऊन कमाकमा पळाय लागतो. म्हतारी तेचे म्यागनी दाडा घेऊन पाठी लागती. पयली पोरगा पान्याचा मोगा ट्याकतो तस सबन पानी होत. पान्यातनी म्हातारी कशी कशी येती. मग म्यारतो चुन्नाचा म्हतारीला चुन्ना झोंबतो. मग मिठाचा म्यारतो. मिठात येऊन म्हातारीला

आनी झोंबत त्यात म्हतारी मरून जाती. पोरगा घोट्यात येऊन बगतो झाल्या सगळया गायी ओरडून, ओरडून धमून पडल्याता. झाडपाला क्याडतो आनी अमृत करून गाईच्या तोंडात घ्यालतो. तशा गयी सारक्या होत्याता. मग थोर होऊन लगीन होऊन घरा जातो.

## ६. प्राण्याची पार्टी

एक दिस जंगलात जनावराची मिंटींग हुती. सगळयाच्यानी ठरीवल जंगलात एक पार्टी कराची. पार्टीला कावळा, चिमणी, ससा, कोल्हा, हत्ती, वाघ, हरण, कुत्रा, मांजर हे सगळ प्राणी आल हुत. पार्टी चालू झाली. पार्टीत खाया बरी दुध घालून खीर केली हुती.

खीर चुलीवनी उतरून सगळ प्राणी न्हव आंघोळ कराय जात्यात. मांजूर तेवड जायित नाही. मांजूर खीर राखीत आसात. बसून बसून मांजार बेजारत. ते एवूडूशी खीर चाटून बगत. खीर खूप बरी झालती. आनी एकदा घेत आनी बरी लागती. परत परत खाऊन मडक होत रिकाम. खीर सगळी सोपती. मांजूर भीत आता के कराच. मडक तसच झापून ठेवत आनी कडव जाऊन बसत.

थोड्या वेळानी सगळी जनावर आंघूळ करून येत्यात. आंघूळ करून सगळयाना चरचरून भूख लागली हुती. सगळी जनावर खाया बसली. मडक उघडून बगते झाल्या मडक्यात कायीच नाही. मांजराला विचारत्यात खीर खूट हा. मांजूर म्हणत मी तर बगलीच नाही. मी हितच बसून हा.

सगळयाच्यानी खीर कुन्नी खाल्ली हे बघाय एक युक्ती क्याडली. जवळ एक ब्याव हुती. एक घागर घेतली आनी सगळी ब्यावीकड गेली. पयली वाघ गेला घागर ब्यावित ध्यातली घागरीव वर वाघ बसला आणि म्हनाय लागला “ मी खीर खाल्ली झाल्या बुड घागरी .” घागर बुडली नाही. मग ससा गेला आणि म्हनाय लागला “ मी खीर खाल्ली झाल्या बुड घागरी .” घागर बुडली नाही. अस करून सगळी जनावर गेली कोनूच बुडल नाही. आता फक्त मांजर उरल. मांजराला थरथरी भरली. तसच गेल आनी मांजूर घागरीव बसल आणि सावकाश म्हणाय लागल “ म्याव.. मी खीर खाल्ली झाल्या बुड घागरी.” तशी घागर डुब करून बुडली. सगळयाना कळत मांजरानी खीर खाल्ली म्हनून.

## ७. म्हातारा सिंह

रानात योक शिव हुता. त्यो जंगलाचा राजा हुता. शिव आता खूप म्हातारा झाला हुता. शिवाला शिकार काराय होईत नव्हती. त्या शिवानी एक दिस सगळया प्राण्याना जमा केल आनी सांगल “ मी आता म्हातारा झाले माझ्यानी शिकार काराय होईत नाही. मी

तुमचा राजा म्हणून सदीना एक एक जनावर येऊन माझ भोजन होईन. प्राणी सगळ भिल. दुसरा दिस उजाडला. पयली हरण गेल शिवानी तेला खाल. दुसरे दिवशी अस्वल गेल. अस करून सगळी जनावर एक एक दिस जाया लागली.

एके दिवशी सशाचा दिस आला. ससा याईस लेट गेला. शिवाला भूख लागली हुती. ससा लेट आला ते बगून रागावला. ससा धावत धावत आला. शिवानी विचारल इतका का धावला आणि टाईम का झाला. ससा म्हनाय लागला ‘ माफ करा महारज’ मी टाईमाव आलो हुतो वाटत योक दुसरा शीव घावला तेन्नी मना आड्यावल. त्यो शिव म्हानाय लागला “आपून जंगलाचा राजा.” ते आयकून शिवाला आला राग. शिवानी विचारल ‘ कुठ हा त्यो दुसरा शीव?’ ससा म्हनाय लागला आपल्या बरोबर ये तुला दाखिवतो.

ससा शीवाला घेऊन एके बावीकडे जातो. ससा सांगतो महराज हे बावीत राहतो. तसा म्हातारा शिव बावीत डोई घालून बगतो. बावीच्या पान्यात शिवाला आपलच तोंड दिसत. तेला वाटत बावीत दुसरा शिव हा म्हनन शिव डरकाळी फोडतो. तसच बावीत चित्र दिसत. त्यो म्हनतो मी राजा तस बावीत आवज गुजतो आणि परत तेचाच आवाज त्याला परतून आयकू येतो. आता शिवाला राग येतो. रागानी बावीतल्या शिवाला मारायसाठी आपून आत उडी म्यारतो. शिव मरतो आणि ससा वाचतो.

## ८. देवचार

एका गावात एक बायको लग्नीन होऊन आल्याली. एक दिसती तळीव जाती. बाराला सुंबार ती तळीव जाती. तिथे योक माणूस आंघोळ करीता. त्यो माणूस सांगतो ह्या टायमाव तू इथ येऊ नको. ह्या आपला आंघूळ कराचा योळ. ती बायको तेच आयकत नाही.

दुसरे दिशी परत येती. त्यो परत तिला सांगतो. तिसरे दिशी येती तवा तिला गायब करतो. घरातली सगळी लोक सोदाय लागत्यात. ती कुठच घावत नाही. तळीकड जाऊन बगत्यात दिसत नाही. मग देवाकड कौल बगत्यात. तवा त्यांना कळत तिला देवाने गायब केल. ती देवाची चूक मागत्यात. मग ती बायको मेळती.

## ९. नदी आणि महादेव

एक दिस महादेवानी नदीला हाकडल आणि सांगला माझा योक निरोप घेऊन धरतीव जा. नंदीनी मान हालीवली. महादेवानी सांगल **‘ धरती जा आणि लोकांना सांग दिसात दोनंदा आंघोळ करा आणि एकदा जेवा.’**

नंदी गेला डुलत डुलत धरतीव. लोकांना जाऊन महादेवानी सांगल्याल ते उलट सांगल. नंदीन सांगल ‘ **दिसात दोनंदा जेवा आणि एकदा आंघोळ करा.’** लोक दिसात दोनंदा जेवायल लागली आणि एकदा आंघोळ करायला लागली. दोनंदा जेवान कराय धान्य चड लागाय लागल. लोकांना धान्य पावना. सगळी महादेवाला हाका माराय लागली.

महादेवानी बगल धरतीव सगळी ओरडाय लागल्यात. महादेवानी नंदीला हाकडल आणि विचारल धरतीव जाऊन क्ये सांगल. नंदी म्हणाय लांगला **“ मी जाऊन सांगल दिसात दोनंदा जेवा आणि एकादा आंघोळ करा.”** हे आयकून महादेवाला आला राग. तवा महादेवानी नंदीला रागानी सांगल **‘ आयच्च्यान तू जाऊन धरतीव रशिल आणि लोकांची जमीन खणून देशीन जेणेकरून लोक शेती करून दोन वेळच जेवण जेवतीला.’** तेव्हापासून नंदी शेत नांगराय लागला